नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळ**वार दिनांक २५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.००** वाजता मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन पत्र क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ०३-०१-२०२२ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार Video Conferencing व्दारे सभा** आयोजित सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ७. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ९. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १०. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ११. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १२. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १३. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १४. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १५. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १६. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १७. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १८. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १९. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २०. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २१. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| २२. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २३. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २४. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २७. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २८. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३०. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ३१. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| ३२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ३३. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३४. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३५. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ३६. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३७. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ३८. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३९. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ४०. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ४१. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ४२. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ४३. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ४४. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४५. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४६. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४७. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ४८. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ४९. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ५०. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ५१. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५२. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ५३. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ५४. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५५. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ५६. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५७. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ५८. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५९. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ६०. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ६१. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ६२. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ६३. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ६४. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ६५. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ६६. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६७. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ६९. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ७०. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ७१. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ७२. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ७३. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ७४. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ७५. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ७६. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ७७. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ७८. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ७९. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ८०. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ८१. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ८२. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ८३. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ८४. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ८५. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ८६. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ८७. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ८८. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ८९. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ९०. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ९१. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ९२. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ९३. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ९४. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ९५. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ९६. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ९७. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ९८. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ९९. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| १००. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| १०१. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| १०२. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| १०३. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| १०४. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| १०५. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| १०६. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

# अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| २. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ३. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ४. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ५. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ६. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ७. | ५ | अ | रिक्त | |
| ८. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १०. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| ११. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १२. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १३. | ८ | ब | श्रीमती अंसारी सय्यद बेगम निजामुद्दीन | सदस्या |
| १४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १६. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १७. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| १८. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| १९. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २०. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २१. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| २२. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| २३. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| २४. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| २५. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| २६. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| २७. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| २८. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| २९. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ३०. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ३१. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३२. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ३३. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ३४. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ३५. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३६. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ३७. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ३८. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ३९. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ४०. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ४१. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ४२. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ४३. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ४४. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ४५. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ४६. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ४७. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ४८. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ४९. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ५०. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**
**श्री. विजय हुमणे निगम सचिव**

मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक २१३ :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दांजली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

**शोक प्रस्ताव**

**बिरजू महाराज**

जागतिक कीर्तीचे प्रख्यात कथ्थक नर्तक व पदमविभूषण पुरस्काराने सन्मानित पंडित बिरजू महाराज यांचे दिनांक १७.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ८३ वर्षाचे होते.

भारतीय नृत्यकला आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविणा-या प्रतिभावंतांमध्ये ते अग्रस्थानी होते. बिरजू महाराज यांनी कथ्थकचे शिक्षण देऊन अनेक शिष्य घडविले आहेत.

## डॉ.सिंधूताई सपकाळ

"अनाथांची माय" अशी ओळख असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे दि. ४.०१.२०२२ रोजी निधन झाले. त्या ७५ वर्षाच्या होत्या.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाळ सदन संस्थेची स्थापना केली. १९९४ मध्ये पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण या गावात ही संस्था सुरु झाली. आपली कन्या ममताला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले. त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला.

## प्रा.एन.डी.पाटील

महाराष्ट्रात गेल्या ७० वर्षाच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील अतिशय धडाडीचे आणि लढाऊ नेते प्राध्यापक नारायण ज्ञानदेव उपाख्य एन.डी.पाटील यांचे दि. १७.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ९३ वर्षाचे होते.

सन १९४८ मध्ये त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला होता. ते महाराष्ट्र विधान परिषदेचे १८ वर्षे पर्यंत सदस्य होते आणि ते राज्याचे सहकारमंत्री होते. याशिवाय ते महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य आणि सीमा चळवळीचे प्रमुख नेतेही होते.

## नानाजी मोहोड

म.न.पा.चे माजी स्थायी समिती अध्यक्ष आणि ना.सु.प्र.चे माजी विश्वस्त नानाजी मोहोड यांचे दि. १२.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ८५ वर्षाचे होते.

सन १९९० च्या दशकात नानाजी काँग्रेस चे प्रमुख नेते होते. १९८५ ते १९९२ पर्यंत ते नगरसेवक होते. १९९१ ते १९९२ पर्यंत ते स्थायी समिती अध्यक्ष होते.

## हाजी अब्दुल रेहमान कुरेशी

बोरगांव वार्ड नं.१८ चे माजी नगरसेवक हाजी अब्दुल रेहमान कुरेशी यांचे दि. १९.१.२०२२ रोजी निधन झाले. ते ७१ वर्षाचे होते.

## विठठलराव टालाटुले

नागपूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच माजी सभापती म्हाडा व जनसेवक शिक्षण संस्था रिधोराचे संस्थापक सचिव विठठलराव टालाटुले यांचे दि. १७.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ८७ वर्षाचे होते.

**डॉ.मंगला केतकर**

नागपूरातील प्रख्यात स्त्रीरोग आणि प्रसूती तज्ज्ञ तसेच वंध्यत्व विशेषज्ञ डॉ.मंगला केतकर यांचे दि. ३१.१२.२०२१ रोजी निधन झाले. त्या ७६ वर्षाच्या होत्या.

**विजय देशमुख**

माजी न्यायाधीश विजय देशमुख यांचे वणी येथील देशमुखवाडी या त्यांच्या राहत्या घरी दि. ०१.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ८८ वर्षाचे होते.

**राजेश पिंजानी**

पहिल्याच चित्रपटात सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शनाचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावणारे कामठी नागपूरचे राजेश पिंजानी यांचे दिनांक १७.०१.२०२२ रोजी निधन झाले. ते ५१ वर्षाचे होते.

**श्रीराम बहोरिया**

दलित मित्र, अखिल भारतीय पासी समाजाचे वरिष्ठ उपाध्यक्ष व कर्मठ सामाजिक कार्यकर्ता इंदिरा भवन बजरिया निवासी श्रीराम बहोरिया यांचे दि. २.०१.२०२२ रोजी ह्रदयाघाताने निधन झाले. ते ७५ वर्षाचे होते.

**नरेंद्रदादा येलपुरे**

रविनगर येथे असलेल्या दादाधामचे प्रणेते सदगुरु नरेंद्रदादा येलपुरे यांचे दीर्घ आजाराने दि. १९ डिसेंबर, २०२१ रोजी निधन झाले. ते ७८ वर्षाचे होते.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबाद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दु:ख होत आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दु:खद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभु चरणी प्रार्थना.

(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)

**<u>ठराव क्रमांक २१४</u> :-** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## अभिनंदन प्रस्ताव

### मालविका बन्सोड

नागपूरची २० वर्षाची बॅडमिंटनपटू मालविका बन्सोड हिने सैय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळविल्याबद्दल मनपाची ही सभा तिचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### मनोज पांडे

मुळचे नागपूरकर लेफ्टनंट जनरल मनोज चंद्रशेखर पांडे यांची भारत सरकार तर्फे व्हाईस चीफ ऑफ आर्मी स्टाफ म्हणून नियुक्ती करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### दीप्ती बिस्ट

मनपाच्या सुरेंद्रगड हिंदी हायस्कुलच्या विज्ञान शिक्षिका दीप्ती बिस्ट यांनी राष्ट्रीय स्तरावरील साराभाई टीचर्स सायन्टिस्ट अवार्ड मिळवून मनपाला राष्ट्रीय स्तरावर नांवलौकीक मिळवून दिल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### गौरी गोखले

गोव्यात मडगाव येथे पार पडलेल्या २२ व्या राष्ट्रीय सिकई मार्शल आर्टस स्पर्धेत नागपूरच्या गौरी राजस गोखले हिने सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल मनपाची ही सभा तिचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### श्रीनभ अग्रवाल

किशोर वयात संशोधन क्षेत्रात अभुतपूर्व कामगिरी करणा-या श्रीनभ मौजेश अग्रवाल या किशोरवयीन नागपूरकराला मा.प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्याचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर:- प्रश्नोत्तर का काल शुरु करते है l

**<u>प्रश्न क्र.</u>**<u>293</u>:- घोषित झोपडपट्टी क्षेत्रामध्ये बांधकामाच्या परवानगी करीता नकाशा डीप्रमाणे .आर.सी. सादर करणे बंधनकारक आहे का? संदर्भात प्रश्न

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, माझा जो प्रश्न होता तो स्लम विभागाच्या कार्यप्रणालीवर होता. त्याचे उत्तर मला नगररचना विभागाने दिलेले आहे. मला स्लम विभागाचे सक्षम अधिकारी बाराहाते साहेब आहेत यांना प्रश्न विचारावयाचा आहे की हे जे उत्तर दिलेले आहे त्याच्याशी ते सहमत आहेत काय? हे जे

उत्तर देण्यात आलेले आहे हे त्यांच्या नॉलेजमध्ये आहे काय?

महापौर:- प्रशासनाने उततर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, मा.सदन. एडीटीपी विभागाने प्रश्नाचे उत्तर जे दिले आहे. ते प्रश्न मी वाचलेले आहेत आणि त्यांच्या उत्तराशी मी सहमत आहे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, मी यांनाच प्रश्न विचारु इच्छितो की त्यांच्या नॉलेजमध्ये ते उत्तर आहे. मी जो प्रश्न विचारला होता, घोषित झोपडपट्टी क्षेत्रामध्ये बांधकामाच्या परवानगीकरिता नकाशा डी.सी.आर. प्रमाणे सादर करणे बंधनकारक आहे काय? यांनी उत्तर दिलेले आहे 'होय'. मा.महापौरजी, मला विचारावयाचेआहे की स्लम क्षेत्रामध्ये डीसीआर लागू होतो काय ? त्यांनी याबद्दल सांगावे की स्लमच्या कोणत्या कायद्याअंतर्गत कोणत्या कलमाखाली हा डीसीआर लागू होतो या बद्दल सुध्दा त्यांनी ऊहापोह करावा.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे आपल्याला एडीटीपी विभागाकडूनच प्राप्त होतील. या ठिकाणी आपण विचारले परवानगी देणे आवश्यकता आहे का? आणि कां आवश्यकता आहे. या सगळया गोष्ट एडीटीपी विभागाकडून आलेल्या उत्तरामध्ये दिलेल्या आहेत. परंतु सगळयांच्या फायदयासाठी एडीटीपी त्यामध्ये उत्तर देतील.

सहा. संचालक,नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगररचना अधिनियम 1965 चे कलम 44 अनवये नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण क्षेत्रामध्ये कोणतेही विकास परवानगी देणे, कोणत्याही नागरिकास देणे बंधनकारक आहे. मंजूर एकत्रित विकास नियमावली क्रमांक 2.1 मध्ये स्पष्ट नमुद केलेले आहे त्यानुसार नागपूर शहरातील प्रत्येक नागरिकांस बांधकाम परवानगी घेणे अनिवार्य आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, ॲड संजय बालपांडे सदस्य साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. तो स्पेसिफिक स्लम ॲक्ट मध्ये येणा-या अनुषंगाने आणि स्लम मध्ये राहणा-या लोकांच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे या अनुषंगाने स्लमचे जे कायदे आहेत ते सर्वश्री वेगळे आहेत. त्या झोपडपट्टीमध्ये वसलेले जे लोक आहेत एडीटीपी पासून नव्हे तर स्लम विभागापासून अभिप्रेत आहेत. अशी माझी माहिती आहे. कदाचित या विषयावर प्रशासन चांगला प्रकाश टाकू शकेल.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, नगररचना विभागाच्या उप संचालक गावंडे साहेबांनी कलम 152 (1) चे वाचन करावे. कलम 152 एमआरटीपी ॲक्ट प्रोव्हीजन 3 चे वाचन करावे.

महापौर:- एडीटीपीने वाचन करावे

सहा. संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, एमआरटीपी 1966 कलम 52 मध्ये कलम 152 अंतर्भुत असले तरी कलम 25, 46, 43, 45, 42, 49, 51, 53, 55, 56, 58, 89, 90, 160, 135, 136, 142 या प्रोव्हीजना अंतर्गत खालील नमुद केलेले (वाचले) प्राधिकरणाच्या किंवा नवीन विकास प्राधिकारणाच्या अधिकारांचा वापर करतील व त्यांची कर्तव्ये पार पाडतील. (वाचले) कलम 152 मध्ये या

सर्व बाबी सर्व अधिकार महानगरपालिकेच्या मा.आयुक्तांना प्रदान केलेले आहे. परंतु आणखी असे की नियोजन प्राधिकारण म्हणून काम करतांना महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम 171 या अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास या अधिनियमान्वये 44, 45, 46, 51, 53, 54, 55, 56, 35, 135, 136 या अन्वये वापरता येणा-या अधिकारापैकी संबंधित अधिकार राजपत्राच्या अधिसुचनाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाच्या मुख्य कार्यकारी अधिका-याकडे सोपवू शकेल.

ॲड संजय बालपांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, यांनी दिलेले उत्तर संयुक्तिक नाही आहे. हे सभागृहाची दिशाभुल करीत आहे. यांनी प्रोव्हीजन 3 चे वाचन करावे. त्यामध्ये असे दिलेले आहे.(वाचले) मा.बाराहाते साहेबांच्या नावाने कोणते नोटीफिकेशन निघाले आहे काय? हे एसआरए नाहीत. म्हणून गावंडे साहेब हे जे उत्तर देत आहेत ते बरोबर नाही.

सहा. संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, कलम 152 अन्वये मा.आयुक्तांना अधिकार प्रदान केलेला आहे. एसआरए सहा.संचालक नगररचना या पदाचा कार्यभार सुध्दा सहा.संचालक नगररचना, महानगरपालिका यांच्याकडे आहे. कारण आपण स्लम सहा.संचालक नगररचना झोपडपट्टी पुनर्वसन या अधिकाराच्या अंतर्गत वितरीत करण्यात येते. याचा सुध्दा कार्यभार माझ्याकडे आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे ॲड संजय बालपांडे साहेबांना त्यांनी नेमके काय उत्तर दिले. त्या प्रश्नाच्या उत्तराचे वाचन व्हावे. या प्रश्नाच्या अनुषंगाने त्या उत्तराचे वाचन होणेआवश्यक आहे. हा प्रश्न नागपूर शहरातील संपुर्ण स्लम नोटीफाईड झोपडपट्टी मधला आहे. त्या अनुषंगाने अत्यंत मोठा आणि गहन प्रश्न या नागपूर शहरातील रहिवाश्यांचा आहे. प्रशासनाने नेमके काय उत्तर दिले त्या संदर्भात, त्या उत्तराचे वाचन सर्वांसाठी ओपन असणे आवश्यक आहे. या उत्तराचे वाचन करण्यात यावे.

महापौर:- उत्तराचे वाचन करावे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे वाचन करावे आणि त्यानंतर त्यावरील उत्तराचे वाचन करावे.

महापौर:-कृपया प्रश्नाचे वाचन करावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, , घोषित झोपडपट्टी क्षेत्रामध्ये बांधकामाच्या परवानगीकरिता नकाशा डी.सी.आर. प्रमाणे सादर करणे बंधनकारक आहे काय? असा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर 'होय' असे दिलेले आहे. उतत्तर (वाचले)

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, माझा प्रश्न याच्याशी संलग्न असा आहे. हे जे तुम्ही सांगता हे नकाशे मंजूर करण्याची गरज आहे ते नकाशे मंजूर करणारी ॲथारीटी स्लम इंजिनिअर राहणार आहे की शहरात नकाशे मंजूर करणारे एडीटीपी विभाग राहणार आहे.

सहा.संचालक,नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, सहा संचालक, नगररचना नागपूर महानगरपालिका नागपूर शहरातील सर्व बांधकाम परवानगी प्राधिकरणास सादर करतात त्यामुळे आपल्या

नागपूर शहरातील सर्वसाधारण बांधकाम परवानगी वा इतर झोपडपट्टीमधील सुध्दा बांधकाम परवानगी त्यानुसार अनुज्ञेय करतात.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझा पाईंट ऑफ आर्डर असा आहे नागपूर शहरातील जवळजवळ 80 टक्के लोकांना मालकी हक्काचे पट्टे मिळालेले नाही. 100 टक्के लोकांनी आपआपली घरे बांधलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे 10 टक्के सोडले तर 90 टक्के नकाशे मंजूर नाही. ते कसे करणार आहे. एडीटीपी यांनी उत्तर दयावे की जे नकाशे मंजूर नाही त्यावर आपण काय निर्णय करणार आहे याची माहिती एडीटीपी विभागाने दयावी.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, कोणत्याही भुखंडावरील बांधकामास परवानगी देणे आवश्यक आहे. परंतु जागेचा मालकीबाबत ते कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

ॲड संजय बालपांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, गावंडे साहेब सदनाची दिशाभूल करीत आहेत म्हणून मला बोलावे लागत आहे. मा.महापौरजी, कुठेतरी गावंडे साहेब बाराहाते साहेबांना सील करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि सदनाची दिशाभूल करीत आहेत. मा.महापौरजी, मी आपल्या समोर खुप जबाबदारीने बोलत आहे. राज्य शासनाने घोषित स्लममध्ये यांना पावर लागू होतो काय? ते यांनी आधी सांगावे. कारण 152 प्रोव्हीजन 3 नुसार जोपर्यंत नोटीफिकेशन निघत नाही, जोपर्यंत स्पेसिफिक अधिकार देण्यात येत नाही तोपर्यंत महानगरपालिका क्षेत्रामध्ये एमआरटीपी ॲक्टप्रमाणे युझ करु शकत नाही. म्हणून कलम 44 प्रमाणे नकाशा मंजूर करु शकत नाही. असा कायद्या आहे. परंतु याबाबत आता विधी अधिका-याचे मत घेवून घ्यावे. त्यांना सेक्शन 152 (3) काय आहे त्याप्रमाणे ॲकट जरुरी आहे किंवा नाही.

महापौर:- विधी अधिका-याने उत्तर दयावे.

विधी अधिकारी(श्री. कपले):- मा.महापौरजी, सेक्शन 152 (3) मध्ये गर्व्हमेंट नोटीफिकेशन ऑफीशियल गॅझेट नोटीफिकेशन ते काढायला पाहिजे ते एसआरए संबंधिची ती प्रोव्हीजन आहे. ती प्रोव्हीजन152 (3) मध्ये गावंडे साहेबांनी वाचलेली आहे. स्लम ॲक्टच्या सेक्शन 8 मध्ये कंम्पोनट ॲथारिटी एसआरएला नकाशा मंजूरी करण्याची परवानगी स्पेशन नोटीफिकेशनद्वारे महाराष्ट्र शासनने काढले असेल तर कॉम्पेनेंट ॲथारिटी स्लम मध्ये स्लम ॲक्टच्या सेक्शन 8 मध्ये मंजूरी करण्याचे अधिकार आहेत.

ॲड संजय बालपांडे:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, यांनी सांगावे की स्लम ॲक्टच्या सेक्शन 8 प्रमाणे यांच्या नावाने नोटीफिकेशन काढले आहे काय?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाचे 2015 चे परिपत्रक आहे. कार्यकारी अभियंता आणि ॲडीशनल कमिश्नर यांना कलमाअंतर्गत नोटीफाईड स्लममध्ये नकाशा मंजूरी करण्याचा त्यांना अधिकार दिलेले आहे. परंतु त्यात असे म्हटले आहे की काय शुल्क घ्यायचे, काय नियम लागते याबद्दलचा काही उल्लेख नाही. परंतु एडीटीपी आहे, आपले जे डीसीआर रुल्स आहेत. स्लम मध्ये सुध्दा एडीटीपी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे लागू होते. कारण स्लममध्ये किती शुल्क घ्यावयाचा याचा काही उल्लेख नाही. मा.महापौरजी, आम्ही आतापर्यंतचा रेकार्ड पाहिला होता तर त्यात काही नकाशे स्लममधून

मंजूर झाले होते. काही क्लिअर नियम नसल्यामुळे एडीटीपी साहेबांनी उत्तर दिले आहे त्याला माझी सहमती आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, माझी सहमती आहे म्हणजे काय?

श्री.प्रविण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, बाराहाते साहेब, गावंडे साहेब किंवा राधाकृष्णन साहेब यांच्या सहमतीने महानगरपालिका चालले काय? बालपांडे साहेब मघापासून म्हणत आहे की नोटीफिकेशन निघाले आहे काय? हो किंवा नाही असे उत्तर देण्यात यावे. आपण कायद्याप्रमाणे चालतो, नोटीफिकेशन काढले आहे काय? इतका साधा प्रश्न आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाचे 2015 चे परिपत्रक आहे. त्यानुसार......

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, गॅझेट नोटीफिकेशन काढले आहे काय?

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, विधी अधिका-यांनी इतके स्पष्ट सांगितले ते मान्य आहे. विधी अधिका-याच्या सल्ल्यानुसार आणि कलमानुसार गॅझेट नोटीफिकेशन निघायला पाहिजे ते निघाले आहे काय? इतका सोपा प्रश्न आहे. त्याचे स्पेसिफिक उत्तर देण्यात यावे.

महापौर:- बाराहाते यांनी उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, ):- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाचे 2015 चे परिपत्रक आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता स्लम.....

ॲड धर्मपाल मेश्राम:- गॅझेट नोटीफिकेशन आहे काय?

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, गॅझेट नोटीफिकेशन आहे.

ॲड संजय बालपांडे:- स्लम ॲकट सेक्शन 2 चे वाचन करावे.

ॲड धर्मपाल मेश्राम:-सन्माननीय महापौरजी, एक्झक्युटीव्ह इंजिनिअर सांगतात की गॅझेट नोटीफिकेशन आहे तर ते गॅझेट नोटीफिकेशन त्यांनी सभागृहासमोर सादर करावे आणि त्या गॅझेट नोटीफिकेशनचे वाचन व्हावे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, हाऊस को गुमराह करने का काम चालू है।

महापौर:- बाराहाते, आपके नाम से गॅझेट नोटीफिकेशन निकला है उसका वाचन करो।

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, माझ्या नावाने नाही आहे सर, कार्यकारी अभियंता स्लम यांच्या नावाने निघाले आहे.

महापौर:- ॲक्टमध्ये नमुद आहे ज्या माणसाला जबाबदारी देत आहे त्याचा नावाचा नोटीफिकेशन निघणे आवश्यक आहे. तो निघाला आहे किंवा नाही.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, माझ्या नावाने निघाला नाही.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, यांना कलम 8 मधील कलम (2) वाचायला सांगा.

महापौर:- वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, कलम 2 पोटकलम (1) अन्वये कायद्याची प्रत्येक अधिसुचना तिच्या तारखेपासून दोन वर्षाची किंवा राज्य शासन राजपत्रातील.....

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, 2015 ला अधिसुचना निघाली आहे आणि हे म्हणत आहेत की दोन वर्षाची आणि आता 2022 सुरु आहे. दोन वर्षासाठी त्याचे पब्लीकेशन असतांना हे लागू होत नाही असे माझे म्हणणे आहे. हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत हे मी वारंवारं आपल्याला सांगत आहे. महापौरजी, एडीटीपी साहेबांनी उत्तर दयावे स्लम क्षेत्रामध्ये डीसीआर लागतो तर 300 फुटाचा प्लॉट आहे त्याला किती मार्जीन सोडावी लागेल आणि किती कंन्स्ट्रक्शन करावे ते त्यांनी सांगावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, प्रकरण 4 मध्ये स्पेसिफाय केलेले आहे. दाटीवाटीचे क्षेत्र त्यामध्ये भुखंडाच्या समोरील रस्तयाच्या अनुषंगाने समोर मार्जिन सोडणे आवश्यक आहे. आजूबाजूला कोणतीही मार्जिन सोडणे अपेक्षित नाही.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, गावंडे साहेबांना विचारण्यात यावे की कलम 8 अंतर्गत कलम 46 (1) चा वापर करुन शासनाने नियम तयार करायला सांगितले आहे काय? हे नियम त्यांना शासनाला पाठविले आहेत काय? हे त्यांनी सांगावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जे कलम 8 अंतर्गत कलम 46 (1) च्या कम्प्लॉयन्सच्या संदर्भात विचारले आहे त्याबाबत बाराहाते साहेबांनी सांगावे अशी मी विनंती करतो.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, हे काय सुरु आहे. कधी म्हणतात ते उत्तर देतील, कधी म्हणतात हे उत्तर देतील. याचे उत्तर त्यांनीच दिले पाहिजे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, नोटीफिकेशनच्या अनुषंगाने विचारले म्हणून मी सांगितले आहे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, कलम 8 अंतर्गत कलम 46 (1) अंतर्गत स्लम विभागाकडेच दिलेले आहे. एडीटीपी विभागाने यामध्ये ढवळाढवळ केलेली आहे. झोपडपट्टीवासियांवर इतका अत्याचार होत आहे. त्यांना घर बांधायला परवानगी मिळत नाही आहे. झोपडपट्टी क्षेत्रामध्ये रजिस्ट्री राहत नाही. ते अतिक्रमण करुन राहत आहे. 50-50 वर्षापासून त्याठिकाणी वसाहत करुन छोटया छोटया घरामध्ये राहत आहे. ते बांधकाम करण्याकरिता परवानगी मागतात तर त्यांना रितसर परवानगी देत नाही, त्यांना आखीव पत्रिका मागण्यात येते. त्यांच्याकडे रजिस्ट्री नाही तर आखीवपत्रिका कशी राहणार आहे. आखीवपत्रिका कशी उपलब्ध करुन देणार आहे ते सुध्दा बाराहाते साहेबांनी सांगून दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, कलम 8 मध्ये 1, 2, 3, 4, आणि 5 कलम आहेत. मा.सदस्यांनी कलमाचा उल्लेख केलेला आहे ते कळलेले नाही. त्यांना काय म्हणावयाचे आहे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, कलम 46 सहकलम (1) याचे वाचन करावे. कारण मा.महापौरजी, माझ्या प्रभागामध्ये 60 टक्के जनता स्लममध्ये राहतात आणि ते नोटीफाईड स्लम आहे. त्यांच्याकडे रजिस्ट्री नाही. त्यांची रजिस्ट्री सुध्दा होत नाही. एडीटीपी विभाग रजिस्ट्री मागतात,

आखीवपत्रिका मागतात तर यांनी सांगावे की ते कसे उपलब्ध् करुन देतील किंवा हे उपलब्ध करुन देत असतील तर कसे उपलब्ध होतील याबद्दल मार्गदर्शन यांनी करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, सहा.संचालक नगररचना यांनी जी माहिती दिलेली आहे. त्यानुसार जागेची मालकी हक्क असणे आवश्यक आहे. जर कोणतेही कागदपत्रे संबंधित व्यक्तीच्या नावाने नसेल तर नकाशा मंजूर होणार हा एक प्रश्नच आहे.त्यामुळे आखीवपत्रिका असणे आवश्यक आहे सर.

ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर सन्माननीय महापौरजी, आतापर्यंत मा. एडीटीपी यांनी ज्या काही परिभाषा दिलेल्या आहेत की डीसीआर लागू होतात किंवा आणखी कोणते नियम लागू होतात ते कंन्जस्टेड एरियामध्ये लागू होतात त्याबद्दल ते बोलले. कन्जेस्टेड एरिया आणि नोटीफाईड स्लम हया दोन्ही गोष्टी अत्यंत वेगवेगळया असून त्याची प्रशासनाने अत्यंत खुबीने शहानिशा केलेली आहे. ज्या घोषित झोपडपट्टया आहेत, नोटीफाईड स्लम आहेत त्यात राहणा-या लोकांचे अधिकार हे वेगळे आहेत आणि त्यांच्या ॲथारिटीज वेगळया आहेत. त्यामुळे सरसकट एडीटीपीचे रुल्स किंवा डीसीआर रुलस या स्लम नोटीफाईड रहिवाश्यांना लागू होत नाही. त्यामुळे या संदर्भातील प्रश्नाचे उत्तर एडीटीपी अन्वये आलेले आहे हे अत्यंत चुकीचे आहे. या संपुर्ण नागपूर शहराची, या सभागृहाची ही दिशाभूल आहे. या प्रश्नाचा सरळ संबंध एक्झक्युटीव्ह इंजिनिअर स्लम यांचाच आहे. त्यांना सुनावणीचा अधिकार आहे. मी स्पष्टपणे सांगतो, झोपडपट्टीच्या संदर्भातील एखादे अतिक्रमण डिमॉलीश करावयाची कार्यवाही असेल तर त्यांनी करु नये. ते अधिकार आपल्या जवळ ठेवले आणि त्या माध्यमातून आपल्या हस्तकाच्या माध्यमातून पैसे कमविले जातात. एवढेच धंदे स्लम इंजिनिअर नागपूर महानगरपालिका करीत ओत. याच्या पलीकडे जेव्हा जबाबदारी घेण्याची वेळ येते तेव्हा एडीटीपीकडे ढकलले जाते. या पध्दतीचे काम आपल्या माध्यमातून होत आहे असा माझा आरोप आहे. मा.महापौरजी, माझी आपल्याला नम्र विनंती आहे. या संदर्भाने एक स्पेशल कमेटी तयार करुन शेवटी स्लम ॲक्टच्या संदर्भाने आतापर्यंत यांच्या नावाने गॅझेट नोटीफिकेशन निघालेले नाही. स्लम इंजिनिअर म्हणून याला शासनाची मान्यता आहे किंवा नाही. हे विचारण्याची वेळ आलेली आहे. जर असे असेल तर यांनी आतापर्यत जे काही निर्णय घेतलेले आहेत ते संपुर्ण आपोआपच कालबाहय आणि रद्दबादल ठरतात. जे निर्णय घेतले असतील त्याच्या मुळापर्यंत जाण्याची जबाबदारी स्लम ॲथारिटी आणि आपल्या प्रशासनाची राहील. माझी नम्र विनंती राहील की या संदर्भाने या प्रशनाचे उत्तर येण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, ब-याच वेळापासून ही चर्चा सुरु आहे. यामध्ये प्रामुख्याने एक मुद्दा समोर आलेला आहे की कार्यवाही कुणी करावी हा वादाचा विषय आलेला आहे. दुसरा विषय आहे एमआरटीपी ॲक्ट स्लममध्ये लागू होतो काय? मा.आयुक्तांनी या ठिकाणी निवेदन करणे आवश्यक आहे. बिल्डींग परवानगी घेतांना संपुर्ण शहरामध्ये नियोजन प्राधिकरण त्यासाठी महाराष्ट्राचा कुठला ॲक्ट लागू होतो. त्याच्यानंतर कार्यवाही करण्याचे अधिकार कुणाला आहे, एडीटीपी आहेत की उपायुक्त स्लमला आहेत हा वेगळा विषय आहे. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये जो कायदा घर बनविण्याकरिता

बनविला आहे. तो कायदा महाराष्ट्र सरकार बनवितो तो संपुर्ण नागपूर शहरात लागू होतो किंवा नाही. आणि कुठकुठल्या ठिकाणी लागू होतो याची माहिती जर आयुक्तांनी या ठिकाणी दिली तर अपेक्षित उत्तर आपल्या सगळयांना याठिकाणी मिळेल.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

निगम आयुक्त:- मा. महापौरजी, मा.सदन. आज या ठिकाणी भरपूर चर्चा झालेली आहे. स्लम एरियामध्ये परवानगी कोणाला द्यावयाची आहे. त्यामध्ये असलेले कन्फयुजन ज्यामध्ये सत्तापक्ष नेत्यांनी सांगितलेले आहे. तीन-चार गोष्टी बेसिकली मी क्लिअर करु इच्छितो. माझ्या माहितीप्रमाणे एक-दोन गोष्टी मी क्लिअर करु इच्छितो. स्लम एरियाकरिता कंम्पोनट ॲथारिटी म्हणून नोटीफिकेशन शासनाकडून निघालेले आहे. स्लम ॲक्टप्रमाणे कार्यकारी अभियंता राहतील. त्यामध्ये नाव निश्चित दिलेले नाही. एक्झक्युटीव्ह इंजिनिअर पदावर घोषित करण्यात आले आहे ते मी बघेल. मा.सदस्य बालपांडे यांनी विचारले, परवानगी घेण्याची आवश्यकता आहे काय? त्यामध्ये स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे. आता दोन-तीन मुद्दयाचे स्पष्टीकरण करुन सांगतो. पहिला महत्वाचा मुद्दा आहे, एमआरटीपी ॲक्ट शहरासाठी कुठल्याही प्रकारचे विकास कामासाठी टाऊन प्लॉनिंगच्या हद्दीमध्ये तयार करण्यात आलेला ॲक्ट आहे. स्लमसाठी महाराष्ट्र शासनाने स्लम ॲक्ट तयार केलेला आहे.त्यामध्ये त्यांनी तरतूदही केलेली आहे. ज्यावेळी शासनाला वाटेल त्याला कंम्पोनट ॲथारिटी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. तिकडे एमआरटीपी ॲक्टच्या 44 चा अधिकार देवू शकतो गॅझेट नोटीफिकेशन निघाल्यानंतर, गॅझेट नोटीफिकेशनच्या संदर्भात आपणही प्रश्न विचारला आहे , मला पण अद्याप बघता आलेले नाही. इन केस असे नोटीफिकेशन काढले गेलेले असेल तर ॲक्ट 44 चाच अधिकार वापरुन काम करण्याचा अधिकार एडीटीपी कंम्पोनट ॲथारिटी म्हणून फॉलो करतील.

श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. याला जोडून माझा एक उपप्रश्न आहे. डीपीसीआमध्ये महाराष्ट्र गर्व्हमेंट आहेत ते डीआरमध्ये वेगवेगळया ठिकाणी एनआयटीच्या ज्युरीडिक्शनमध्ये एनआयटी वापरतो, महानगरपालिकेच्या ज्युरीडिक्शनमध्ये महानगरपालिका वापरतो, मेट्रोपोलिटीयनच्या ज्युरीडिक्शनमध्ये मेट्रोपोलिटीयन वापरतो तसे स्लमच्या ज्युरीडीक्शनमध्ये स्लमला वापरण्याचे अधिकार स्लमला आहेत की एडीटीपीला आहेत हे सुध्दा क्लिअर करावेत.

निगम आयुक्त:- मा. महापौरजी, स्लमला अधिकार नाहीत. युडीसीपीआर पहिल्यांदा संपुर्ण स्टेटसाठी युडीसीपीआर मिळाले. फक्त प्रत्येक ज्युरीडिक्शनमध्ये कोण त्याचा लागू करायचे. जसे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये म्युनिसिपल कमिश्नरला कंम्पोनट ॲथारिटी म्हणून केले आहे. एनआयटीच्या कार्यामध्ये एनआयटी चेअरमन त्यांचे प्लॉनिंग ॲथारिटी एमएमआरपी च्या हद्दीमध्ये एमएमआरपी. स्लमसाठी वेगळे दिलेले नाही. आपण समजून घ्या, घोषित स्लम आहे त्या ठिकाणी एखाद्या व्यक्तीला विकास करावयाचा असेल तर कोणत्या कायद्याप्रमाणे जायचे. स्लम ॲकटप्रमाणे विकासाची परवानगी नाही आहे. प्रोटेक्शनसाठी आहे.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, स्लम ॲकट कलम 8 प्रमाणे पॉवर दिलेला आहे.

निगम आयुक्त:- मा. महापौरजी, मा.सदन. महत्वाचा मुद्दा आहे. आपण सांगितले, सेक्शन 8 मध्ये

दिलेले आहे. परंतु टर्म ॲन्ड कंडीशन आहेत त्याप्रमाणे केव्हा करु शकतो जेव्हा कंम्पोनट ॲथारिटी म्हणून दिलेले आहे. त्याला जोडून दुसरे नोटीफिकेशन आहे. जे त्यांनी वाचून दाखविले ते एमआरटीपी चे कलम 152 आहे. आपण समजून घ्या, कोणताही एरिया महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये बसत असेल आणि विकासासाठी परवानगी दयावयाची असेल तर विकास परवानगीचा एकमेव कायद्या आहे एमआरटीपी कायदा आहे. एमआरटीपीच्या कायदयामध्ये सेक्शन 44 ते अधिकार काही ठिकाणी जसे नोटीफाईड स्लममध्ये स्कीम करायचे असेल त्यावेळी शासन नोटीफिकेशन काढतात की या कंम्पोनट ॲथारिटीकडून करुन घ्यावे. त्यामध्ये दोन ॲथारिटी होता कामा नये. त्यामुळे मा.सत्तापक्ष नेत्यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये मी स्पष्टपणे सांगतो की, जोपर्यंत शासनाकडून सेक्शन 44 च्या अधिकाराचे नोटीफिकेशन कंम्पोनट ॲथारिटीला घोषित झाले त्याच कंम्पोनट ॲथारिटीला डेलीगेट करण्यात आलेले नाही तोपर्यंत मग स्लम असो वा नॉनस्लम असो, महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एखादे विकास काम करायचे असेल तर युडीपीसीआर आणि एडीटीपी या दोन्हीच्या आधारावरच विकासाची परवानगी देवू शकतो. वेगवेगळया परवानगीची आवश्यकता नाही. आपण परवानगी देवू शकत नाही.

श्री.अविनाश ठाकरेः- मा.महापौरजी, मा.आयुक्त महोदयांनी जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये एक मुद्दा सुटलेला आहे. एसआरए ॲथारिटीने काही प्लॉनिंग केले असेल तर त्यांना जे अधिकार नकाशा मंजूरीचे, एसआरए पुरते आहेत की नोटीफाईड स्लम मध्ये एसआरए नकाशा मंजूर करु शकते याबद्दल माहिती देण्यात यावी.

निगम आयुक्तः- मा. महापौरजी, मा.सदन. कलम 152 मध्ये सांगितलेले आहे, एसआरएला अधिकार शासन देवू शकते. त्यासाठी त्यांना वेगळे नोटीफिकेशन काढले तर त्यामध्ये येथे उल्लेख केलेला नाही. त्याचा कालावधी पण आहे.

श्री.अविनाश ठाकरेः- मा.महापौरजी, एसआरएच्या माध्यमातून स्लम कंम्पोनट ॲथारिटीच्या माध्यमातून जे लेआऊट तयार होतात. बिल्डींग तयार होतात. तर ते अधिकार त्यापुरते आहेत की नोटीफाईड स्लममध्ये सुध्दा अधिकार देवू शकतात.

निगम आयुक्तः- मा. महापौरजी, मा.सदन. शासनाला वाटले असेल की एखादा स्लम आहे तयाचा विकास व्हायला पाहिजे, त्याचा डेव्हल्पमेंट व्हायला पाहिजे तर शासन विचार करेल की दुसरे एखादे विशेष प्लॉनिंग ॲथारिटी दिले पाहिजे. तसे दिलेले आहे. याठिकाणी आज रोजी आतापर्यंत जे सेक्शन 44 अंतर्गत डेलीगेशन कंम्पोनट ॲथारिटी दाखवत नाही तोपर्यंत एडीटीपी रेग्युलर इमारतींचा अधिकार म्हणून जेथे माझा अधिकार म्हणून जेथपर्यंत मर्यादेपर्यंत डेलीगेट झालेले आहेत ते माझ्यापर्यंत येईल अशाप्रकारचे आपण दिलेले आहे. दुसरा मुद्दा, हा प्रश्न कां निर्माण झाला आहे. प्रश्नाचे मी उत्तर वाचलेले होते. काही लोकांचा संभ्रम निर्माण झाला होता. काही लोक माझ्याकडे आले होते की साहेब आमचे काम होत नाही आहे. उदाहरणार्थ, आपल्याकडे काही स्लममध्ये एनएमसीच्या मालकीच्या जागेमध्ये आपण शासनाच्या जीआर वापरुन ऑलमोस्ट 70-80 परसेंट पट्टेवाटप केले आहे. तिथे काही अडचणी असतील तर तेथे मालकीची इश्यू अ‍ॅड्रेस केले आहे. पुढे त्यांना युडीसीपीआरमध्ये तरतूद सुध्दा केलेली आहे. अधिकृत ऑर्कीटेक् कडून

नकाशा करुन घेवून मंजूरी करु घेवू शकतो मात्र इश्यु असा झाला की काही ठिकाणी स्लम मिश्र स्वरुपाचा आहे. त्या ठिकाणी अधिकृत लेआऊट पण आहेत आणि काही अनधिकृत आहेत तर काही प्रायव्हेटपण आहेत. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीकडे ओरीजनल सेल डीड आहे. ते लीज नुतनीकरण करुन आणले तर परवानगी देवू शकतो मोठया अधिकृत स्लममध्ये राहत असतील तर.आतापर्यंत कसे झाले माहीत नाही परंतु कंम्पोनट ॲथारिटीचे काम फक्त स्लम घोषित करणे नाही करणे. ॲक्टमध्ये दिलेले आहे स्लम इम्प्रुव्हमेंटच्या संदर्भात काम करणे असे त्यांचे आहे. विकास कामाच्या परवानगीसाठी किंवा एमआरटीपीचा पावर वापरायचा असेल तर डेलीगेटचे पावर त्यांच्या नावाने असणे आवश्यक आहे. त्यांच्या नावाने नसेल तर जशी आऊटर भागामध्ये प्रक्रिया होते तशी फॉलो करावी लागेल. व्यक्तीकडे कागदपत्रे नसेल तर त्यांनी काय करायला पाहिजे. तातडीने त्या एरियाचा जी.आर. 2011 पर्यंतच्या नुसार पट्टेवाटप करतो. पट्टेवाटप प्रमाणे कामकाज करायला पाहिजे. पीटीएस सर्वे करु. मालकीच्या टीमला आग्रह करु,तशाच प्रमाणे न्याय देवू शकतो. त्याच्या शिवाय आपल्याकडे पर्याय नाही. जीआर आहे त्याप्रमाणे शहरासाठी फायदा करुन घेतला पाहिजे ज्यांच्याकडे मालकी हक्काच्या अडचणी असेल. ज्यांच्याकडे लीज रिन्हीवल करण्याच्या अडचणी नाही त्यांनी लीज रिन्हीवल करावी मात्र एडीटीपीकडेच यावे, कंम्पोनट ॲथारिटी स्लमकडे जाण्याची आवश्यकता नाही.

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, कमिश्नर साहेबांनी आताच निवेदन केले त्याप्रमाणे कोणताही नकाशा मंजूरी, बांधकाम परवानगीचे अधिकार स्लम सक्षम अधिकारी एक्झक्युटीव्ह इंजिनिअर नाही असे त्यातून निष्पण्ण होते. बाराहाते साहेबांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दयावे की त्यांनी एका व्यक्तीचा नकाशा मंजूर केला किंवा नाही ते सांगावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, जेव्हा मी पुर्ण रेकार्ड तपासला तेव्हा 2017 पासून स्लम विभागामध्ये 14 नकाशे पाच वर्षापासून प्रलंबित होते. 14 नकाशे होते जे प्रलंबित होते ते परत केले. जे मा.सदस्यांनी उल्लेख केला नितीन भगत यांचा नकाशा मंजूर केला. मा.सदस्यांनी जे म्हटले एक स्लमचा नकाशा मंजूर केला तर सुरवातीच्या सहा महिन्यामध्ये माझ्या हातातून हा नकाशा मंजूर झालेला आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, माझे दोन प्रश्न आहेत. पहिला, जर स्लममधील नकाशे मंजूर करण्याचे अधिकार एडीटीपीला आहेत तर स्लममधील अनधिकृत बांधकाम पाडण्याची अपील स्लम एक्झक्युटीव्ह इंजिनिअर यांच्याकडे कां करावी लागते. कुठल्या नियमाअंतर्गत करावी लागते. इमारत बांधकाम नकाशा एडीटीपीने मंजूर करावा आणि पाडण्याची अपील कार्यवाही स्लमने करावी हे कुठल्या नियमाअंतर्गत आहे हानंबर एक प्रश्न आहे, स्लममध्ये किती चौ.फुटच्या जागेवर बांधकामास एडीटीपी परवानगी देवू शकते हा दुसरा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर एडीटीपीने दयावे किंवा मा.स्लम अधिका-याने दयावे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, बालपांडे साहेबांनी जो प्रश्न नितीन भगत यांचा नकाशा मंजूर करण्याच्या संदर्भात विचारला.आतापर्यंत ज्यांना नकाशे मंजूर करण्याचे अधिकार नव्हते. त्या स्लमच्या इंजिनिअर साहेबांनी कोणत्या नियमाच्या आधारे नितीन भगत यांचा नकाशा मंजूर केला हे सुध्दा स्पष्ट झाले

पाहिजे अशी माझी विनंती आहे.

अॅड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, यामधून महानगरपालिकेने किती शुल्क वसुल केले ते सुध्दा सांगावे. एडीटीपीने मंजूर केले त्यामधून किती पैसे महानगरपालिकेच्या फंडामध्ये जमा करण्यात आले ते सुध्दा सांगण्यात यावे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, सोबतच माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे. स्लममध्ये किती फुटाच्या कामाला एडीटीपी मंजूरी देवू शकते.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाने दिनांक 2.12.2020 रोजी विकास धोरण युडीएफयुडीच्या मंजूर केलेल्या आहेत. त्याच्यामध्ये प्रकरण क्र. 6 मध्ये, 6.1, 6.2 मध्ये (वाचले) त्याच्यामध्ये मिनीमम साईज ऑफ प्लॉन 20 स्केअर मीटर त्याला G+1, G+2 अनुज्ञेय केले आहे. त्याच्यामध्ये त्याला मार्जिन सुध्दा.0 अनुज्ञेय केले आहे. ज्या ठिकाणचा भुखंड असेल आणि कार्नर प्लॉट असेल तर त्या अनुषंगाने सुध्दा तेथे अंतर नमुद केलेले आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, मा.महापौरजी, मी सोपा प्रश्न विचारला होता, नोटीफाईड स्लममध्ये किती स्केअर फुट जागेवर एडीटीपी परवानगी देवू शकते.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, 20 स्केअर मीटर....

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, 225 स्केअर मीटर बांधकामाला परवानगी देवू शकतो.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, कारण त्याच्यामध्ये स्पष्टता नमुद केलेली आहे.(वाचले) हे स्पष्ट लिहिले आहे. त्यामुळे 20 चौ.मी.क्षेत्रावर बांधकाम परवानगी देवू शकतो. त्याला .90 मीटर आंतरीक रोड असला तरी त्याला परवानगी अनुज्ञेय होते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, ही परवानगी नियमाप्रमाणे आपल्याला एडीटीपी विभागामार्फत घ्यावी लागेल की की नियमाप्रमाणे जे आर्कीटेक्ट नेमले गेले आहेत त्यांना अधिकार आहे त्यांच्याकडून परवानगी घेवू शकतो.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, (वाचले) त्याला बांधकाम परवानगी देता येते तथापि महानगरपालिका क्षेत्रामध्ये अशा प्रकारचे बांधकाम परवानगी देण्याबाबत एकही वास्तुशास्त्रज्ञ तयार नसलयामुळे त्याच्यामध्ये ऑप्शन आहे. वास्तुशास्त्रज्ञ मार्फत मंजूर करता येते किंवा टाऊन प्लॉनिंगकडे विकास परवानगीकरिता अर्ज केला तर नगर रचना विभागामार्फत त्या भुखंडावर बांधकाम परवानगी देता येईल.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, अशा प्रकरणांत नागपूर शहरातील एकही आर्किटेकट महोदय परवानगी देण्यास तयार नसतील आणि असे जर प्रकरण एडीटीपीकडे आले, नियमाप्रमाणे सर्व कागदपत्रे पुर्ण असतील तर किती दिवसांत आपण त्याला परवानगी देतो.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, कलम 44 अन्वये प्रस्ताव सादर होताच त्या अनुषंगाने 60 दिवसाच्या अवधीत परवानगी देणे आवश्यक आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, समजा 60 दिवसाच्या आंत यांनी नियमात असलेल्या प्रकरणाला

परवानगी दिली नाही तर ते प्रकरण मंजूर आहे असे समजून काम सुरु करावयाचे काय?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, त्यामध्ये स्पष्टता केलेली आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, 60 दिवसाच्या आंत स्लम मधील नियमा अधीन प्रकरणाला एडीटीपीने समजा परवानगी दिली नाही तर अशा प्रकरणांत सुमोटो समजून काम सुरु करावयाचे काय?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, नियम असे म्हणतात. त्या अनुषंगाने नियोजन प्राधिकारणाला विधीन टाईम पिरेडमध्ये बांधकाम परवानगी देण्यात आली नाही किंवा नाकारली या संदर्भात नियोजन प्राधिकारणाला कळविणे आवश्यक आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, नियोजन प्राधिकरण म्हणजे कोण? समजा 60 दिवसाच्या आत कागदपत्रे योग्य असल्यावरही मंजूरी मिळाली नाही तर नियोजन प्राधिकरणाला कळवावे. नियोजन प्राधिकरण म्हणजे मा. आयुक्त की एडीटीपी ते सांगण्यात यावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, ॲथारिटीची व्याख्या दिलेली आहे (वाचले) कलम 44 अंतर्गत 1966 चे काही अधिकार एडीटीपी यांना मा.आयुक्तांनी प्रदान केलेले आहेत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, नियोजन प्राधिकरण म्हणजे एडीटीपी काय?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, मा.आयुक्त आहेत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, समजा 60 दिवसाच्या आंत बांधकामाला परवानगी मिळाली नाही तर मा.आयुक्तांना कळवावे आणि आपले काम सुरु करावे. मा.महापौरजी, माझी विनंती आहे, या शहरामध्ये स्लममध्ये राहणा-या नागरिकांतर्फे, महानगरपालिकेने अशा विषयाच्या अनुषंगाने पेपरमध्ये ॲड द्यावी. सामान्य गोरगरीब जे स्लममध्ये राहतात. त्यांनाआपला प्लॅान सॅग्शन करण्याकरिता वर्षभर वाट बघावी लागते. परंतु जे कागदपत्रे नियमाच्या अधिन राहून देतात त्यांना वर्षभर वाट पाहावी लागते त्यांनी आयुक्तांना कळवून बांधकाम सुरु करावे. महानगरपालिकेने ॲड दयावी की तुमचे प्रकरण नियमाच्या अधिन असेल तर आयुक्तांनी कळवून आपले बांधकाम सुरु करावे. यात नागरिकांचा फायदा होईल. दुसरे, स्लममध्ये राहणा-या नागरिकांकरिता विकास दर सध्या मा.आयुक्तांनी जुलमी कर लावलेले आहेत, 100 टक्के वाढ ते स्लममध्ये राहणा-या नागरिकांना लागणार आहेत काय?

महापौर:- उत्तर दयावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, नियोजन प्राधिकारणामध्ये ज्या इमारतीला एमआरटीपी 1966 चे कलम 124 'ब' नुसार विकासशुल्क सर्व ठिकाणी 124 'ब' अंतर्गत आणि 124 1 (अ) अंतर्गत हे ज्या शहरासाठी मेट्रो शहर म्हणून घोषित केले आहे. जे मेट्रो रिझनमध्ये एमएमआरपी जे आहे त्या अंतर्गत जे विकास दर निश्चित केलेले त्या नुसारच विकास परवानगीकरिता विकास शुल्क आकारण्यात येते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, स्लममध्ये 100टक्के मा.आयुक्तांनी वाढ केली आहे ती लागू होणार आहे काय?

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, हो लागू होणार आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, ज्यादा तर नागरिको को यह पता नही है की स्लम का नियम क्या है। बिल्डींग मॅप सॅगशन करने के लिए कहां जाना पडता है। महानगरपालिका के मार्फत, पेपर के मार्फत जानकारी दी जाये जिससे नागरिको को पता चले और उनके लिए आसानी हो। स्लम डिपार्टमेंट जे जो मॅप सॅगशन कराना है, उसके नियम क्या है यह वर्तमानपत्र के माध्यम से , महानगरपालिका के माध्यम से नागरिको को पता चले।

ॲड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, माझा प्रश्न अजूनपर्यंत अनुत्तरीत आहे. स्लम एरिया के लोगो को आखीवपत्रिका कैसे मिलेंगी और रजिसट्री कैसे मिलेंगी यह बताना चाहिए।

महापौर:- उत्तर दयावे.

सहा.संचालक, नगररचना(श्री.गावंडे):- मा.महापौरजी, आखीवपत्रिकेबद्दल स्लम विभाग सांगू शकतील.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, या संबंधित 2017 पासून प्रलंबित नकाशे स्लम विभागामध्ये आहेत. कुणाच्या जागेची मालकी हक्क निश्चित झाल्याशिवाय आपण मंजूर करीत नाही. या कारणाने आपण 14 नकाशे परत केले आहे. जे या विभागात 5 वर्षापासून प्रलंबित होते.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, विषय असा आहे. याच्यावरील स्पष्टता आलेली नाही. जे अतिक्रमीत स्लममध्ये बसलेले आहेत ज्यांना सरकारने परवानगी दिलेली आहे आपण त्या ठिकाणी राहू शकता. त्या जागेचे मालकी हक्काचे पट्टे मिळालेले नाही ही पहिली गोष्ट, दुसरी गोष्ट त्यांच्याकडे टॅक्सची रसीद सोडून कोणताही पुरावा नाही. नकाशा मंजूर करावा लागतो हे स्लमच्या लोकांना माहीत नाही. त्यांच्यावर 100 टक्के भुर्दंड आहे. कार्यालयाने आता माहिती दिलेली आहे ती त्यांना माहिती मिळालेली नाही. स्लम मध्ये राहणारे सर्व लोक याबाबतीत अनुज्ञेय आहेत त्यांना याची माहिती नाही. सर्वांनी 90 टक्के घरे बांधलेली आहेत मग तो नागपूर शहरातील कुठलाही एरिया असो. अशा ठिकाणी अशा लोकांसाठी कुठला नियम करणार आहे. त्यांच्याकडे मालकी हक्काचे पट्टे नाही, टॅक्स सोडून दुसरा कुठला पुरावा नाही. घर बांधण्यासाठी नकाश मंजूर करावा लागता हे त्यांना माहीत नाही. स्लम विभागाने आजपर्यंत कुठल्याही प्रकारे पत्राद्वारे त्यांना कळविलेले नाही. याचा नकाशा मंजूर करावयाचा आहे असे एकही पत्र कार्यालयाने दिलेले आहे काय? याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, आता नुकतेच मा.आयुक्तांनी निवेदन केलेले आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, कन्फयुजन निर्माण करु नका. मी काय म्हटले आहे, झोपडपट्टीधारकाला नकाशा मंजूर करावा लागतो असे एखादे पत्र एडीटीपी विभागाकडून एका तरी स्लमला गेलेले आहे काय?

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, पत्राद्वारे नागरिकांना कळवावे असे कायद्यात अभिप्रेत आहे परंतु आतापर्यंत असे एकही पत्र प्रशासनाने काढलेले नाही.

श्री.दिपक चौधरी:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, माझे बाराहाते साहेबांना असे म्हणणे आहे

की जे नोटीफाईड स्लम आहेत किंवा अननोटीफाईड स्लम असतील त्यामध्ये यांनी कोणतेही पत्र दिले नाही किंवा नोटीसेस पोहचविल्या पाहिजे हा नियम आता बनला आहे की आधी बनलेला आहे हे यांनी सांगावे. एवढया वर्षामध्ये आतापर्यंत कां पोहचवू शकले नाही. लोकांना याची काहीच माहिती नाही. यांच्याकरिता काही नवीन नियमावली आहे काय? मा.महापौरजी, हा नियम आधीपासून होता की आता लागलेला आहे हे स्पष्ट करुन यांनी सांगावे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, आपले अभिनंदन आहे की या विषयाच्या अनुषंगाने अनेक कंगोरे या चर्चेतून बाहेर आले. मा.तानाजी वनवे यांनी विचारले जे अनधिकृत आहेत ज्यांना पट्टे मिळालेले नाही, त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही केली काय? मा.प्रविणजीने विचारले, स्लम मध्ये किती स्केअर मीटरचे बांधकाम करु शकतो. प्रशासनाकडून उत्तर आले की 220 ते 200 स्केटर मीटरपर्यंत बांधकाम करु शकतो. त्याच्यामध्ये एक विषय ॲड होतो की जे आपण आता पट्टेवाटप केले. लोकांना 1000 स्केअर फुट आणि 1500 स्केअर फुटाचे पट्टे वाटप केले मग त्यांना ॲस फोर डीसीआर 1 की 1.2 एफएसआय अनुज्ञेय करुन 1500 स्केटर फुटापर्यंत कन्स्ट्रक्शन अलाऊ आहे काय? असे अनेक कॉम्प्लीकेटेड मुद्दे या विषयाच्या चर्चेतून बाहेर येत आहेत आणि त्याच्यामध्ये काही क्लिअरंन्स होत नाही. या चर्चेतून भविषयातील अनेक अडचडी चर्चेत दडलेल्या दिसत आहेत. जसे मा.प्रविणजी दटके यांनी विचारले की नकाशा सॅग्शनला टाकला आणि एख्यादयाचे घर आहे 700 स्केटर फुटाचे आणि त्याला रिक्न्स्ट्रक्शन करायचे असेल तर त्याला 200 स्केटर फुट मिळणार आहे. स्लममध्ये डीनोटीफाईड करता येते काय? तिला डीनोटाफाईड करुन दाटीवाटीच्या क्षेत्रातील डीसीआर त्याला रेग्युलाईज करता येणार काय? असे सगळे निर्णय या चर्चेच्या माध्यमातून समोर आलेले आहे मा.महापौरजी. आपण सर्व निर्णयावरती एकत्रित निर्णय सुध्दा या सभागृहाला अपेक्षित आहे. जेणेकरुन भविष्यातील ज्या समस्या आहेत, भविष्यातील अनेक गोष्टी आहेत जसजसे नवीन कायद्याचे ज्ञान होते, तसतसे अधिकारी त्या कायद्याप्रमाणे काम करण्यास सुरवात करतील त्याचा कुठेतरी जनतेला, जनप्रतिनिधींना, मनस्ताप होतांना दिसतो. जनतेपर्यंत या कायद्याची माहिती जात नाही. कायदा नसले तर 60 दिवस सॅग्शन मिळणार नाही. त्याला वर्ष दोन वर्ष सॅग्शन मिळणार नाही. त्याला सांगता येईल की हा कायदा आहे आणि या कायदयामुळे देवू शकत नाही. त्यामुळे यामध्ये सर्वकष निर्णय घेणे आवश्यक आहे. मा.महापौरजी, मग ते प्रविणजी असो, धर्मपालजी असो, यांना आपल्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे, जे लोक स्लमला रिप्रेझेंट करतात त्यांना विनंती आहे की जे स्लम कम्पीलीटली डेव्हल्प झाले असतील त्यांना स्लम डिनोटीफाईट करु शकलो तर खुप प्रश्न साल्व होवू शकतील. आपल्या ज्या अपेक्षा आहेत त्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून परवानगी त्या गोष्टींना घेणे या चर्चेच्या माध्यमातून अपेक्षित आहे. म्हणून सभागृहाला आणि सर्वांना माझे निवेदन आहे. या संपुर्ण चर्चेचा सार पाहता डिनोटीफाईडची प्रोसेसकडे जायला पाहिजे, सर्व विचार करुन जायला पाहिजे, चर्चा करुन जायला पाहिजे, स्लमला घेवून जायला पाहिजे, दाटीवाटीच्या क्षेत्रातील जीआरनुसार घरे रेग्युलाईज करायला पाहिजे. ज्या सर्व गोष्टींची आवश्यकता आहे त्यासाठी राज्य सरकारकडून परवानगी घेतली पाहिजे असे सभागृहाचे मत आहे. या चर्चेच्या अनुषंगाने आपण रुलिंग दयावे अशी माझी विनंती आहे.

अॅड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, कमिश्नर साहेबांनी की कोणत्याही बांधकामाला मंजूरी देण्याचे अधिकार नाही आहे. सभागृहामध्ये देण्यात आलेल्या उत्तरावरुन मला असे वाटत आहे की आज सभागृहाची दिशाभूल करण्याचा चंग बांधला आहे काय? महाराष्ट्र स्लम कायदा, महाराष्ट्र स्लम एरिया अॅक्टच्या सेकशन 8 मध्ये प्रोव्हीजन आहे. त्याचे वाचन करावे, कलम 3 व 4 ज्याच्यामध्ये स्लम अॅथारिटी कम्पोटंट अॅथारिटीला परवानगी देण्याचे पॉवर आहेत. मा.आयुक्त महोदयांनी म्हटले की त्यांना कोणतेही पॉवर नाहीत एडीटीपीला आहेत. हे आयुक्तांचे कथन हे कायद्याच्या विरोधात आहे. मा.आयुक्त राधाकृष्णन बद्दल खुप आदर आहे परंतु मा.आयुक्त सुध्दा अशा प्रकारचे चुकीचे निवेदन करतात हे बघून दु:ख वाटते मा.महापौरजी.

श्री.प्रविण दटके:- बालपांडे साहेब आपण कोर्टाचे मिनीटस् घेवून कोर्टात जावू म्हणजे आपल्याला न्याय मिळेल.

महापौर:- बालपांडे यांनी ज्या सेक्शनचे उच्चारण केले त्याचे वाचन करावे. कलम 8 मधील (3) व (4) सांगितले त्याचे वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, कलम 8 मधील (3) व पोटकलम (1) वाचले. मा.आयुक्तांनी ज्याप्रमाणे निवेदन केलेले आहे.त्याप्रमाणे सक्षम प्राधिकारीणीने लेखी पुर्व परवानगी शिवाय कोणताही नकाशा एडीटीपी कार्यालयाकडून तो मंजूर होईल मग स्लमचा नकाशा असेल तरी त्यांची लेखी पुर्व परवानगी शिवाय....

अॅड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, हे पुन्हा सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. कायद्यामध्ये काय तरतूद आहे.

कार्यकारी अभियंता(श्री.बाराहाते):- मा.महापौरजी, माझ्या एनओसीशिवाय सहा संचालक नगररचना नकाशा मंजूर करु शकणार नाही असे आमचे ठरलेले आहे मा.महापौरजी.

अॅड संजय बालपांडे:- मा.महापौरजी, कायद्याप्रमाणे चालले पाहिजे. एकाला एक कायद्या आणि दुस-याला दुसरा कायद्या हे बरोबर नाही. आपण कोणाचीही परवानगी न घेता 800 स्केटर फुटाचा नकाशा मंजूर केला. महानगरपालिकेचे खुप मोठे नुकसान केले.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, हा प्रश्न राखून ठेवावा. आपल्या अध्यक्षतेखाली सर्व जेष्ठ नगरसेवक व सर्व जेष्ठ अधिकारी यांची बैठक घेवून आमोरासामोर बसुन हा प्रश्न सोडवावा कारण स्लममध्ये 50 टक्के जनता राहते. आणि मा.बालपांडे इतक्या पोटतिडकीने प्रश्न मांडत आहेत. त्यामुळे आपलया अध्यक्षतेखाली एक बैठक बोलवून आमोरासामोर बसुन हा प्रश्न सोडवावा. मा.संजय बालपांडे यांचा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

महापौर:- प्रशासन ने संजय बालपांडेजी के प्रश्न पर उत्तर दिया, करीब करीब देढ घंटे से हम इस विषय पर चर्चा कर रहे है, लैकिन हम किसी समाधानपूर्वक उत्तर पर नही पहुंच सके, सबसे दुख की बात यह है कि, जिस व्यक्ती को हमने सक्षम प्राधिकरण करके अधिकार दिये, उस व्यक्ती का गॅजेट नोटीफिकेशन

निकला है ? या नही निकाला है इस बात पर अभी तक प्रशासन मौन है, गॅजेट नोटीफिकेशन की कॉपी सभागृह मे नही दी गयी, पुछने पर भी उपलब्ध नही करायी गयी, इसका अर्थ यही समझ् मे आता है कि, गॅजेट नोटीफिकेशन नही निकला I गॅजेट नोटीफिकेशन निकले बगैर अगर कोई अधिकारी काम कर रहा है तो उसका काम पुर्ण रुपसे गैरकानुनी है यह यहां स्थापित होता है, और प्रशासन ने गैरकानुनी तरीके से कोई निर्णय लेना यह गलत परंपरा है, इस बात पर आयुक्त ने तुरंत ध्यान देकर के आगे की कार्यवाही अग्रेषित करना चाहिये, ऐसा सबसे पहले सूचित किया जाता है, ऐसे निर्देश दिये जाते है I उसी अनुरुप सभागृह के समक्ष तीनो चारो मासदस्योने श्री बालपांडेजी ने., धरमपालजीने, प्रविणजीने, तानाजीने यह जो विषय सभागृह के सामने रखा, सत्तापक्षनेताने इन सारे विषयो को लेकर के एक बैठक हो, ऐसा अभिप्रेत किया, जिसमे विधी अधिकारी भी रहे, विधी सम्मत क्या है,इसप्रकार से निर्धारीत करके हम शासन के नियमो के अनुरुप एक निश्चित परंपरा स्लम मे नकशे मंजूर करने के लिये निर्धारीत करे, इस दिशा मे हम काम आगे बढाये Iसाथ ही साथ हम रमाई आवास योजना के अंतर्गत जो निधी देते है, वह देते समय नकशा मंजूर नही रहा तो भी उस जगह पर जैसा बांधकाम करना है, वैसा उस जगह पर बांधकाम करने की अनुमती देते है, अर्थात इसमे यह भी अंतर नियमित है कि, उस गरीब को जिस जगह पर वह रहता है उस जगह पर बांधकाम करने का अधिकार है, यह रमाई आवास योजना के अंतर्गत प्राप्त निधी से समप्राप्त होता है I और यह सारी पार्श्वभुमी मे अगर रमाई आवास योजना के अंतर्गत प्राप्त निधी मे वह अपनी जगह पर बांधकाम कर सकता है उसे नकशा मंजूर करने की आवश्यकता नही, और उस जगह पर बांधकाम करने के लिये वह पात्र है यह भी स्थापित होता है I इन सारे विषयो पर सखोल चर्चा करने के लिये हम सभागृह के यह सारे सदस्य इनके अलावा स्लम को रिप्रिझेंट करनेवाले जो सदस्य है उनकी समिती बनाकर के चर्चा करेगें और तब तक यह विषय सभागृह के पटल पर रखा जाता है I लैकिन एक प्रश्न जो अविनाशजी ने उठाया सदस्य की हैसियत से मैं पिछले २० साल से सभागृह मे यह प्रश्न पुछ रहा हुँ, क्या जो स्लम पुर्णरुपसे डेव्हलप हो गया है, उसे डी-नोटीफाईड करना चाहिये या नही करना चाहिये, जिस दिन इस शहर मे स्मार्ट सिटी का विषय आया, उस समय भी मैंने यह विषय रखा था कि, स्मार्ट सिटी घोषित होने से पहले हम सभागृह मे जिस दिन स्मार्ट सिटी घोषित करेगें क्या उस दिन हम यह घोषित कर सकते है कि, हमारे यहां के इतने स्लम हमने स्लम मुक्त कर दिये है, दुर्भाग्य से स्लम घोषित करने के तो अधिकार बने हुऐ है, कानुन बने हुऐ है लैकिन स्लम डी-नोटीफाईड करने का कोई भी कानुन नही है ऐसा प्रशासन बार बार कहता है, प्रशासन ने शासन के दरवाजे पर जाकर के स्लम डी-नोटीफिकेशन का कानुन बनाने के लिये तैयारी करनी चाहिये, मैं हमारे विधान परिषद के सदस्य श्री प्रविणजी उनसे भी निवेदन करुंगा कि, विधान सभा मे, विधान परिषद मे वे प्रश्न उठाकर के स्लम डीके लिये बाध्य करे नोटीफिकेशन के लिये शासन को कानुन बनाने-, कारण स्लम की जितनी भी सुविधांए है उसका फायदा स्लम को परिभाषित करते समय जो क्रायटेरीया दिया गया है, उससे बाहर हो जाने

के बावजूद भी वह स्लम डी नोटीफाईड नही होता-। मैं अगर उदाहरण देना चाहुं तो संपुर्ण सेंटर एव्हेन्यु रोड स्लम मे है,चंद्रलोक बिल्डींग स्लम मे है और सेवासदन बिल्डींग स्लम मे है, जो नव नव मंजिलो की बिल्डींग है, ऐसी स्थिती मे स्लम का डीनोटीफिकेशन भी आवश्यक है-,मासदस्यो की समिती इन सारी चिजो पर . निर्णय ले, स्लम डीसे एक पत्र नोटीफिकेशन की दृष्टीसे कानुन तैयार करने के लिये इस सभागृह के माध्यम-राज्य सरकार को भेजा जाये, तब तक यह विषय सभागृह मे आरक्षित रखा जाता है ।

**प्रश्न क्र. 294**:- मनपा शाळेमध्ये जुना रेकॉर्ड डिजिटलायझेशन करण्यात आलेले आहे का? या संदर्भात प्रश्न

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, माझा प्रश्न होता, म.न.पा. शाळेमध्ये जुना रेकार्ड डिजीटलायझेशन करण्यात आलेले आहे कां? जुन्या रेकार्डचे काटकसरची जबाबदारी कुणाची आहे? एकुण किती म.न.पा.शाळेमध्ये डिजीटलायझेशनची प्रक्रिया सुरु आहे? याचे उत्तर मला एज्युकेशन विभागाकडून मिळालेले आहे. आपल्या मार्फत मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की या सेम प्रश्नाला त्यावेळी जे आयुक्त होते त्यांनी उत्तर दिले होते. दिनांक 05.03.2020 ला, त्यांच्या अनुमतीने जे उत्तर देण्यात आले होते त्याचे वाचन प्रशासनाने करावे.

महापौर:- उत्तराचे वाचन करावे.

शिक्षणाधिकारी(श्रीमती मिश्रीकोटकर):- (वाचले)

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, हे असे उत्तर मला 2020 मध्ये मिळाले. हा सारखा प्रश्न मी आता 2021 मध्ये टाकला तयाचे उततर मिळाले ते उत्तर मला दोन वर्षानंतर ॲज इट इज मिळाले आहे. दोन वर्षा आधी मला जे उत्तर मिळाले होते ते आजही तेच उत्तर मिळाले आहे. म्हणून मला आपल्या द्वारे प्रशासनाला विचारावयाचे आहे की बजेट प्रोव्हीजन दोन वर्षापासून याकरिता कां देण्यात आले नाही. हे मा.आयुक्तांनी सांगितले पाहिजे. मा.महापौरजी, आज आपण आजादीचे अमृत महोत्सव साजरा करीत आहे. आजच्या काळामध्ये आपले पंतप्रधान जे स्मार्ट इंडिआ, डिजीटल इंडिआ बद्दलचा विचार करतात. त्यांचे व्हिजन आहे आणि ते पुर्ण करणे हे आपले कर्तव्य आहे. आणि हे करीत असतांना आपण बजेटमध्ये डिजीटललाईज करण्याकरिता दोन वर्षापासून कोणत्याही प्रकारचे प्रोव्हीजन देवू शकले नाही. मा.आयुक्ताकडून हे प्रोव्हीजन झालेले आहे परंतु दोन वर्षापासून आपण देवू शकलेले नाही याबद्दल मला खुप खंत वाटते. म्हणून मा.महापौरजी, मला आयुक्तांनी सांगावे की दोन वर्षापासून याला कंसीडर कां करीत नाही. की करायचच नाही. मा.महापौरजी, मला यामागचे एक सांगायचे आहे की आज आपल्याला 75 वर्ष होत आहे. महानगरपालिकेत याच्या आधीच्या काळामध्ये माझ्याच प्रभागातील रामनगर शाळा आहे. 1944 पासूनच शाळा आहे. म्हणजे 75 वर्षाआधीचा हा जुना रेकार्ड आहे. तो मी रेकार्ड काढला मा.महापौरजी, त्या फाईल्स् हातात पकडू शकत नाही मा. महापौरजी. या रेकार्डला काही झाले तर याला जबाबदार कोण ? तर मला याचे उत्तर मिळाले आहे मा.महापौरजी, प्रस्तुत रेकार्ड ज्या शाळेमध्ये आहे त्या शाळेच्या जो मुख्याध्यापक असेल तो जबाबदार असेल. मुख्याध्यापक चेंज होत असतात, कुणी रिटायर्ड होत असतात मग

त्यानंतर नवीन मुख्याध्यापक येत असतात. जर मला एखादया व्यक्तीचे लिव्हींग सर्टीफिकेट पाहिजे असेल आणि आज लिव्हींग सर्टीफिकेटचे किती महत्व आहे हे सांगायला नको. आता जे बहुजन बंधू आहेत त्यांची कास्ट सर्टीफिकेट किती महत्वाची आहेत. सगळे रिझर्वेशन त्याच्यावर अवलंबुन आहे. जर त्यांना उपलब्ध झाले नाही तर किती मोठे नुकसान होणार आहे. याला महत्व कां देत नाही. मी याकरिता हाच प्रश्न विचारीत आहे त्याला प्रोव्हीजन कां देत नाही. मा.आयुकतांनी यावर उत्तर दयावे अशी मी आपलया माध्यमातून विनंती करते.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. याच्यामध्ये सन्माननीय परिणीता फुके मॅडमना मी निदर्शनास आणून देतो की बजेट नुसते आयुक्त बनवित नाही तर स्टॅन्डिंग चेअरमन बनवितात आणि सभागृहामध्ये त्याला मंजूरी प्रदान करण्यात येते. अशा प्रकारचे आयुक्तांनी प्रोव्हीजन दिलेले आहे असे सांगणे संयुक्तिक राहणार नाही असे माझे सब्मीशन आहे. दुसरा एक विषय त्यांनी निदर्शनास आणून दिल्या कारणाने अभ्यासपूर्वक विचार करुन त्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करण्याचा प्रशासनातर्फे यांच्यामध्ये विचार करणार आहे. फक्त त्यांचा माहिती दिल्याबद्दल धन्यवाद.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मा.आयुक्तांकडून मला हे उत्तर अपेक्षित नाही आहे. त्या अंतर्गत मला एक विचारावयाचे आहे की आपल्या महानगरपालिकेत 2008-09 मध्ये ई-गर्व्हनसचे टेंडर निघाले होते. ई-गर्व्हनसमध्ये 62 मॉडयुलरचे प्रोव्हीजन होते. त्याच्यामध्ये एक कम्पोनं्ट शाळा होती की नाही. त्या कंम्पोनंटच्या अंतर्गत किती प्रोव्हीजन ई-गर्व्हनर्सच्या अंतर्गत मिळाले होते आणि त्याचा खर्च तुम्ही कुठे केला होता. त्यामध्ये एक ऑब्जेक्टीव्ह असे होते मा.महापौरजी, टू ई-गर्व्हनस इन्फॉमेशन डाटा टू व्हेरियस डिपार्टमेंट तसेच दुसरे एक ऑब्जेक्टीव्ह होते, डाक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टम. हे दोन-तीन ऑब्जेक्टीव्ह होते त्याच्यामध्ये डिजीटायलायजेशन आरामात करता आले असते. तरी त्याच्यावर कां कार्यवाही झाली नाही याचे उत्तर मला हवे आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या प्रकल्पाकरिता एकुण किती निधी आला होता. किती खर्च झाला आणि किती दिवसात हा प्रकल्प पुर्ण करावयाचा होता

निगम आयुक्त:- आयटी विभागाने माहिती दयावी. या योजनेमध्ये किती मंजूरी झाली होती. याचे नियोजन कसे बनविले होते.याच्यामध्ये कोणते कोणते आयटम घेण्यात आले होते. त्या नियोजनला मंजूरी कुणी दिली होती. सभागृहाने दिली होती की शासनाने दिली होती की आयुक्ताच्या स्तरावर मंजूरी देण्यात आली होती. त्याचा अगेस्ट किती खर्च करण्यात आला. मॅडमने सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये कां खर्च करण्यात आला नाही. माहिती नसेल तर माहिती घ्या आणि सविस्तर माहिती दया.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, ई-गर्व्हनर्सचे इन्चार्ज आता कोण आहेत.

कार्यकारी अभियंता(श्रीमती बॅनर्जी):- आदरणीय महापौरजी, आदरणीय सभागृह. मेरी आपसे रिक्वेस्ट है की इसके लिए मुझे इन्फोर्मेशन निकालने के लिए थोडा समय दे l

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मला या गोष्टीची खंत वाटते की आपल्या एनएमसीमध्ये ई-

गर्व्हनसला सेकंड लेव्हलवर ट्रीट करीत आहोत. ज्यावेळेला आपण सांगतो की स्मार्ट इंडिआ, डिजीटल इंडिआ बद्दल बोलतो आहे आणि ते आपले व्हीजन आहे. हा विषय कुठेतरी हरवलेला आहे असे मला वाटते. याच्यावरती चर्चा होणे आवश्यक आहे. ई-गर्व्हनसचा टेंडर निघाला होता त्यामध्ये 16 कोटीचे प्रावधान मिळाले होते. हा खर्च कुठे झाला याची माहिती व्हायलाच पाहिजे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, बॅनर्जी मॅडमने उत्तर दिले आहे ठीक आहे. परंतु एक प्रश्न निर्माण झाला आहे. मा.महापौरजी, माझ्या माहितीप्रमाणे दोन वर्षापासून बॅनर्जी मॅडमकडे आयटी विभागाचा चार्ज आहे. ई-गर्व्हनर्सच्या मॉडयुलरमध्ये केंद्र सरकारकडून 14 कोटीचा निधी मिळालेला होता आणि त्यात 64 मॉडयुलर होते अशी माझी प्राथमिक माहिती आहे. ई-गर्व्हनस ज्याच्या अंडरमध्ये चालते त्या विभागाचे प्रमुख यांना त्या बेसिक गोष्टीची माहिती या दोन वर्षाच्या कालावधी राहत नाही त्यांना या विभागात कां राहावे हा माझा प्रश्न आहे. परिणीता फुके ताई यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अत्यंत योग्य प्रश्न आहे.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, या विभागाकडे लक्ष नसल्यामुळे स्टेशनरी विभागाचा घोटाळा झाला त्याचे हेही एक कारण आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, आपली भारतातील डबल अकाऊटींग सिस्टीम देणारी ही नागपूर महानगरपालिका होती. सॅटेलाईट असेसमेंट बेस्ट टॅक्स असेसमेंट सिस्टीम देणारी ही पहिली नागपूर महानगरपालिका होती. त्याचे या मॉडयुलरमध्ये इनकार्पोरेट होते मा.महापौरजी, अशा अनेक गोष्टी आहेत त्याचे ई-गर्व्हनस पायोनिअर त्या काळी नागपूर महानगरपालिका होती. या मॉडेलचा अभ्यास दोन वर्षापासून त्या विभागाचा इन्चार्ज असलेल्या व्यक्तीला नसेल तर त्या पदावर राहण्याचा अधिकारच नाही. त्यामुळे माझी तुम्हांला विनंती आहे हे उत्तर आले आहे हे निगलीजन्सचा प्रकार आहे. याच्यापेक्षा अधिक निगलीजन्स होवू शकत नाही. दोन वर्षापासून ज्या मॉडेलची चर्चा संपुर्ण देशात होत असते त्या मॉडेलचा अजूनपर्यंत विभाग प्रमुखांनी अभ्यास देखील केला नाही त्यांना या पदावर राहण्याचा अधिकार नाही. मा.महापौरजी, आपण निर्देश दयावे बॅनर्जी मॅडमला या पदावरुन काढून दुस-या आयटी एक्सपर्ट असलेल्या व्यक्तीला त्या ठिकाणी नियुक्त करण्यात यावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मी सुध्दा अविनाश दादांजी जे म्हटले त्याला सहमती देते. श्वेता बॅनर्जी यांचे बायग्राऊन्ड आयटी क्षेत्रातील आहेत काय? त्यांच्या एज्युकेशन सर्टीफिकेटमध्ये त्याची माहितीच जर नसेल तर ते वर्क कशा करणार आहेत. इन्चार्ज असा असावा त्याला त्या विभागातील माहिती असावी आणि तो कार्य करु शकेल. जर इन्ट्रेसच नसेल तर तो आपल्या एजन्सीला ई-गर्व्हनस कसा सांगणार आहे. अविनाश दादांजी जे म्हटले त्याप्रमाणे कार्यवाही करायला पाहिजे.

महापौर:- मा.सदस्या सौ.परिणिताजी ने विषय उठाया, यह डिजीटालायझेशन का विषय है, विषय उठाने के बाद निगम आयुक्त साहबने उत्तर भी दिया एक बात का मुझे बहुत दुख है कि,मा. प्रणिताताई ने आयुक्त उत्तर दे यह कहां, तो आयुक्त ने उसे व्यक्तीगत जिम्मेदारी समझली, और सभागृह मे उत्तर दिया कि, मैं अकेला ही बजेट बनाता हुॅ क्या ? नागपूर महानगरपालिका के प्रशासन से उन्होने दोबारा प्रश्न किया, आपका प्रश्न था कि, उसमेसे कितने मॉडयुल पर काम हुआ। तो आयुक्त ने आय.टी. विभाग को जवाब देते

हुऐ कहां कि, इसको किसने अनुमती प्रदान की है, उसके नाम का उल्लेख किया जाये। यह जो अपनी जिम्मेदारी दुसरे पर झटकने की परंपरा इस सभागृह मे शुरु हो रही है यह कही न कही महानगरपालिका को गलत दिशा मे ले जायेगी और कौन मंजूरी देता है इसकी अपेक्षा उसको एक्झीक्युट करने की जबाबदारी किसकी है यह बात महत्व की है, शासन की परंपरा के अनुरुप स्थायी समिती के माध्यम से मंजूरी भले होती हो लैकिन वह तब तक एक्झीक्युट नही होता जब तक उसपर आयुक्त के हस्ताक्षर न हो जाये, इसका अर्थ ही यही है कि जो कुछ एक्झीक्युट होता है वह केवल और केवल आयुक्त के हस्ताक्षर से एक्झीक्युट होता है, इसलिये इसका श्रेय अगर आयुक्त को है तो इसकी नाकामी की भी जिम्मेदारी आयुक्त की ही होंगी। इसलिये ऐसा उत्तर सभागृह मे आयुक्त से कतई अपेक्षित नही इसकी संजीदगी आयुक्त ने लेना चाहिये, ऐसी ताकीद उनको दी जाती है। दुसरी बात जो विषय वारंवार उठ रहा है कि जिसे हमने अधिकारी बनाया, वह सक्षम है या नही, कारण स्लम मे हमने सक्षम प्राधिकारण पर चर्चा की, और हम सक्षम उत्तर ही नही दे सके, अभी आय.टी. पर हम चर्चा कर रहे है, और मै व्यक्तीगत तौर पर मा.आयुक्तजी से यह बात कह चुंका हुॅ कि, आयटी के लिये आपके पास जो अधिकारी है, उसको आयटी की जानकारी नही है, मा.पंतप्रधान पुरे देश को डिझीटालाईज करने की दिशा मे काम कर रहे है, और महानगरपालिका अपने आपको डिझीटालाईज करते समय उसके पास आयटी का सक्षम अधिकारी नही है, इसलिये काम नही कर पारही है, ऐसी स्थिती तो नही है, इन सारी चिजो पर आयुक्त ने बडी गंभीरता के साथ विचार करके निर्णय लेना चाहिये। और नागपूर महानगरपालिका मे अगर किसी भी प्रकार का ऐसा अधिकारी नही है जिसको आयटी के बारे मे नही समझता है तो शासन से एक अधिकारी बुलाकर के उस दृष्टी का सक्षम अधिकारी वहां नियुक्त करना चाहिये। यह बात सही है, हिंदी मे कहावत है कि, बंदर के हाथ मे वस्तरा दे देना, क्या ऐसे तो महानगरपालिका मे आयटी का विभाग नही चल रहा है, और अगर यह चल रहा है तो पावर डेलिगेट करने के अधिकार आयुक्त को है, इसकी अंतिम जिम्मेदारी भी आयुक्त ही पर निर्धारीत होती है। इस दृष्टीसे आयुक्त इस बात को संजीदगी से ले, और संजीदगी से लेकर के अगले सभागृह मे जो उत्तर देने के बात कही गयी है वह भी इसीलिये कही गयी है कि, एक व्यक्ती को हमने कितने अधिकार देने चाहिये, और उसकी कार्यक्षमता कितने कामो को संपादीत करने की है, एक व्यक्ती जितने काम कर सकता है उससे ज्यादा अगर उसको अधिकार दे दिये तो नैसर्गिक रुपसे वह किसी न किसी बात को सेकंडरी ले जायेगा, और सेकंडरी उसी बात को ले जायेगा, जिस चिज का वह तज्ञ न हो, और यही हाल नागपूर महानगरपालिका मे आयटी का हो रहा है, इसलिये आयुक्त महोदय बडी संजीदगी के साथ मे इस विषय पर निर्णय ले, और निर्णय लेते समय सभागृह के अगर किसी सदस्य ने प्रश्न पुछा तो उसको व्यक्तीगत न ले। जब भी आप किसी विषय को व्यक्तीगत लेकर के उत्तर देंगे तो कही न कही उसमे तकलीफे होंगी, इसलिये प्रशासन के प्रमुख की हैसियत से आप उत्तर दे यह भी निर्देश आयुक्त को दिये जाते है और आयटी के संदर्भ मे एक अच्छा निर्णय लेकर के एक अच्छा अधिकारी नियुक्त करे, ऐसे निर्देश आयुक्त को दिये जाते है।

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विषयाशी संबंधित एक निर्णय अपेक्षित आहे. मी जी माहिती घेतली त्यानुसार केंद्र सरकारकडून 14 करोड रुपये आले होते, त्यामध्ये 64 मॉडयुलर होते. त्यापैकी 10

मॉडयुलर एक्झक्युट केलेले आहेत. उरलेले मॉडयुलर व्हायचे आहेत आणि मधल्या काळामध्ये ज्या एजन्सीला काम दिले होते ते पळून गेले. तो पैसा नागपूर महानगरपालिकेकडे जमा असेल. एकतर तो पळून गेला त्याचा पेमेंट त्याच्याकडून रिकव्हरी करावी आणि जो पैसा जमा असेल त्याच्यातून उरलेले मॉडयुलर पुर्ण करण्याचे निर्देश मा.महापौरजी या ठिकाणी दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, आपण जे स्टेटमेंट दिलेले आहे त्यामध्ये मला एक गोष्ट ॲड करावयाची आहे. आपण जे डाक्युमेंटेशन डिजीटायलेशन साठी म्हणतो आहे. आपल्या केंद्रातून एक सुंदर डिजीट ॲप अव्हेलेबल करुन दिलेले आहे  आणि तो ॲप फ्री आहे आपण सगळे तो वापरु शकतो. त्याच्यामध्ये 2 जीबी डेटा फ्रीमध्ये मिळतो. त्या 2 जीबी डेटामध्ये आपण स्कुल डाक्युमेंटेशन आरामात करु शकतो. मा.महापौरजी, आपल्याद्वारे प्रशासनाला विनंती आहे की प्रशासनाने संपुर्ण महानगरपालिकेच्या शाळेमध्ये मुलांसाठी डिजीट ॲप उपलबध करुन दिला पाहिजे. त्यांचा अकाऊंट शाळेतील टिचरने बनवून दिला  पाहिजे.  हे फार ईजी आहे आणि त्याचे डाक्युमेंट ते चांगल्या प्रकारे ठेवू शकतील. कोणतीही कॉस्ट त्यासाठी लागत नाही त्यामुळे बजेट प्रोव्हीजन होत नाही तोपर्यंत दुसरे जे ऑब्शन आपल्याकडे उपलब्ध आहे आणि सेफटीच्या हिशेबाने ते केले पाहिजे अशी विनंती मला आपल्या माध्यमातून करायची आहे.

महापौर:- परिणीता ताईने जो सुचना की उस सुचना के  अनुरुप महानगरपालिका ने अपना कार्यान्वित तुरंत प्रारंभ करना चाहिये ऐसे आयुक्त को निर्देश दिये जाते है

मो.जमाल:- मा.महापौरजी, परिणीता ताईने जो विषय लिया है उसमे एक सुचना है, नागपूर महानगरपालिका मराठी, हिंदी और उर्दु की स्कुले चलाती है, ज्यादा तर रेकार्ड यह उर्दुमे दर्ज है उसमे रेकार्ड मांगा जाता है तो उर्दुमे दिया जाता है डिजीटायलेजन के समय मे इस बात पर ध्यान दे  जो रेकार्ड है उसको चेंज करके मराठी या हिंदी मे किया जाये दुसरा विषय ऐसा है मा.महापौरजी,  ज्यादा तर पुराने स्कुले है नागपूर महानगरपालिका की बंद हो चुकी है उसका रेकार्ड इधर उधर दुसरे स्कुलो मे शिफ्ट किया गया है, इसकी वजह से रेकार्ड ढुंढने मे बहोत परेशानी होती है इसलिये संपुर्ण डाटा एकही जगह दिखे ऐसी डिजीटायलेझन की व्यवस्था की जाये ऐसी मेरी सुचना है मा.महापौरजी,

महापौर:- मा.सदस्य श्री.मो.जमाल इन्होने जो सुचना की है, जब डिटीलायझेशन हो जायेगा तो सारा का सारा रेकॉर्ड एक जगह रहना चाहिये, उसको कोई भी व्यक्ती किसी भी समय नेट पर देख सकता है, उस दृष्टीसे प्रशासन आवश्यक कारवाई करे ।उन्होने कहा क, उर्दु का रेकॉर्ड हिंदी, मराठी मे मांगा जाता है, इस दृष्टीसे शासन के क्या नियम है प्रशासन उसकी तहकीकात करे, और संभव हो तो उसको ट्रांस्लेशन करने के प्रयास करे। मासत्तापक्ष नेते., श्री अविनाशजी ठाकरे ने जो बात कही है कि, हमने जो टेंडर दिये थे, उसमे जो माडयुअल दिये गये थे, उनपर काम हुआ है या नही इसका सखोल विवरण माआयुक्त महोदय तैयार . करे, संबंधित व्यक्ती को पुर्ण पेमेंट हुआ है या नही हुआ इस बात का भी सखोल विवरण माआयुक्त महोदय. तैयार करे, और आनेवाले सभागृह मे इन सारी चिजो की जानकारी महानगरपालिका के पटल पर रखे, हमने जो टेंडर दिया था, शासन से निधी प्राप्त होने के बाद ईगर्व्हनेंस के लिये उसके सारे माडयुअल का काम -

हुआ है या नही, अगर सारे माडयुअल पर काम नही हुआ है तो उसे पेमेंट कितना दिया गया है, अगर पेमेंट नही दिया गया है तो पेमेंट बचा है क्या ? अगर बचा हुआ है तो वह उस काम मे आसकता है क्या ? उस दृष्टीसे भी हम लोग नियोजन करे I अगर पेमेंट नही बचा हुआ है, हमने उसको पुरा पेमेंट दे दिया तो बगैर काम हुऐ पेमेंट कैसे दिया, इस बात की तपशील पुर्णत सभागृह के समक्ष रखे :I साथ ही साथ मे क्या महानगरपालिका ने अपने सारे रेकॉर्ड को डीटीलायझेशन करने के लिये राज्य सरकार से कभी पैसे मांगे है क्या ? अगर नही मांगे है और पैसो की ज्यादा आवश्यकता है तो आयुक्त महोदय इस विषय का भी एक प्रस्ताव तैयार करके राज्य सरकार के पास भेजे जिस कारण हम इन सारी चिजो को आनेवाले समय मे अगर पेपर ही नही रहेगा, पेपर गल गया होंगा तो उसमे से कांच की जगह ही अगर फंट गयी होंगी तो पेपर मांगने आनेवाले व्यक्ती के जीवन के साथ खिलवाड करने का हमको कोई अधिकार नही है I इसलिये डिटीलायझेशन के लिये अतिरिक्त पैसे मिलने की दृष्टीसे भी हम एक संपुर्ण विस्तारीत योजना बनाकर के पैसे मांगे, केवल पत्र लिखकर के पैसे मांगने की अपेक्षा संपुर्ण विस्तारीत योजना बनाकर के पैसे मांगे, और जो सूचना डीलॉकर के बारे मे प्रणिता ताईने की है .जी., हम उसमे रिवर्स पहले सबसे आखरी साल के रेकॉर्ड से डिटीलायझेशन करना शुरु करे, जिससे हम जो कागज गल रहे है, उन कागजो की माध्यम से आगे बढसके, इस दृष्टीसे आयुक्त महोदय काम करे, ऐसे उन्हे निर्देश दिये जाते है, माआयुक्त महोदय., अगली सभा मे जो पिछला ई-गर्व्हनस का टेंडर हुआ था, उसकी सखोल जानकारी सभागृह मे रखे, ऐसे उन्हे निर्देश दिये जाते है I

**<u>प्रश्न क्र.</u>** <u>295</u>:- महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्याच्या खोदाईची परवानगी कोण देते? या संदर्भात प्रश्न

श्रीमती प्रगती पाटील:- मा.महापौरजी, मा.सदन. मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळालेआहे आणि त्या उत्तरामध्ये समाधानी नाही. मा. महापौरजी, आपल्याला माहीतच आहे की रस्त्याच्या कामाकरिता आपल्याला किती पापड बेलावे लागतात. मा. आयुक्त फिक्स प्रायरिटीशिवाय कोणत्याही रस्त्याच्या फाईलीवर सही करतांना दिसत नाही. नागपूर शहरामध्ये कोणीही यावे आणि रस्ता खोदून जावे हे चित्र मात्र नागपूर शहरातील दिसत आहे. मा.महापौरजी, मला जे प्रश्नाचे उत्तर मिळाले त्यामध्ये असे नमुद करण्यात आले की काही रस्त्याची खोदण्याची परवानगी हॉटमिक्स प्लॉटंकडून दिली जाते. त्याची मौका तपासणी केली जाते. परंतु माझ्या माहितीप्रमाणे हॉटमिक्स प्लाँटद्वारे कोणतीही मौका तपासणी केली जात नाही. ते येतात आणि सरळ रस्ते खोदायला सुरुवात करतात. मा.महापौरजी, आपल्या वतीने माझी प्रशासनाला विनंती आहे की आपण प्रशासनाला असे निर्देश दयावे की हे रस्ते खोदत असतांना तेथिल स्थानिक नागरिकांना, स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेवून त्याची परवानगी झोनवाईज करण्यात यावी. पुर्ण नागपूर शहरामध्ये हॉटमिक्स देखरेख करु शकत नाही. आपण जर झोनवाईज परवानगी दिली तर चांगल्या प्रकारे याची देखरेख करण्यात येईल आणि नगरसेवकांना आणि आजूबाजूच्या नागरिकांना इन्वॉल केले तर हे काम चांगलया प्रकारे होईल. आपल्या रस्त्यांची जी दुरावस्था झालेली दिसत आहे ती दिसणार नाही.

रस्त्यांची दुरावस्था थांबविण्यासाठी प्रशासनाला निर्देश दयावे याची परवानगी झोनवाईज करण्यात यावी. याचे जे डिपॉझीट आणि कम्पलीशन सर्टीफिकेट जे असतात ते नगरसेवकांच्या एनओसी शिवाय आणि नागरिकांच्या एनओसीशिवाय देण्यात येवू नये असे निर्देश प्रशासनाला देण्यात यावे, धन्यवाद.

महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे. आपली नेमकी परंपरा काय आहे आणि कार्यवाहीची परंपरा काय आहे. हॉटमिक्स विभागाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्या श्रीमती प्रगती पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या अनुषंगाने हॉटमिक्स प्लॉन्टद्वारेॲक्च्युवल एमएसडीसीएल याला परवानगी देण्यात येते. जे खोदकाम करण्यात येते ते एमएसडीसीएल मार्फत परवानगी देण्यात येते आणि एमईसीबीचे चार्जेस घेण्यात येतात ते 2016 साली जो महानगरपालिकेचा टेंडर झाला होता त्याप्रमाणे 100 रुपये प्रती रनिंग स्केअर मीटर.....

श्री.प्रविण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, 2016 साली टेंडर झाला असे मॅडम सांगत आहेत. तो विशेष प्रकल्पासाठी झाला होता. तो सरसरकट सगळयांकरिता झाला नव्हता. ही सभागृहाची दिशाभूल आहे. तो जो टेंडर झाला होता तो एका विशेष प्रकल्पाकरिता झाला होता आणि तो प्रकल्प केव्हाच संपला आहे.

महापौरः- प्रशासन स्पष्टीकरण दे।

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. त्यामध्ये फक्त जे इलेक्ट्रिक केबल आहेत ते अंडरग्राऊन्ड करण्याबाबत.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, हा विषय सभागृहात आला होता. सभागृहाने काटेकोरपणे सांगितले होते. त्या प्रकल्पाचे नाव आठवत नाही. फक्त या प्रकल्पासाठी परवानगी दिलेली आहे. इतर कोणताही प्रकल्पाकरिता दिले गेलेले नाही. महानगरपालिकेने आर्थिक नुकसान महानगरपालिकेचे अधिकारी करीत आहे. चव्हाण मॅडम पीडब्लूडीच्या अधिकारी आहेत त्या प्रतिनियुक्तीवर आलेल्या आहेत. त्यांना जास्त कळते म्हणून त्यांना पाठविले आहे. या महानगरपालिकेच्या प्रतिनियुकतीवर आलेल्या अधिका-यांना महानगरपालिकेच्या अधिका-यापेक्षा जास्त कळते. ते जास्त अनुभवी आहेत त्यांनी जास्त काम केलेले आहे. आपल्याकडे त्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे त्यामुळे महानगरपालिकेची त्यांच्याकडून अपेक्षा आहे त्यांनी नीट माहिती दयावी.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, प्रगती ताई पाटील ने जो प्रश्न उपस्थित किया, की संबंधित जनप्रतिनिधी है उनकी एनओसी ली जाये। हमारे प्रभाग मे जो भी कंपनी आती है, वो केबल डक्ट कंपनी हो या अन्य कोई भी कंपनी हो उसको केंद्रीय कार्यालय से अनुमती दी जाती है। उसकी जानकारी झोन कार्यालय को दी नही जाती। जिसतरह अगर कोई गड्ढा खोद रहा है तो हम झोन कार्यालय से पता करते है तो झोन कार्यालय को इसका पता नही होता है। कंपनी अपना केबल डालने के बाद रिस्टोरेशन काम बराबर नही करती और फिर जो कम्पलेंट आती है वह हमारे तरफ आती है वह हमारे से संपर्क करते है। इसलिये आपको निवेदन करती हूँ की आप प्रशासन को निर्देश दे की नागपूर महानगरपालिका की हद मे आने वाली

सडको को किसी भी कामो लिये वह खोदता है उस कंपनी को राज्य शासन के माध्यम से टेंडर मिला हो, या अनय् अन्य डिपार्टमेंट के माध्यम से मिला हो, केबल या अन्य कोई भी काम के लिये रोड खोदते है तो मा.महापौरजी, उसको परमीशन केंद्रीय कार्यालय से देते वक्त झोन का इंटरफेअर आवश्यक है, झोन को माहिती होना आवश्यक है। साथ ही साथ जनप्रतिनिधी और विभाग के लोग उनको भी हो, जिसकी वजह से वह कंपनी अच्छे से काम कर करेगी। जिम्मेदारी से काम करेगी क्योंकि उनपर जनप्रतिनिधी का मॉनेटरींग रहेगा। जनप्रतिनिधी को तकलीफ हो रही है और जनका को जो तकलीफ हो रही है वह कम हो जायेगी और हमारे शहर की सडके जो कंपनी खोद कर चली जाती है,जिससे ॲक्सीडेंट होते है मा.महापौरजी, वह कम हो जायेगें इसलिये आपसे निवेदन करती हूँ मा.महापौरजी,आप प्रशासन को निर्देश दे। धन्यवाद

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, हा जो 100 रुपये स्केअर मीटर चा हा जो रेट आहे. आपण तपासून घ्यावे. आपले आर्थिक नुकसान होत आहे. ते एका विशिष्ट प्रकल्पाकरिता होते ते तपासुन घ्यावे. हा एमओयु एका विशिष्ट प्रकल्पकरिता होता, या एमओयुप्रमाणे इतर प्रकल्पाला परवानगी दिली गेली असेल तर तेवढे पैसे वसुल करावे. ज्या अधिका-यांनी याचे इंटरप्रीटीशन चुकीचे केले असेल, मा.आयुक्तांची जर इच्छा असेल तर कारण त्यांना अधिका-यावर कार्यवाही केलेली आवडत नाही. कोण काम करेल अशी त्यांना चिंता व्यक्त केली आहे. मा.महापौरजी, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. या आर्थिक नुकसानीकरिता जे जे जबाबदार असतील त्यांची चौकशी व्हावी. चुकीच्या पध्दतीने दिले असेल तर ते पैसे वापस मिळवावे अशी माझी विनंती आहे.

महापौर:- प्रशासनाने यावर सखोल उत्तर दयावे. हमारी क्या यंत्रणा है।

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. एमएसडीसीएल त्यांच्याकडून आपण 335 रुपये पर एनीव्हेशन आणि 6565 रुपये सेक्युरिटी डिपॉझीट घेत असतो. एमईसीबी करिता आपण 100 रुपये प्रती स्केअर फुटाने परमीशन देतो.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, परत एकदा मी अधिका-यांना मा.महापौरजीच्या माध्यमातून विनंती करतो. त्या स्कीमचे नाव आयपीडीएस होते. इन्ट्रीग्रेशन पॉवरमेंट स्कीम या स्कीम पुरतेचे परवानगी दिली होती. त्या स्कीम अंतर्गत कामे सुरु आहेत काय?

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. आयपीडीएस सेल मार्फत जे सब्मीशन देतात ते झोन मार्फत कार्यकारी अभियंता देत असतात आणि जे प्रपोजल येतात ते आयपीडीएस या स्कीम मधूनच 100 रुपये प्रती रनिंग मीटरने दिले जाते.

श्री.प्रविण दटके:- मा.महापौरजी, आता त्यांनी जबाबदारी झटकली. ही सर्व जबाबदारी झोनवर टाकली. या सर्व प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. मा.महापौरजी, आयपीडीएस स्कीम संपलेली आहे. या प्रकरणांत सखोल चौकशी व्हावी. मा.आभाताई पांडे, मा. प्रगतीताई पाटील यांनी जे सांगितले. अनेक लोकांना अडचणी आहेत. आपल्या नागपूर शहरातील मा. जेष्ठ कलावंत इलकुंजीवार साहेब यांच्या घरासमोर 15-15 फुटाचे खड्डे पडलेले आहेत. आयपीडीएस स्कीमचे काम आहे नाही आहे मात्र आपले महानगरपालिकेचे

नुकसान होत आहे. मी आपल्याला विनंती करतो, आयपीडीएस स्कीम पुर्ण आहे किंवा नाही आहे ते कृपया तपासावे अशी माझी प्रशासनाला विनंती आहे. आपण आदेश दयावे. मा.महापौरजी, अजून एक आपल्याला विनंती करतो, जे रस्ते महानगरपालिकेचे आहेत त्या रस्त्याचे एक्झक्युशन महानगरपालिका करते. कृपया प्रशासनाला हात जोडून आपल्यामार्फत विनंती आहे, तेथे बोर्डावर मेटेंन्स बाय एनएमसी असे लिहिण्यात यावे त्यामुळे इतर रस्त्याची जबाबदारी आपल्यावर येणार नाही. त्या रस्त्याची खोदण्याची जबाबदारी त्या त्या विभागावर राहील.

श्री.अविनाश ठाकरे:-मा.महापौरजी, याच्या सोबत जोडून एक निवेदन आहे. विभागाने केलेल्या खड्डयाच्या बाबत आपण चर्चा करीत आहे. परंतु आऊटर भागामध्ये अनेक घरे बनत असतांना इलेक्ट्रिक कनेक्शन करीत असतांना अनेक रस्त्यावर खड्डे होत असतात त्याची माहिती सुध्दा प्रशासनाला राहत नाही. या संदर्भात आपल्या स्वच्छता विभागाचे बीटस् पाडलेले आहे. जमादार त्या बीटस् वर फिरत असतात. यांच्या माध्यमातून माहिती संकलित करुन त्यांनी सुध्दा पैसे भरणे अपेक्षित आहेत. रिस्टोरेशन करणे आवश्यक आहे. या विषयावर सुध्दा निवेदन करावे.

श्रीमती रुपा रॉय:- मा.महापौरजी, रिलॉयन्स, जीओ और बीएसएनएलद्वारा भी जगह जगह गड्डे खोद कर रखे है उसपर भी आप निर्देश दे।

महापौर:- चव्हाण मॅडमनी उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. रिलॉयन्स आणि जीओ करिता ऑप्टीकल फायबर्स केबलकरिता परवानगी आहे ती हॉटमिक्स परवानगी देत असते. सुपरव्हिजनकरिता 1335 रुपये आणि सेक्युरिटी डिपॉझीट 6565 रुपये त्यांच्याकडून वसुल करीत असतो. एसडीएस पध्दतीने करणे त्यांच्याकडून कंम्पलसरी आहे.

महापौर:- प्रशासन यह जानकारी दे की नागपूर म्युनसिपल कार्पोरेशन की केबल डक्ट पॉलिसी कभी बनी थी क्या? और हम केबलवालो को जब अनुमती देते है तो क्या केबल डक्ट पॉलिसी के अनुरुप देते है की विपरीत देते है। उसका भी सभागृह के समक्ष स्पष्टीकरण दे।

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. महानगरपालिकेची केबल डक्ट पॉलिसी तयार झालेली आहे. त्यानुसारच त्यांना परवानगी देत असतो. त्याच्यामध्ये जे सगळे रुल्स आणि रेग्युलेशन आहेत त्यांना धरुनच परवानगी देतो.

महापौर:- केबल डक्टच्या माध्यमतून महानगरपालिकेला काय रेव्हेन्यु मिळाला त्याची सुध्दा माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. मागील दोन वर्षामध्ये 60 कोटी रुपये जमा झालेले आहेत.

महापौर:- माझा हा प्रश्न नाही आहे. रस्ते खोदण्याकरिता आपण किती पैसे घेतले. केबलचा डक्ट कुणीतरी एजन्सी वापरत आहे त्याच्याकडून किती रेंट मिळाला आहे असे किती पैसे आहेत.

कार्यकारी अभियंता(श्रीमती सोनाली चव्हाण):- मा.महापौरजी, मा.सदन. किती कंपन्यांनी आपले केबल डक्ट युझ केलेले आहेत त्याची माहिती सध्या नाही आहे. झोनकडून मागवून मी आपल्याला देते.

महापौर:- शहर मे गढढे इस विषय को लेकर के महानगरपालिका के बारे मे अखबारो के माध्यम से बडी प्रमाण मे बातमी प्रकाशित होती है, जिसमे महानगरपालिका की काफी बदनामी होती है। प्रशासन इस बात की जानकारी दे कि, नागपूर महानगरपालिका की केबल डक्ट पॉलिसी कभी बनी थी क्या ? और हम इन केबल वालो को जब अनुमती देते है तो क्या केबल डक्ट पॉलिसी के अनुरुप देते है या उसके विपरीत देते है, उस बात का भी सभागृह के समक्ष स्पष्टीकरण दिया जाये। केबल डक्टच्या माध्यमातुन महानगरपालिकेला किती उत्पन्न प्राप्त झाले, त्याची सुध्दा माहिती देण्यांत यावीरस्ते खोदण्यासाठी किती . पैसे घेतले हा विषय नाही, आपल्या केबल डक्टचा कोणी तरी वापर करीत आहे, त्याचे किती पैसे आपल्याला मिळाले आहेविषय अत्यंत गंभीर है महानगरपालिका ने डक्ट पॉलिसी इसलिये बनाई थी . कि, शहर के रस्तो को बार बार न खोदना पडे, इस सभागृह की चर्चा मे इससे पहले भी यह विषय आया है कि, हमारे जहा डक्ट है वहां पर हमने अलग से गढढे खोदने की अनुमती दी है, अर्थात एक तरफ हमने अपने रेव्हेन्यु का नुकसान किया और दुसरी तरफ सडक को खोदने की अनुमती देकर के दोबारा अपने रेव्हेन्यु को खर्चा करने का नया रास्ता भी बनाया। प्रशासन अगर हमारे पास योजना बने होने के बावजूद उसको अमुलाग्र रुपसे स्विकृत न करते हुऐ अपनी सुविधा से उसका इंटरपिटीशन करता है तो ऐसे समस्त अधिकारीयो पर आयुक्त ने तुरंत कार्यवाही करना चाहिये, और हमने केबल के अंतर्गत जहा गढढे खोदने की अनुमती दी है, वहां हमारा डक्ट है और दुसरे व्यक्ती ने अगरवहां खोदा है तो इसकी जिम्मेदारी निश्चित करके उससे पैसे वसुल करने का निर्णय भी आयुक्त ने अपने निर्णय मे लेना चाहिये। विशेष रुपसे पुराने समय मे महानगरपालिका मे एक परंपरा थी, जिसमे डिपॉझीट के नाम से हमारे पास एक हेड होता था, जिस एरीआ मे गढढे खोदे गये है पैसे जमा रहते थे, और उस जमा पैसे से उसका रिस्टोरेशन करने की व्यवस्था हम करते थे, नई पॉलिसी के अंतर्गत हमने उस ठेकेदार को ही यह जिम्मेदारी दे दी है कि, वह रिस्टोरेशन करे, और जबसे ठेकेदार को जिम्मेदारी दी गयी है, तबसे ही रिस्टोरेशन का काम बरोबर नही हो रहा है, इसलिये रिस्टोरेशन अगर बरोबर न हो तो एक बारीश के बाद मे हम जो लेव्हलींग करते है, उसमे मटटी का तह निचे जम जाने के कारण हम कंपेशन परॉपर नही करते है, जिसके कारण फिरसे नाले जैसे गढढे वहां हो जाते है, जिससे बार बार वहां अपघात होते है, इसलिये महानगरपालिका ने अपनी योजना का पुर्नविलोकन करना चाहिये, रिस्टोरेशन के काम पर ध्यान देने के लिये एक निश्चित यंत्रणा होनी चाहिये, हमारी टॅक्नालॉजी डेव्हलप है, हम रस्ता खोदते समय उसका गुगल इमेज ले ले, और रस्ता खोदने के बाद रिस्टोरेशन का गुगल ईमेज ले ले अगर रिस्टोरेशन परॉपर नही हुआ है तो उसे दोबारा करने का एग्रीमेंट करते समय एमयुओ करते समय हम लोग प्रावधान रखे तो हम इन सारी त्रासदीयो से बच सकेगें और किसी भी प्रकार के गढढे न हो इस दिशा मे आगे बढ सकेगे। हमने रिलायंस को पहले ४ जी के लिये अनुमती दी,

अभी रिलायंस को हम ५ जी के लिये अनुमती दे रहे है, इसके आगे फिर ६ जी आजायेगा हम फिर से अनुमती देगें, इसलिये यह सारी अनुमती देते समय हमारी डक्ट पॉलिसी जो है, उसका अगर हमने नियोजन किया और नई अनुमती देते समय हमने उसे केबल डालने की अपेक्षा डक्ट बनाने के लिये तैयार किया तो उसके खर्च से डक्ट बनेगा और उस डक्ट का उपयोग करके महानगरपालिका बाकी के डक्ट मे उपलब्ध पाईप के अनुरुप अपना रेंट ले सकेगी, इस दृष्टीसे भी नियोजन संभव है I महानगरपालिका ने अपनी डक्ट पॉलिसी के अनुरुप इन गढढो को खोदने के लिये जितने भी केबल डाले है, उसके संदर्भ मे निर्णय ले, प्रविणजी ने जो बात कही कि, हमने एमएसईडीसीएल के साथ मे जो एग्रीमेंट किया वह किस प्रकल्प के लिये किया था, सभागृह के उस प्रस्ताव का अध्ययन किया जाये, उस अध्ययन करने के पश्चात यह भी देखा जाये कि कही प्रशासन की गलती के कारण एमएसईडीसीएल उस योजना के नाम का उपयोग करते समय बाकी जगह तो उसका फायदा नही ले रहा है, यह भी देखा जाये, अगर एमएसईडीसीएल ने इस प्रकार से प्रशासन की दिशाभुल की है तो जितनी भी अनुमती हमने उन्हे उस प्रकल्प के अंतर्गत दी है उसकी जो अतिरिक्त डिमांड है वह एमएसईडीसीएल को हम दे I नागपूर महानगरपालिका अगर पोल हटाने जाती है, केबल डालने जाती है, या रास्ता डेव्हलपमेंट मे ट्रांस्फार्मर हटाती है तो एमएसईडीसीएल नागपूर महानगरपालिका से वर्तमान रेट के अनुरुप पैसे लेती है, अगर एमएसईडीसीएल नागपूर महानगरपालिका को किसी प्रकार का रिलॅक्सेशन नही देती है तो हमने एमएसईडीसीएल को रिलॅक्सेशन देना गलत है, हमारी चर्चा जो होनी चाहिये वह टु वे होनी चाहिये, अगर हम उन्हे फायदा दे रहे है तो महानगरपालिका को भी फायदा होनी चाहिये, इस प्रकार से उस विषय को हमने रिवाईज करके अपने फायदे की दृष्टी से भी बात करनी चाहिये, और हम जो अभी उस योजना के अंतर्गत निर्णय ले रहे है तो वह सारे काम उस योजना के अंतर्गत है क्या ? इसकी तपासणी आयुक्त ने करनी चाहिये, अन्यथा उनको अतिरिक्त डिमांड देनी चाहिये, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है और मारखने के आयुक्त महोदय ने इस बात पर निगरानी. लिये, कारण यह बहुत गंभीर विषय है, इसके लिये एक टास्क् फोर्स बनाना चाहिये, जिस प्रकार से अविनाशजी ठाकरे ने कहां कि, आउटर एरीआ मे रोड की खुदाई हो जाती है और महानगरपालिका को पता नही लगता, मैं आउटर एरीआ की क्या बात कहुं, नॅशनल हायवे पर खुदाई हो जाती है और महानगरपालिका को पता नही चलता, अगर हमे पानी की लाईन डालना है तो हम तीन तीन महिने अनुमती मांगते है और केबल डालना है तो केबल डालनेवाला गढढा खोदकर चला जाता, और हमे मालुम नही होता है, इन सारी यंत्रणाओ की जानकारी रखने के लिये एक टास्क फोर्स का निर्माण करने का निर्णय आयुक्त महोदय ने लेना चाहिये, ऐसे उन्हे निर्देश दिये जाते है I

**प्रश्न क्र.** 296:- आसीनगर झोन अंतर्गत सफाई स्थायी व अस्थायी कर्मचारी संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त:- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र.** 297:- प्लॉट नं ७१ .ब पी हाऊसिंग सोसायटी .ऑप-को .जी.एम.संदर्भात प्रश्न

महापौर:- संदीप जोशीजी का पत्र आया है उनकी तबीयत खराब होने के कारण वह जॉईन नही हो सकते इसलिये सभागृह के पटलपर यह प्रश्न कायम रखा जाता है l

**<u>प्रश्न क्र</u>**. <u>298</u>:- नागपूर शहरात पावसाळी नाली व गडर लाईनच्या चेंबरची काही मोजदाद आहे का? या संदर्भात प्रश्न

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, प्रशासनाने जे उत्तर दिले आहे आणि त्यात जे आकडे दिले आहेत. माझा स्पष्ट आरोप आहे की हे सगळे आकडे फसवे आहेत. माझ्या घराच्या पाठीमागे जेव्हा मी एका चेंबरचा शोध घेतला. ते चेंबर प्रशासनाला सापडलेलेच नाही. मग जेव्हा सापडलेले नाही तर हे आकडे कसे दिलेले आहेत. ही प्रशासनाने केलेली दिशाभूल आहे. असा माझा स्पष्ट आरोप प्रशासनावर आहे. त्यामध्ये माझा दुसरा प्रश्न आहे,चेंबरच्या झाकणाचा काही आकार ठरलेला आहे काय? तर दोन प्रकारचे झाकणे ठरविलेले आहे अशी माहिती देण्यात आली. मला आपल्याला सांगावेसे वाटते की हे माझ्या मोबाईलवर चित्र बघा, गडरच्या झाकणाची काय कंडीशन आहे. त्या रस्त्यावर गेले तर गडरमध्ये पडल्याशिवाय राहणार नाही. अत्यंत खेदजनक परिस्थिती आहे. नागपूर शहरातील गडरच्या चेंबरची परिस्थिती अत्यंत खराब झालेली आहे. गडरच्या चेंबरची दोन प्रकारची झाकणे तयार केली तर एका झाकणावर दुस-या प्रकारचे झाकण कसे ठेवण्यात आलेले आहे. ते झाकण कधी पडले आणि कधी तो खड्डा तयार होईल हे सांगता येत नाही. मा.महापौरजी, माझा स्पष्ट असा आक्षेप आहे की प्रशासनाचे या चेंबरच्या झाकणाकडे अजिबात लक्ष नाही. माझ्या प्रभागातीलच नव्हे तर संपुर्ण नागपूर शहरातील हा विषय आहे. चेंबरची झाकणे, पावसाळी नालीवरील चेंबरची झाकणे याकडे प्रशासनाचे अजिबात लक्ष नाही. मला प्रशासनाकडून उत्तर मिळाले आहे चेंबरची झाकणे पुरविण्याची जबाबदारी आवश्यकतेनुसार बदलविण्याचा प्रस्ताव आला तर आम्ही बदलवू. मला सांगा मा.महापौरजी, आवश्यकते नुसार म्हणजे यात पळवाट आली नाही काय? आवश्यकतेनुसार म्हणजे केव्हा माणुस पडल्यावर, आज या सदनामार्फत मी आपल्याला नम्र विनंती करते की, आपण रुलिंग दयावे, या नागपूर शहरातील चेंबरची परिस्थिती चांगली व्हावी यासाठी आपण काही मार्गदर्शन करावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, चेंबरच्या झाकणाच्या संदर्भात मा.सदस्या श्रीमती नंदाताई जिचकार यांनी जो मुद्दा मांडला आहे. मा.महापौरजी, चेंबरचे साईज आाणि झाकणे, त्याच्यामध्ये पावसाळी नाल्यावरील जे चेंबर आहे आणि त्याचा साईज आहे त्याचे जे ओपनिंग आहे ते जासतीत जास्त रस्त्यावरील पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने ते साईज त्या ठिकाणी ठेवतो. सिवर लाईनचे जे चेंबर आहे हा आकार आपण सिवरलाईनची खोली किती आहे. पाईपलाईनचा व्यास किती आहे या अनुषंगाने चेंबरचा आकार निश्चित करतो. त्यानंतर त्याच्यावरती ठेवणारी झाकणे, साधारणत: तीन प्रकारच्या आकाराची झाकणे आपण ठेवतो आहे. त्यामध्ये इंन्टेरियर सिवरलाईन असेल त्याच्यावरती सिमेंट क्रांक्रीटची झाकणे ठेवतो. रस्त्यावरील चेंबरवर झाकणे ठेवावयाची असेल तर व्हीआय किंवा एसएफसीआरसी कव्हर ठेवतो. या प्रकारची झाकणे आपण त्या ठिकाणी ठेवतो. सर्व प्रकारची झाकणे उपलब्ध आहेत. प्रत्येक झोनला झाकणे उपलब्ध आहेत. कार्यकारी अभियंता यांना सुचना देवून या संबंधिचा ड्राईव्ह घेवून ज्या चेंबरवरील

झाकणे तुटलेली आहेत त्या चेंबरवरती झाकणे टाकण्याच्या संदर्भात निर्देश देतो.

महापौर:- नंदाताईने एक फोटो दाखविला की एका चेंबरवर दोन झाकणे पडलेले आहेत. आपण म्हटले की आपल्याकडे झाकणे उपलब्ध आहेत तर त्या साईजचे झाकण न ठेवता चेंबरच्या मेनहोलवरती आपण दुसरे झाकण कां ठेवले.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, जी झाकण मला पिक्चरमध्ये दिसली त्यामध्ये होल्स आहेत ते स्ट्रार्म ड्रेनवरील झाकण आहे. त्यामुळे जास्तीत जास्त पाण्याचा निचरा व्हावा म्हणून दोन झाकणे ठेवलेली आहेत. सिवरलाईनवरती साधारणत: आपण एकच झाकण ठेवतो.

महापौर:-स्टार्म वॉटर लेनवर सिंगल झाकण कां येवू शकत नाही. ते सांगा. एका चेंबर वर दोन झाकणे कां ? सर्व चेंबर वरती दोन झाकणे असले पाहिजे. ती जी फोटो दिसत होती त्या फोटोमध्ये चेंबरची जी केव्हीटी असते जेथे झाकण आपण ठेवतो. त्यापेक्षा वरती ठेवलेले झाकण दिसत आहे. कॅव्हीटीमध्ये ते फिक्स नाही आहे. याचा अर्थच असा आहे की आपण वेगळया ठिकाणचे झाकण आणून तेथे ठेवले आहे. चेंबर रिट्रॅनग्युलर साईज आहे आणि दोन्ही झाकण आहे ते स्केअर साईजचे आहे असे फोटोमध्ये दिसत आहे.

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, ही बाब तपासून घेण्यात येईल. मा.महापौरजी, अशा प्रकारची रिट्रॅनग्युलर साईजची झाकणे स्केअर साईजच्या अनुषंगाने ठेवलेली असतील. त्या ठिकाणी त्या त्या साईजचे झाकणे ठेवण्याचा ड्राईव्ह घेण्यात येईल.

महापौर:- आयुक्त चंद्रशेखर यांच्या काळामध्ये आयआरडीपी रस्त्यावरील ज्या पावसाळी नाल्या बनलेल्या आहेत. त्याची झाकणे महानगरपालिकेकडे उपलब्ध आहेत काय?

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, आयआरडीपीच्या नाल्या आपण सिमेंट रस्त्यामध्ये घेतलेल्या आहेत. ती झाकणे बदलविलेली आहेत.

महापौर:- सी.ए. रोड बद्दल सांगावे. अव्हेलेबल आहेत म्हणून आपल्याला विचारले आहे. आयआरडीपीची नाल्यावरील झाकणांचा साईज वेगळा आहे ती झाकणे उपलब्ध आहेत काय?

अधिक्षक अभियंता(श्री.तालेवार):- मा.महापौरजी, झोन स्तरावरुन आवश्यकतेप्रमाणे झाकणे बदलविण्यात येतात.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, कार्यालयाने आपली चुक कबुल करावी की त्यांनी चुकीच्या पध्दतीने झाकणे ठेवलेली आहेत. बनवाबनवी त्यांनी करु नये.

महापौर:- श्रीमती नंदाताई का जो विषय है वह अत्यंत गंभीर है, नागपूर महानगरपालिका मे चेंबर का कव्हर ठिक न होने के कारण एक बच्चा नंदनवन मे बहकर के गया, और उसके प्राण गये, इस प्रकार की घटना शहर मे कही पर भी हो सकती है, इस दृष्टीसे चेबर के कव्हर पर विशेष रुपसे ध्यान देना चाहिये। एसएफआरसी कव्हर के बारे मे उत्तर मे जानकारी है, एसएफआरसी कव्हर की जो क्वॉलिटी है, वह क्वॉलिटी अच्छी न होने के कारण उसपर से गाडीयाँ जाने के बाद एसएफआरसी कव्हर तुंट जाते है,

महानगरपालिकाने गतवर्ष मे कितने एसएफआरसी कव्हर डाले, और उसमे से कितने टिके हुऐ है, उसपर ध्यान देना चाहिये। मैं एक बात का विशेष उल्लेख करना चाहता हुँ कि, १९९९ मे ट्रांस्पोर्ट एरीआ मे गांधीबाग मे एसएफआरसी कव्हर मेरे प्रभाग मे डाले गये थे, और माआयुक्त का जो एमरजंसी हेड है., उसमे से वह चेंबर्स बने थे, और एक एक चेंबर ९०-९० हजार रुपये का बन रहा था, इसलिये तत्कालीन आयुक्त रामटेकेजी ने उसका निरीक्षण किया था कि, आप कुवॉ बनारहे है या चेंबर, वह एसएफआरसी के कव्हर जो १९९९ मे डाले गये थे, ट्रांस्पोर्ट एरीआ होने के बाद आज भी वह कव्हर जैसे कि, वैसे है बदलना नही पडा, और यहां हर छे महिने मे एसएफआरसी के कव्हर बदलने पडरहे है, क्या एसएफआरसी के नाम पर महानगरपालिका की फसवणुक तो नही होरही है, हमारे क्वॉलिटी कंट्रोलने इसपर ध्यान देना चाहिये, उस दिशा मे सक्षम अधिकारी ने त्वरीत कार्यवाही करनी चाहिये, आयुक्त को भी यह निर्देश दिये जाते है कि, आयुक्त ने एसएफआरसी झाकण के बारे मे विशेष ध्यान देना चाहिये, हमारा यहां चेंबर्स पर हम जो कव्हर डालते है उसकी भी प्रिक्व्हेंसी देखना चाहिये कि, चेंबर्स पर हमने कितने बार कव्हर डाले, अगर एक ही चेंबर पर हमको बार बार कव्हर डालना पड रहा है तो इसका मतलब है कि उस कव्हर की क्वॉलिटी ठिक नही है और वह बार बार टुंट रहे है, तो इस दृष्टीसे चेंबर्स के कव्हर की क्वॉलिटी ठिक होनी चाहिये इस दिशा मे भी हमने ध्यान देना चाहिये और यह समय निर्णय लेने का है कि, तुरंत हम शहर के जितने भी चेंबर्स है उनपर कव्हर उपलब्ध है या नही उस दिशा मे काम करे, श्री तालेवार इन्होने सभागृह के पटल पर यह स्विकृत किया है कि, चेंबर्स के कव्हर झोन मे उपलब्ध है, तो कम से कम हर झोन से दो दो कव्हर लाकर हमारी क्वॉलिटी कंट्रोल लॅब मे हमने उसको चेक कर लेना चाहिये, और एसएफआरसी कव्हर की जो भी क्लीप आती है, उसको चेक किये बगैर हमने नही लगाना चाहिये, ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है, श्रीमती नंदाताईने जो प्रश्न उठाया है इस विषय को लेकर के संजीदगी से प्रशासन कारवाई करे। सिमेंट रोड पर भी कव्हर डालते समय हम जो एसएफआरसी कव्हर डालते है मैं वारंवार एसएफआरसी कव्हर का उल्लेख कर रहा हुँ, मैं सन २०१२ मे स्थायी समिती का अध्यक्ष था, उस समय स्थायी समिती के माध्यम से निर्णय लिया गया था सभागृहाने उस निर्णय को मंजूरी दी थी कि, हम चेंबर्स कॉक्रिट के बनायेगे और उसके ऊपर डक्ट आयरन के कव्हर लगायेगें, सिमेंट रोड का इस्टीमेट बनाते समय हम उसमे डक्ट आयरन के कव्हर लेते ही नही है, और इस्टीमेट बनाते समय रोड तो पुरा नया बन जाता है, और कव्हर जो इतने वर्षो से वापरा गया है वह वही का वही रहता है, एखादा सी आय का कव्हर अच्छा है और हमने उसको वापर लिया तो समझ.मे आता है, लैकिन एसएफआरसी का पुराना कव्हर हम वहां पर लगा देते है रोड टकाटक हो जाता है और वह चेंबर का ढक्कन निचे चला जाता है, कारण गतीशीलता के कारण वहां बडे वाहन आ जाते है यह सारी चिजो की प्रॅक्टीकल अडचण को ध्यान देते समय हम इस्टीमेट बनाते समय ही सिमेंट रोड पर डक्ट आयरन के कव्हर ले, इस प्रकार के निर्देश भी दिये जाते है, और जहा जहा कव्हर नही है, प्रशासन उसका एक सर्व्हे करे, सर्व्हे करके उन सारी जगहो पर डक्ट आयरन के कव्हर लगाये, या एसएफआरसी के हेवीडयुटी कव्हर

लगने चाहिये, इस प्रकार के निर्देश दिये जाते है l

महापौर:- एक स्थगण प्रस्ताव है, कृपया निगम सचिव ने स्थगण प्रस्ताव का वाचन करे l

निगम सचिव:- स्थगण प्रस्तावाचे वाचन केले

<u>स्थगण प्रस्ताव</u>

महापौर:- सन्माननीय सदस्य संजय बंगाले स्थगण प्रस्ताव त्यांनी ठेवला परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे या स्थगण प्रस्तावावर चर्चा होणार नाही.

महापौर:- कृपया अहवालाचे वाचन करावे

निगम सचिव:- (अहवालाचे वाचन केले.)

1. मा. सदस्यांनी महाराष्ट्र राज्य शासन द्वारा मुंबई महानगरपालिका अंतर्गत येणा-या 500 चौरस फुट मालमत्तेवरील मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय घेतला गेल्यामुळे शहरातील अनेक नागरिकांनी मुंबई प्रमाणे नागपूर महानगरपालिका अंतर्गत येणा-या 500 चौरस फुट ( 46.46 चौरस मिटर) च्या रहिवासी मालमत्तेचे कर माफ करण्यात यावे अशी मागणी करीत आहे अशी माहिती दिली. या मागणीवर उपस्थित सदस्यांनी चर्चा करीत ही मागणी योग्य असून 500 चौरस फुट ( 46.46 चौरस मिटर) अंतर्गत रहिवासी मालमत्तेचे मालमत्ता कर माफ करावे या विषयावर चर्चा करुन हया ठरावाला सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यांत आली

उपरोक्त ठरावावर निर्णय घेण्याकरिता मा.महापौरजी, मा.सत्तापक्षनेता, मा.निगम आयुक्त् यांना समितीतर्फे विनंती करण्यांत यावी, असे ठरले.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, प्रशासनाकडून काही माहिती अपेक्षित आहे. अशा किती प्रापर्टी आहेत या अहवालाच्या अनुषंगाने 50 चौ.मीटरच्या प्रापर्टी आहेत ज्यांना माफ करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. त्या दायीत्वात किती प्रापर्टी येतात, त्याच्या किती डिमांड जनरेट होतात आणि दरवर्षी किती रेव्हेन्यु जनरेट होतो याची माहिती पाहिजे होती.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. कर व कर आकारणी संकलन समिती यांनी जी शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने मा.सत्तापक्ष नेता यांनी माहिती विचारलेली आहे. जवळपास 2.50 लक्ष मालमत्ता ज्यांचे 500 चौ.फुट क्षेत्रफळ आहे म्हणजे 46.46 चौ.मीटर बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या रहिवाशी क्षेत्रातील 250 मालमत्ता आहेत ज्यांची वार्षिक मालमत्ता डिमांड 30 कोटीची आहे. सदरहू मालमत्तेवर जवळपास 90 कोटी रुपये एरियर्स येत आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, प्रशासनाला आपल्या माध्यमातून प्रश्न आहे की 90 कोटी रुपये किती वर्षापासूनचे आहेत.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. याचे वेगवेगळे बायफरकेशन आहे. कुणाचे 1970 पासून आहे. याचे वर्षनिहाय बायफरकेशन मा. सत्तापक्ष नेत्यांना लेखी उपलब्ध करुन देता येईल. काही लोकांकडे एक वर्षापासून असेल तर काही लोकांकडे 30-30, 40-40 वर्षापासून आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, एकंदरीत जो अहवाल आलेला आहे आणि प्रशासनाचे अहवालावर उत्तर येत आहे त्यावरुन असे लक्षात येते की हे  जे मालमत्ताधारक आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. हातावर पोट ठेवून भरणारे लोक आहेत. अनेक लोकांना टॅक्स भरण्यासाठी त्रास होतो. मा.महापौरजी, माझी सभागृहाला विनंती राहील की 30 कोटी रुपये हे महानगरपालिकेकरिता खुप मोठी रक्कम नाही. त्यातील बरीच रक्कम दरवर्षी एरियर्स मध्ये जमा होतो. त्यामुळे महानगरपालिकेला या रक्कमेमुळे भुर्दंड बसतो ही रक्क्म माफ केल्यानंतर अशी परिस्थिती नाही. आपण या अहवालाला मान्यता देवून महाराष्ट्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा त्याप्रमाणे राज्य सरकारने मुंबईमध्ये 500 स्केअर फुट आणि त्यापेक्षा कमी असलेल्या मालमत्तावरील कर संपुर्ण माफ केला आहे तसेच नागपूर शहरामधील 500 स्केअर फुट आणि त्याच्या पेक्षा कमी असलेल्या रहिवाशी मालमत्तांवरील संपुर्ण कर माफ करावा. अशाप्रकारचा अहवाल सभागृहात एकमताने निर्णय घेवून प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा अशी मी आपल्या मार्फत विनंती करतो आणि आपण त्याप्रमाणे निर्देश दयावे.

श्री. तानाजी वनवे:- मा. महापौरजी, सत्तापक्ष नेते श्री. अविनाशजी ठाकरे यांनी 500 स्केअर फुट आणि त्याच्या आंतमधील असलेल्या मालमत्तावरील कर नागरिकांचा माफ करावा त्या मताशी आम्ही सहमत आहोत. त्या ठिकाणी सगळे स्लमधारक आणि गरीब लोक येतात त्यामुळे आमची या प्रस्तावाला सहमती आहे.

महापौर:-प्रशासनाने आपली भुमिका नमुद करावी.

अॅड  धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, आपल्या माध्यमातून प्रशासनला विनंती आहे. वर्तमानपत्राच्या माध्यमातून मी हे वाचले. मुंबई महानगरपालिकेत राज्य सरकारने हा कर माफ केला आहे काय? ही जी भरपाई आहे ती महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून महानगरपालिकेला देण्यात येत आहे की मुंबई महानगरपालिकेच्या रक्कमेतून करण्यात येईल ती माहिती जर असेल तर ती कळविली तर ते योग्य राहील.

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मा.सदस्य धर्मपालजी यांनी प्रश्न उपस्थित केला आहे तो योग्य आहे. परंतु या सभागृहातील सत्तापक्ष नेत्यांनी, विरोधी पक्ष नेत्यांनी मत मांडले त्यामुळे आम्हांला शासनाच्या पैश्याची अपेक्षाच नाही आहे. या माध्यमातून शासनाने परवानगी दयावी एवढेच केले तर आमच्या शहरातील 2.5 लक्ष जनतेला महानगरपालिकेच्या तर्फे काही तरी देवू शकलो ही महानगरपालिकेची भुमिका राहील. मा.सदस्याच्या प्रश्नाचे उत्तर दयावे. आम्हांला महाराष्ट्र शासनाचा पैसा आला काय किंवा नाही आला काय. फक्त शासनाने कर माफ करण्याची परवानगी दिली तर बरे होईल. त्याप्रमाणे मा.महापौरजी आपण निर्देश दयावे.

महापौर:- प्रशासनाने आपली भुमिका नमुद करावी.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन.  मुळात हा विषय कर आकारणी व कर संकलन विशेष समितीने परस्पर घेतलेला निर्णय आहे. प्रशासनाच्या माध्यमातून सत्तापक्ष नेत्यांनी महटले आहे, नागपूर शहरात डीएसए लॅन्ड जे 46.46 चौ.मीटरचेआहेत जे 500 चौ. फुटाचे आहेत. फ्लॅट स्किममध्ये सुध्दा अशा क्षेत्रफळाचे फलॅट आहेत.  शासकीय व निमशासकीय इमारतीमध्ये अशा

क्षेत्राफळाच्या आकाराचे नोकरदाराचे फलॅट आहेत. स्लम एरियामध्ये सुध्दा 500 चौ.फुटाच्या क्षेत्रापेक्षा जास्त बांधकाम असलेले टीनाचे कुडाचे घरे आहेत. हा थोडासा विरोधाभास आहे. मा.महापौरजी, कायद्याची तरतूद बघितली तर मी जस्ट महाराष्ट्र शासनाची तरतूद आपलया समक्ष ठेवू इच्छितो. जे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 11 आहे. त्यामध्ये सुरवातीला कलम 127 आणि कलम 152 अंतर्गत मालमत्ता सुटीबाबतचे जे अधिकार आहेत ते सभागृहाला किंवा शासनाला कलम 132 अंतर्गत सार्वजनिक पुजाअर्चा असणारे ठिकाण किंवा धर्मदाय असलेल्या ठिकाणाकरिता सामान्य कर माफ करण्याचा अधिकार हा संबधित अॅथारिटीला देण्यात आलेली आहे. तशीच कलम 133 मध्ये अशी तरतूद आहे की नैसर्गिक आपत्ती मध्ये बाधा पोहचलेल्या व्यक्तीला मालमत्ता कर माफ करण्याचा अधिकार महानगरपालिकेच्या सभागृहाला दिलेला आहे. धरण फुटल्यामुळे ज्या इमारती वाहून गेल्या अशा लोकांना मालमत्ता करामध्ये माफी देण्याचा अधिकार महानगरपालिकेला दिलेला आहे. दुसरे, कलम 140 'अ' अंतर्गत मालमत्ता करातून आगाऊ रक्कमेमध्ये सुट देण्याचा अधिकार महानगरपालिकेला दिलेला आहे. कलम 140 'ब' अंतर्गत अशी तरतूद आहे की परिस्थिती पाहून कर माफ करण्याकरिता महानगरपालिकेच्या सभागृहातून मालमत्ता करात सुट देवू शकते. अॅकॉलॉजी ज्या स्किम असतील त्यामध्ये दुसरे, कलम 152 मध्ये तरतूद आहे की मालमत्ता कर तो भरण्या जोगा नसेल तर त्याचा कर निर्लेखन करण्याचा अधिकार स्थायी समितीला देण्यात आलेला आहे. कलम 152 'अ' अंतर्गत अशी तरतूद आहे की कराची बाकी प्रदान करण्यातून सुट देण्याचा अधिकार सभागृहाला निर्णय घेवून शासनाची मान्यता घेवून ही थकबाकी माफ करते. अशा प्रकारची प्रोव्हीजन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतूद आहे. या व्यतिरिक्त अशी कोणतीही तरतूद नाही की सरसकट 500 चौ. फुटाच्या किंवा 46.46 चौ.मी. क्षेत्रफळाच्या इमारतीच्या मालमत्तावरील करात सुट देण्याचा सभागृहाला किंवा महानगरपालिकेला असा अधिकार या प्रोव्हीजन अंतर्गत नाही ही बाब निदर्शनास आणून देवू इच्छितो.

महापौर:- सोबतच धर्मपालजी यांचा प्रश्न होता. याचा रिइम्बेसमेंट सरकार करणार आहे की त्याच महानगरपालिकेला करावयाचे आहे.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरुन आणि मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन माहिती काढण्याचा प्रयत्न केला. ही बाब कुठेच आलेली नाही. हा निर्णय घेतल्यानंतर हा मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहाने प्रस्तावित केला होता की शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाने निर्णय घेतल्यानंतर मुंबई महानगरपालिकेला का कॉम्पनसेशन देणार आहे. अशी कोणत्याही संकेतस्थळावर माहिती उपलब्ध झालेली नाही.

महापौर:- महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक निघाले असेल त्याची काही माहिती आहे काय?

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर शोधण्याचा प्रयत्न केला परंतु माहिती मिळाली नाही.

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, अशा पध्दतीचा निर्णय झाला आहे काय? जर समजा असा निर्णय

वर्तमानपत्राच्या माध्यमातून बातमी पसरविली गेली आहे. या बद्दल प्रशासन काही प्रकाश टाकू शकते काय?

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. हा कर आकारणी व कर संकलन विशेष समितीने घेतलेला निर्णय आहे. त्यामुळे प्रशासनाला याआधारे काहीच माहिती नाही.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, मी नागपूर शहराच्या संदर्भात आणि ज्याला बेस करतो आहे मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत 500 चौ. फुटापर्यंतची जी घरे आहेत त्यांच्यावरील मालमत्ता कर माफ करण्याची महाविकास आघाडी सरकारने घोषणा केली. त्या अंतर्गत काही नियमावली ठरविण्यात आली. लोक कोणत्या आधारावर चर्चा करीत आहे त्याचा आधार नेमका काय आहे. त्यावर प्रशासन काही प्रकाश टाकू शकेल काय? एवढेच मला म्हणावयाचे आहे.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रशासनाच्या वतीने माहिती देवू इच्छितो, हा मुळात आलेला विषय प्रशासनाकडून प्रस्तावित झालेला नव्हता. कर आकारणी व कर संकलन विशेष समितीने हा निर्णय घेतला. त्यामध्ये असे निदर्शनास आले की त्यांना कुठून तरी नागरिकांचे फोन आले होते की मुंबई महानगरपालिकेत शासनाने असा निर्णय घेतला आहे त्यामुळे नागपूर महानगरपालिकेने हे करावे. त्या आधारावर कर आकारणी व कर संकलन विशेष समितीने निर्णय घेतला असे त्यात नमुद आहे. याबाबत प्रशासनाला काहीही माहिती नाही आहे की मुंबई महानगरपालिकेकरिता तो निर्णय झालेला आहे किंवा नाही. त्यात काय अटीशर्ती आहेत, शासनाने कॉम्पनसेशन देणार आहे. याबाबत माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. मी संकेतस्थळावरुन माहिती काढण्याचा प्रयत्न केला परंतु माहिती मिळाली नाही.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, एक प्रश्न मा.धर्मपालजी यांनी विचारला त्याच्या अनुषंगाने की मुंबई महानगरपालिकेने असा ठराव करुन शासनाकडे पाठविला की काय? की मा.मुख्यमंत्र्यांनी सुमोटो ही घोषणा केलेली आहे.

उपायुक्त(श्री.मिलींद मेश्राम):- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रशासनाला याबाबत माहिती नाही.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, कॅबीनेटमध्ये निर्णय झाला त्याची नोट तरी आपल्याकडे आहे काय? ते तरी आपण शोधण्याचा प्रयतन केला आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्यापूर्वी शिवसेनेने आपल्या मुखपत्रात 500 चौ.फुट पर्यंतच्या इमारतींना कर माफीचा निर्णय घेतला आहे. आवश्यक हे आहे की राज्य सरकार त्या रक्कमेचा भरणा करणार आहे की महानगरपालिका स्व:तच्या निधीतून त्या रक्कमेचा भरणा करणार आहे. हे सगळे प्रश्न अनुत्तरीत आहेत. मा. महापौरजी, आपल्या माध्यमातून विनंती आहे. या गोष्टीचा सर्वप्रथम या कॅबीनेट मध्ये निर्णय काय ठरले. त्या निर्णयाचे स्वरुप काय आहे. त्याचे एक्झक्युटीव्ह पाईंट ऑफ व्हयूने काय ठरले त्याचा सुध्दा अभ्यास करण्यात यावा त्यानंतर या विषयाला सभागृहात मान्यता दयावी.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, प्रशासनाने आपले उत्तर दिलेले आहे. या नागपूर शहरातील जनतेच्या हिताचा निर्णय घेण्याकरिता आपण बसलेलो आहे. ही रक्कम फार मोठी नाही. मेश्राम साहेबांनी

सांगितले, 90 कोटी रुपये एरियर्स आहेत आणि 30 कोटीची डिमांड आहे. शहरात 2.5 लक्ष प्रापर्टी आहेत आणि त्यांचे एरियर्स दिवसेदिवस वाढत चाललेले आहे. कर भरण्याची त्यांची कॅपिसिटी नाही. मेश्राम साहेबांनी सांगितले त्यात काही सरकारी कर्मचारी आहेत. ते कोणत्या कॅटीगरीतील आहेत तर क्लॉस फोरचे आहेत की डेलीवेजसवरील आहेत हा सुध्दा प्रश्न आहे. त्यांची फायनॉनसियल कॅपिसिटी खुप मोठी आहे असे म्हणू शकत नाही. त्यामुळे ही खुप मोठी रक्कम महानगरपालिकेवर भार टाकणारी आहे असे म्हणू शकत नाही. 10 करोड रुपये आपल्याला याच्यातून मिळत नसेल आणि त्यावर 1 करोड रुपये कर्मचा-यांचा पगारच देत असेल तर कोणता त्याच्यामध्ये फरक पडणार आहे मा.महापौरजी. आज सभागृहामध्ये काही प्रस्ताव आलेले आहेत. त्याच्यामध्ये चार-पाच नवीन प्रोजेक्ट करतो आहे. बुधवार बाजारच्या प्रोजेक्टमधून पैसा येत आहे आणि असे अनेक प्रोजेकट नागपूर शहरामध्ये लॉन्च केलेले आहेत त्यामधून मोठया प्रमाणात हा निधी गोळा करु शकतो. रेव्हेन्यु जनरेट करु शकतो. परंतु प्रशासन त्या पॉलिसीला ॲडाप्ट न करता आपल्या पध्दतीने काम करीत आहे. त्यामुळे रेव्हेन्यु ड्राप् होत आहे. हा निधी खुप मोठा निधी नाही आहे. मा.महापौरजी, सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की आपण तात्काळ प्रभावाने हा निर्णय लागू करावा. आजपासूनच सर्व नागपूर शहरातील जनतेला 500 चौ.फुटाच्या घरावरील मालमत्ताकर माफ करण्यात येईल. आणि समजा सभागृहात निर्णयावर होत नसेल तर महाराष्ट्र सरकारची परवानगी घ्यावी आणि प्रशासनाला वाटत असेल महाराष्ट्र शासनाकडून कम्प्लशन घ्यावे तर तसा स्पेशल प्रस्ताव पाठविण्यात येईल परंतु प्रस्ताव पाठवितांना तात्काळ लागू केला त्याचा रिइम्बेसमेंट महाराष्ट्र शासनाकडून घेता येईल मा.महापौरजी. त्यामुळे नागपूर शहरातील गोरगरीब जनतेच्या दृष्टीकोनातून, आर्थिकदृष्टया दुर्बल लोकांच्या दृष्टीकोनातून, कोव्हीडच्या कार्यकाळात अनेक लोकांचे हातावर पोट भरणा-या लोकांना एक फार मोठा दिलासा, महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांना लेटर देण्यात येईल. मा.महापौरजी, उद्या देशाच्या संविधानाला 75 वर्ष होत आहे. त्याचे औचित्य साधून नागपूर शहरातील 2.5 लक्ष लोकांना हा दिलासा दिला तर महानगरपालिकेच्या बद्दल एक चांगला मॅसेज जनतेपर्यंत जाईल. प्रशासनाला सुध्दा माझी विनंती आहे. आमचे नागपूर महानगरपालिकेतील पदाधिकारी, नगरसेवक जनतेच्या हिताच्या दृष्टीने सतत कार्यरत असतात. मी स्थायी समिती अध्यक्ष असतांना 90 कोटी रेव्हेन्यु महानगरपालिकेत आणून दिले होते. मा. नितीनजी गडकरी यांनी 3-3 हजार कोटीचे प्रोजेक्ट महानगरपालिकेला आणून दिले. त्या अनुपातामध्ये ही रक्कम कमी आहे. मा.महापौरजी, आपण आजच्याआज हा निर्णय घ्यावा आणि नागपूर शहरातील जनतेला दिलासा दयावा. महानगरपालिकेवर मोठा प्रभाव येणार नाही. म्हणून आजच्या आजच नागपूर शहरातील जनतेला आनंद दयावा आणि प्रशासनाला निर्देश दयावे. रिपब्लिकन डे च्या पूर्वसंध्येला जनतेला ही खुशखबर दयावी की नागपूर शहरातील 156 नगरसेवकांनी, आयुक्तांनी आणि संपुर्ण प्रशासनाने या नागपूर शहरातील जनतेच्या हिताचा विषय घेतला अशा प्रकारचा एक मॅसेज आजच्या निर्णयातून जाईल. सर्वांनी मिळून एकमताने प्रशासन आणि पदाधिकारी, नगरसेवक सर्वांनी एकमताने निर्णय करावा आणि आजच सर्व लागू करावे अशी नम्र विनंती आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- मा. महापौर साहेब, परंतु याचा फायदा सरसकट झोपडपट्टीत राहणा-या लोकांना

होवू शकत नाही. याचे कारण असे आहे, आताच कर विभागाच्या आयुक्तांनी सांगितले ज्या घोषित झोपडपट्टया आहेत तेथील बांधकामाचे क्षेत्रफळ 500 चौ.फुटापेक्षा कितीतरी अधिक आहे. अशा वेळेत हा लाभ ख-या गरजू लोकांना पोहचेल की नाही हे पाहण्याची आवश्यकता पडेल. त्यामुळे माझी अशी विनंती आहे. याचा कायटेरिया ठरविणे गरजेचे आहे. याचा फायदा एखाद्या सरकारी कार्यालयात काम करणा-या माणसाला पोहचेल परंतु त्याचा फायदा योग्य त्या गरजू माणसापर्यंत पोहचेलच असे नाही. याचा सुध्दा विचार होणे गरजेचे आहे. त्यामुळे मा.सत्तापक्ष नेते यांचा प्रस्ताव स्विकारतांना असे म्हणायचे आहे की स्लम नोटीफाईड आहेत किंवा नॉन स्लम आहेत या पध्दतीचा लाभ दयावा लागेल जसे कुणी बीपीएल धारक असेल, राशनकार्ड धारक असेल त्यांच्याकडे कुणी पुरुष कर्ता व्यक्ती नसेल सगळया महिला वर्ग असतील, लहान मुले असतील त्यांचे बांधकाम 500 चौ.फुट किंवा एक फुट असेल तर त्यांना देखील याच्यामध्ये कव्हर कसे करता येईल तशा पध्दतीने या विषयाची व्यापी वाढविणे आवश्यक आहे. मा.महापौरजी, माझी नम्र विनंती आहे या बाबींचा उल्लेख या निर्णयामध्ये झाला पाहिजे. धन्यवाद.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, धर्मपालजी मेश्राम यांनी अत्यंत चांगला विषय ठेवलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा संविधान तयार केले तेव्हा बहुमताचा विचार केला की ज्या योजनेचा जास्तीत जास्त लोकांना फायदा होत असेल आणि दोन लोकांना नुकसान होत असेल परंतु 98 लोकांना जर फायदा होत असेल तर ती योजना इम्प्लीमेंट केली पाहिजे. अशा पध्दतीने डॉ. बाबासाहेबांनी संविधान बनविलेले आहे. त्यामुळे धर्मपालजी मेश्राम यांच्या मताचा आदर करुन त्यांच्या पुढच्या ज्या सुचना असतील त्यांचा अभ्यास करावा तोपर्यंत हा जो निर्णय आहे समितीने घेतलेला त्याला तत्काळ प्रभावाने लागू करावा.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, कर आकारणी व कर संकलन विशेष समिती यांनी घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. मुंबई महानगरपालिकेचा निर्णय, पुण्यात काय घडले, काय निर्णय घेतला यापेक्षा आपल्या नागपूर शहरातील जनतेविषयी नगरसेवक संवेदनशील आहेत. या विषयाच्या अनुषंगाने कर आकारणी व कर संकलन विशेष समितीने हा प्रस्ताव आणलेला आहे. निश्चितरुपाने खुप चांगला निर्णय आहे. नागपूर शहरातील 2.5 लक्ष लोक जे 500 चौ.फुटाच्या जागेत स्लम विभागात राहतात अशा लोकांना नागपूर शहरामध्ये या कोरोनाच्या काळात झळ बसलेली आहे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. निश्चित रुपाने या नागपूर शहरातील अशा या गोरगरीब जनतेला 73 व्या संविधान दिनाच्या पूर्व संध्येला आपल्या माध्यमातून निर्णय घेवून या गोरगरीब जनतेला न्याय देण्यात यावा एवढी सुचना आपल्या माध्यमातून करतो. धन्यवाद.

महापौर:- कर समितीने जो प्रस्ताव पारीत किया है व वह सरकार के निर्णय की पार्श्वभुमी पर किया है, ऐसा उस प्रस्ताव मे नमुद है, सरकार के निर्णय की पार्श्वभुमी पर कर समितीने जो विषय रखा है, उस विषय पर इस सभागृह मे चर्चा करने के बाद सत्तापक्षनेता, विरोधी पक्षनेता, बहुजन समाज पार्टी के गटनेता और मा.पूर्व विधी समिती के अध्यक्ष इन सभी लोगो ने सखोल चर्चा की I और सभागृह का ऐसा मानस है कि, इस प्रस्ताव को हमने पुर्ण रुपसे मंजूरी प्रदान करनी चाहिये, मुझे व्यक्तीगत तौर पर ऐसा लगता है कि,

जिस समय राज्य सरकारने इसकी घोषणा की, पिता के लिये सारे बेटे एक जैसे होते है, मा.मुख्यमंत्रीजी ने निर्णय लेते समय केवल मुंबई के लिये निर्णय न लेते हुऐ पुरे महाराष्ट्र के लिये निर्णय लेना था, ऐसा होता तो ज्यादा प्रासंगिक होता था,लैकिन उन्होने केवल मुंबई के लिये निर्णय लिया है, अगर महाराष्ट्र के लिये भी महाराष्ट्र सरकार ऐसा निर्णय लेती तो ज्यादा अच्छा रहता और सभी तरफ से उसका अभिनंदन होता, नागपूर शहर उपराजधानी होने के बावजूद उसका उन्होने उल्लेख नही किया, इसलिये इस सभागृह को इस निर्णय पर पहुंचना पडा और सभागृह खुद निर्णय ले रहा है, मा.सदस्यो की भावनाओ को ध्यान मे रखते हुऐ इस सभागृह से इस विषय को मंजूर किया जाता है, प्रशासन को निर्देश दिये जाते है कि, सभागृह के इस निर्णय को सरकार के पास मंजूरी के लिये भेजा जाये, और राज्य सरकार की अनुमती आने के बाद इसे तुरंत महानगरपालिका मे लागु किया जाये।

<u>ठराव क्रमांक **२१५**</u> :- नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. कर आकारणी व कर संकलन विशेष समिती

मंगळवार दि. 04-01-2022 दुपारी 04-00 वाजता चे कार्यवृत्त

<u>ठराव क्रमांक **२१६**</u> :- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. **म.न.पा. विशेष सभा दिनांक 27.09.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त**
2. **म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 04.10.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त**
3. **म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 04.10.2021 दुपारी 12.05 वाजता चे कार्यवृत्त**

<u>ठराव क्रमांक २१७</u> :- नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.

१. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०५–१०–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
२. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १२–१०–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
३. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २२–१०–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
४. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २९–१०–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
५. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १०–११–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
६. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २२–१२–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
७. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २८–१२–२०२१ रोजी दुपारी १२–३० वाजता
८. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०४–०१–२०२२ रोजी दुपारी १२–३० वाजता

श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, एक सुचना आलेली आहे. दुसरी आमची सुचना या विषयाच्या अनुषंगाने आहे. नागपूर महानगरपालिकेचे अनेक रिझर्वेशन आहेत, डी.पी. रोडचे असेल, टाऊन हॉलचे असेल, शाळांचे असेल. मधल्या काळामध्ये त्या ठिकाणी रिझर्वेशन होते त्या ठिकाणी 50 टक्के खर्च झाले आहे ते रिझर्वेशन हटविले होते. परंतु कोर्टामध्ये कुणी पीटीशन टाकली त्यावर स्टे मिळाला आहे. तो यासाठी मिळाला आहे मा.महापौरजी, या सर्व रिझर्वेशनच्या संदर्भात 37 ची कार्यवाही झालेली नव्हती . हा प्रस्ताव त्याच्या माध्यमातून आलेला आहे जे रिझर्वेशन महानगरपालिकेचे आहेत, एनआयटीचे रिझर्वेशन आहेत किंवा इतर विभागाचे आहेत. ते सर्व च्या सर्व प्रस्ताव महानगरपालिकेच्या एडीटीपी विभागाकडे आणून त्यावर 37 ची कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे पाठवावे अशी सुचना देतो आणि या विषयाला मंजूरी दयावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**ठराव क्रमांक २१८ /वि.क्र.१००:-** विकास योजना नागपूर

**{नगररचना विभाग}** मौजा – जाटतरोडी, खसरा क्र. 28/1, येथील गुंडेराव वस्ती मधील सार्वजनि उपयोगाचा भुखंड क्र. 'बी'(B) एकुण क्षेत्र – 0.90 हेक्टर आर पैकी 0.565 हेक्टर आर जागा पोलिस स्टेशन (MS-127) आरक्षणातुन वगळुन ''सार्वजनिक –निमसार्वजनिक'' या उपयोगात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (अ) अन्वये फेरबदल कार्यवाही करण्याबाबत.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील (सु.) आ.क्र. एम.एस–127 पोलीस स्टेशन करीता राखीव असले 0.90 हे. क्षेत्राच्या जागेपैकी 0.5650 हे. क्षेत्राची जागा उक्त आरक्षणातुन वगळुन सार्वजनिक /निमसार्वजनिक विभाग समाविष्ट करणे संदर्भित नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर मनपाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनि 1966 चे कलम – 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेबाबत नागपूर सुधार प्रन्यासने पत्र क्र. 2977 दि. 11.11.20 अन्वये महानगरपालिकेस कळविलेले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे तरतुदीनुसार नागपूर शहराकरीता त करण्यांत आलेली सुधारीत विकास योजना नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस–2496 /2643/सी.आर.–300 –97–युडी–9 दि. 07.01.2000 नुसार भागशः मंजुर व क्र. टिपीएस–2400/1628/सी.आर.–200 –2000–युडी–9, दि. 09.2001 नुसार अंतीमतः मंजुर करण्यांत आलेली आहे. तसेच नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस/2401/855/सी.आर/76/युडी–9, दि. 27.02.2002 अन्वये सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियो प्राधिकरण म्हणुन घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस/2419/1419/ क्र.154/2019/नवि–9 दि. 27.08.2019 अन्वये संपूर्ण नागपूर शहराकरीता '' नियोजन प्राधिकरण '' म्हणुन नाग महानगरपालिकेला घोषीत केलेले होते. आता शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस–2419/1419/प्र. 154(भाग–1)/2019/ नवि–9, दि. 09.04.2021 अन्वये सात योजनेकीरता नागपूर सुधार प्रन्यास ला '' नियोजन प्राधिकर म्हणुन घोषीत केलेले आहे.

मौजा–जाटतरोडी, खसरा क्र. 28/1, येथील गुंडेराव बस्ती एरिया अभिन्यासातील भुखंड क्र. 'बी' चे वा सचिव, दि कॅन्सर रिलीफ सोसायटी यांना नागपूर सुधार प्रन्यास तर्फे दि. 10.10.1955 रोजी 5648.457 चौ.मी. क्षेत्राची ज दि. 31.03.1986 रोजी पर्यंत प्रथमतः व तद्नंतर दि. 31.03.2016 पर्यंत सार्वजनिक उपयोगाकरीता करण्यांत आलेले होते. कालावधी दि. 31.03.2016 रोजी संपलेला असुन सदर संस्थेने नागपूर सुधार प्रन्यासला लीजच्या नुतनीकरणाबाबत विन अर्ज केलेला आहे.

उक्त जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ''इन्डस्ट्रियल बस्ती स्किम'' अंतर्गत समाविष्ट आहे. परंतु शासनाचे दि. 27.02.2002 चे व दि. 09.04.2021 रोजीच्या अधिसुचनेनुसार उक्त जागा महानगरपालि नागपूरचे कार्यक्षेत्रा अंतर्गत समाविष्ट असुन या भागा करीता '' नियोजन प्राधिकरण '' म्हणुन नागपूर महानगरपालिका आहे

नागपूर शहराची मुळ विकास योजना सन – 1976 ला मंजुर झालेली असुन यामध्ये उक्त जागा 'निवासी' उपयोगा करीता प्रस्तावित होती. तद्नंतर शासनाने दि. 10.09.2001 रोजी मंजुर केलेल्या सुधारीत विकास योजनेनुसार मौ – जाटतरोडी, खसरा क्र. 28/1 मधील 0.90 हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. एमएस – 127 पोलीस स्टेशन करी आरक्षीत करण्यांत आलेली आहे व सदर आरक्षणाकरीता समुचित प्राधिकरण ''पोलिस विभाग '' आहे.

उक्त आरक्षण राबविणारे ''समुचित प्राधिकरण'' पोलिस विभाग असल्याने नागपूर सुधार प्रन्यासने पत्र

सभापती/रचना/2130, दि. 15.07.2020 चे पत्रान्वये उक्त आरक्षणाखालील जागा पोलीस विभागाला आवश्यकता नसल्य उक्त आरक्षण वगळणेसंदर्भात ना–हरकत प्रमाणपत्र दिल्यास सदरचे आरक्षण मंजुर विकास योजनेतुन म.प्रा. व न अधिनियम – 1966 चे कलम 50 अन्वये वगळण्याबाबत कार्यवाही करणे शक्य होईल असे कळवून मा. पोलिस आयुक्त, नाग शहर यांचे अभिप्राय घेतले असता, पोलिस उपआयुक्त (मुख्यालय) पोलिस आयुक्त, नागपूर शहर यांनी दि. 17.08.20 रोजीच्या पत्रान्वये ना.सु.प्र.ला खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

''सध्या पोलिस उपआयुक्त '' परिमंडळ क्र. 4 नागपूर शहर कार्यालय हे जुने पोलिस स्टेशन अजनी येथील रे विभागाचे जागेवर कार्यान्वित आहे. तसेच नागपूर शहरात सायबर पोलिस स्टेशनची निर्मिती प्रस्तावित असल्याने नमुद दो कार्यालयाकरीता जागा उपलब्ध नाही. या विभागाकरीता आरक्षीत असलेली मौजा – जाटतरोडी, खसरा क्र. 28/1, गुंडे बस्ती, विकास योजनेतील ''पोलिस स्टेशन '' आरक्षण क्र. एमएस– 127, क्षेत्र – 0.90 हेक्टर आर. या आरक्षणाने प्रस्ता असलेल्या जागेवर बांधकाम करणे प्रस्तावित असून किंवा या विभागाचे अन्य कार्यालयासाठी त्याजागेवर बांधकाम करणेबा कार्यालयाकडून प्रस्तावित आहे.

तरी मौजा – जाटतरोडी, खसरा क्र. 28/1, गुंडेराव बस्ती येथील सार्वजनिक उपयोगाचा भुखंड क्र. 'बी' एव् क्षेत्र – 5650.00 चौ.मी. (0.565 हे आर.) जमिनीवरील विकास योजना ''पोलिस स्टेशन'' आरक्षण क्र. – एमएस–127, क्षेत्र – 90 हेक्टर आर या आरक्षणाने प्रस्तावित असलेली जागा स्नेहांचल वेदना उपक्षमन केंद्राकरीता देता येणे शक्य नाही, अ कळविलेले आहे.

विषयांकित भुखंड क्र. 'बी' वर सध्यास्थितीत संस्थेचे स्नेहांचल वेदना उपक्षमण केंद्र असुन, यामध्ये वैद्यकि वापर सुरू आहे. या जागेच्याजवळ, तुकडोजीपुतळा चौक (मेडीकल कॉलेजच्या दक्षिनेकडील भाग) व अजनी रेल्वे स्टेशन दरम्यान विद्यमान अजनी पोलिस स्टेशन आहे.

मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दि. 08.09.2021 रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृ प्रस्तावासोबत सादर केले असुन यामध्ये आयुक्त, नागपूर महानगरपालिका व सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी मौजा जाटतरोडी, खसरा क्र. 28/1 येथील गुंडेराव बस्ती मधील सार्वजनिक उपयोगाचा भुखंड क्र. 'बी' मधील – 0.565 हेक्टर अ क्षेत्राची जागा '' सार्वजनिक–निमसार्वजनिक '' या वापरासाठी समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व न रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (अ) अन्वये कार्यवाही करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी दि. 08.09.2021 रोजी पार पडलेल्या बैठकीत मौजा जाटतरोडी, खसरा क्र. 28/1 येथील गुंडेराव बस्ती मधील सार्वजनिक उपयोगाचा भुखंड क्र. 'बी' एकुण क्षेत्र – 0.90 हेक आर पैकी 0.565 हेक्टर आर. जागा आरक्षण क्र. एमएस – 127 पोलीस स्टेशन या आरक्षणातुन वगळुन ''सार्वजनिक निमसार्वजनिक '' या उपयोगात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 कलम 37 (अ) अन्वये कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केल्याने सदर आरक्षणाच्या भागाकरीता नियोजन प्राधिकरण म्हण नागपूर महानगरपालिका असल्याने वरीलप्रमाणे उक्त आधिनियमाच्या कलम – 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव नाग महानगरपालिकेने कार्यान्वित करून मंजुरीस्तव शासनास सादर करणेची कार्यवाही करणेसंबंधी ना.सु.प्र. ने संदर्भीय पत्रान् नागपूर महानगरपालिकेस कळविलेले आहे.

सदर फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेचा नागपूर सुधार प्रन्यासचा प्रस्ताव असून नियोजन प्राधिकरण म्हण नागपूर महानगरपालिका असल्याने व आरक्षणाखालील जागा ना.सु.प्र.ने लीजवर दिलेल्या भुखंडाचा असून सार्वजनि वापरासाठी वाटप केल्याची व सदर जागेवरील विद्यमान इमारतीचा वापर वैद्यकिय सेवा देणेचा असल्याने नासुप्र

कळविल्यानुसार अधिनियमाच्या कलम – 37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेस आवश्यक आहे.

मौजा – जाटतरोडी, खसरा क्र. 28/1 येथील गुंडेराव बस्ती या अभिन्यासातील भुखंड क्र. बी एकुण क्षेत्र – 0. हेक्टर क्षेत्राची जागा पश्चिम व दक्षिणेकडे असलेल्या 18.00 मी. रूंदीच्या दोन रस्त्याच्या जोडावरील भुखंड आहे. उक्त एव् जागेपैकी 0.565 हे क्षेत्राची जागेचे वाटप ना.सु.प्र.ने दि कॅन्सर रिलीफ सोसायटी या नोंदणीकृत संस्थेस केलेली असल्या सदर बाब विचारात घेता. उक्त भुखंडाचे एकुण – 0.90 हेक्टर क्षेत्रा पैकी उत्तरेकडील 18.00 मी रूंद रस्त्यालगतची – 0.5 हेक्टर आर. क्षेत्राची जागा ''पोलिस स्टेशन'' (आरक्षण क्र. एमएस–127) या आरक्षणातुन वगळुन सार्वजनिक निमसार्वजनिक या विभागात समाविष्ट करण्याकरीता व उर्वरित दक्षिणेकडील जागा आ.क्र. एमएस–127 पोर्ल स्टेशनकरीता कायम ठेवणेबाबत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरब प्रस्ताव प्रस्तावित करण्यांत येत आहे.

सदर प्रस्तावाची संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात येईल. याकरीता महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर आक्षेप/ हरकतीवर योग्य निर्णय घेवून व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्य यांनी जी सुचना केली आहे त्या सुचनेनुसार एडीटीपी विभागाने हा विषय सभागृहापुढे ठेवावा असे त्यांना निर्देश देण्यात येते सोबत मा.सत्तापक्ष नेते श्री.अविनाश ठाकरे यांनी जो विषय ठेवला आहे की शहरात अनेक लोकवस्ती आहे जेथे रिझर्वेशनच्या प्लॉटमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त घरे बनविलेली आहेत. त्यांचे रिझर्वेशन निरस्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता परंतु टेक्निकल कार्यवाही पुर्ण न झाल्यामुळे कोर्टात त्याला चॅलेंज करण्यात आलेले आहे. या लोकांना दिलासा देण्यासाठी एनआयटीच्या माध्यमातून, महानगरपालिकेच्या माध्यमातून जे रिझर्वेशन होते त्याला डिलीट करण्याची जी रितसर कार्यवाही आहे जे पीटीशन मध्ये नमुद असलेले केसेस आहेत त्या सगळयांची रितसर कार्यवाही करण्याच्या दृष्टीने नियोजन प्राधिकरण नागपुर महानगरपालिका असल्यामुळे एडीटीपी विभागाने ते सगळे प्रस्ताव एकत्रित कल्ब करुन महासभेच्या पुढच्या सभागृहात ठेवावे असे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, विषय क्र. 101 मध्ये पहिले 1000 रुपये होते आणि आता 600 रुपये आहे हा जो फरक आलेला आहे हा कशामुळे आलेला आहे याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री तालेवार):- मा.महापौरजी, भांडेवाडी येथे घनकचरा व्यवस्थापनाच्या जागेवर संकलित केलेल्या कच-यावर बॉयोमायनिंग प्रक्रिया करण्याकरिता आपण 2018 मध्ये कंत्राट केला होता त्यामध्ये प्राप्त दर आपल्याला 1015 दर प्राप्त झाले होते. त्यापैकी 5 वर्षापर्यंत आपण कच-यावर पुर्ण प्रक्रिया केलेली आहे. उर्वरित कच-यावर डिसेंबर 2022 पर्यंत ही प्रक्रिया पुर्ण करणार आहोत. आता आपण एनएसएससीएससीएल स्मार्ट सिटीमार्फत कंत्राट केलेला आहे. त्याच्यामध्ये जे दर प्राप्त झालेले आहेत ते 788 रुपये प्रमाणे प्राप्त झालेलेआहे. दोन्ही कामे आपण निविदेद्वारे बोलाविले आहे. याद्वारे एका एजन्सीमार्फत दोन्ही कंत्राटाच्या निविदा पुर्ण करण्यात आल्या होत्या. जी झिग्मा ग्लोबल इन्वायर्न सोल्युशन प्रायव्हेट लिमीटेड कंपनी आहे त्यांच्याकडून जे दर कमी आलेत त्याबाबत आपण विचारणा केली होती. त्याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे की त्यामध्ये प्रामुख्याने त्याचे म्हणणे याबाबत असे होते की यापूर्वीची त्यांची यंत्रणा त्या ठिकाणी आहे. कच-यावर प्रक्रिया करण्याची यंत्रणा त्या ठिकाणी आहे. त्यामुळे ऑपरेटिंग

कॉस्ट या प्रकल्पाकरिता कमी येणार आहे. तसेच त्यांनी दोन प्लॉन्ट उभारलेले आहे. कच-याच्या प्रक्रियाकरिता एक प्लॉन्ट तो ऑलरेडी तेथे असल्यामुळे त्यावरती येणारा खर्च कमी राहणार आहे म्हणून त्याचा फायदा होणार आहे. तसेच स्पेअर पार्ट 50 टक्के राखीव होते ते या प्रकल्पात उपयोगात राहणार आहे. असे त्यांनी कॅलक्युलेशन केलेले आहे आणि त्यामुळे त्यांनी हे दर कमी टाकलेले आहे असे त्यांनी सांगितले आहे.

निगम आयुक्त:- तालेवार साहेब हे सांगा कंत्राट आपण टोटल किती मॅट्रीक टनसाठी दिले होते. किती मॅट्रीक टन किती एरियामध्ये पसरलेले होते. आता किती एकरचे काम झालेले आहे आणि यामुळे किती एरियाची लॅन्ड रिकव्हर केली. त्याच्या आज रोजी किती एरिया रिकव्हर होणार आहे हे सभागृहामध्ये सांगण्यात यावे.

कार्यकारी अभियंता(श्री तालेवार):- मा.महापौरजी, यापूर्वीचा कंत्राट हा 10 लक्ष टन कच-यावर प्रक्रिया करिता केला होता. 52 एकर जागेवर हा कचरा होता त्यापैकी 50 टक्के म्हणजे जवळपास 32 एकर जागा रिकव्हर केली आहे आणि संपुर्ण 52 एकर जागा डिसेंबर 2022 पर्यंत करणार आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझे महणण्याचे तात्पर्य असे होते की जो कचरा येतो तो पूर्वी जास्त येत होता आणि आता कमी येतो काय? याचा खुलासा आपण करावा.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. मा.विरोधी पक्ष नेता यांच्या मी निदर्शनास आणून देवू इच्छितो की, या सभागृहामध्ये मागच्या वेळेस चर्चा झाली होती त्या अनुषंगाने त्यांनी खुलासा मागविला होता की आधी 1000 रुपयाने काम करीत होता आता कमी रुपयाने काम करीत आहे. सेम प्रकारचे काम कमी रेटमध्ये करण्याचे कारण काय? त्याच्यामध्ये त्यांनी तीन-चार पत्रामध्ये उततर दिलेले आहे. त्यांनी पहिले तांत्रिक कारण सांगितले होते, दुसरे मटेरियलच्या संदर्भात स्पष्टपणे वाचून दाखविले होते. काय काय गोष्टी आहेत. त्यांच्याकडे एक्स्ट्रा स्टॅबलिश इन्फ्रास्ट्रक्चर, कोणताही प्रकल्प राबविण्याकरिता फिक्स कॉस्ट आणि व्हेरियेबल कॉस्ट असतो. यावेळी त्यांनी सेकंड वेळी पार्टीसिपेट केले.यावेळी त्यांचे फिक्स कॉस्टवरचे इन्वेस्टमेंट आहे ते अत्यंत कमी झालेले आहे या कारणाने. त्यामुळे त्यांना कमी दराने परवडत आहे असे त्यांनी लेखी खुलासा दिलेला आहे. महानगरपालिकेला फायदा झालेला आहे त्यामुळे आपल्याला शंका करण्याचे कारण नाही आहे. आता सभागृहाला विनंती अशी आहे, मागच्या वेळी ज्या पध्दतीने यंत्रणा ठेवण्यासाठी त्यांचे बॉयोमेडीकल इन्स्ट्रयुमेंट ठेवण्यासाठी लीजवर दिले होते त्या पध्दतीने यावेळी आपल्या डम्पींग यार्डमध्ये लीजवर देत आहे. आपण त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देत नाही आहे. मार्केट रेटप्रमाणे आपण लीज रेट घेणार आहोत, त्यांच्या पेमंटमधून वजा करुनच देणार आहे. त्यामुळे सभागृहाला विनंती आहे या विषयाला मंजूरी देण्यात यावी.

**ठराव क्रमांक 219 /वि.क्र.101** :- भांडेवाडी येथील घनकचरा व्यवस्थापनाच्या जागेवर अनेक वर्षापासुन {मालमत्ता विभाग} संकलित केलल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरिता नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉपोरेशन लिमिटेड (NSSCSCL) यांचेमार्फत Zigma Global Environ Solution Pvt. Ltd, या एजन्सीला कार्यादेश दिलेलो आहे.

मौजा - भांडेवाडी, सिट क्र. 38, नगर भूमापन क्र. 1017 येथील जागा नागपूर स्मॉर्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉपोरेशन लिमिटेड (NSSCSCL) यांनी घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातुन 1.20 हेक्टर जागा Zigma Global Environ Solution Pvt. Ltd, यांना भाडेपट्टयांने देण्याबाबत शिफारस केलेली आहे. तरी मौजा - भांडेवाडी येथील सिटी क्र. 38, नगर भूमापन क्र. 1017 मधिल 1.20 हेक्टर जमीन नगर रचना विभागा व्दारे निश्चित केलेल्या भाडे शुल्कानुसार रु. 12,96,000/- वार्षिक दराने

उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. भाडेपट्टयाचा कालावधी 2 वर्षाकरिता असेल तरी विषयास मान्यता देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून इस प्रक्रिया के कारण नागपूर महानगरपालिका ने 10 लाख मॅट्रीक टन कचरे का प्रोसेस करने का टेंडर निकाला था उससे महानगरपालिका के परिसर मे कचरो के पहाड बने हुए है उसमे करीब करीब 32 एकर जमीन मुक्त हो जायेगी और कचरे के ये जो ढेर होते है, ढेर मे ही बार-बार अंगार लगती है। ढेर से ही बदबु का प्रसार होता है जो नागपूर शहर मे बहोत बडे पैमाने मे फैलता है। इसलिये यह कचरे का ढेर एकबार समाप्त हो जायेगा और कुछ प्रमाण मे निजात मिल जायेगी। महानगरपालिका ने वर्तमान मे जो कचरा निकल रहा है, संपुर्ण कचरे की विल्हेवाट करने के लिए नया टेंडर निकाला है। इस टेंडर के माध्यम से नया कचरा प्रतिदिन खर्च हो जाये, पुराना कचरा धीरे धीरे प्रोसेस करके खत्म कर दे तो भांडेवाडी के कारण आजूबाजू के परिसर मे होनेवाली जो त्रासदी है वह पुरा दुर हो जायेगी। इस सभी बातों को ध्यान मे रखते हुए और इसमे मा.आयुक्त महोदय के विशेष प्रयासोसे जो प्रपोजल की कॉस्ट आयी है वह कम आयी है इसलिये इसे मंजुरी दी जाये ऐसा सभागृह के सामने निवेदन किया जाता है। या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक २२० /वि.क्र.१०२** :- **(सामान्य प्र. विभाग)** पोलिस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार श्री. राजेन्द्र शंकरराव गजभिये, उच्च श्रेणी लिपीक, आरोग्य विभाग धरमपेठ झोन क्र. 2 यांचे विरूध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याची परवानगी "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" चे कलम 59 अ अन्वये प्राप्त अधिकारानुसार आयुक्त यांनी दिनांक 06/12/2021 रोजी दिलेली आहे.

करीता कृपया म.न.पा. सभागृहाच्या माहितीकरीता सादर प्रश्नाची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्रमांक २२१ /वि.क्र.१०३** :- **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये नागपूर महानगरपालिकाद्वारे केंद्र शासनाच्या व राज्य् शासनाच्या हागणदारी मुक्त् शहर अंतर्गत City is Water+ करीता आवश्यक सर्व निकष पूर्ण केलेले आहे. नागपूर महानगरपालिका केंद्र शासनाच्या व राज्य् शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमत: जाहिरात क्र. ३६९/ पि. आर, दि. २४/१२/२०२१ नुसार स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर सुचना प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात आलेले होते. परंतु ऐकही सुचना व हरकती कार्यालयास प्राप्त् झालेली नाही.

त्यानुसार नागपूर शहराला City is Water+ घोषित करण्याबाबतचा विषय सभागृहाने विचारात घेतला

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, स्वचछ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये नागपूर महानगरपालिकेद्वारे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या हागणदारी मुक्त शहर अंतर्गत City is water + + पात्र नाही आहोत काय?. जर पात्र नाहीत तर कां पात्र नाही.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. आपण मागच्या वेळी City is water + + करिता अप्लॉय केला होता. आपल्याला माहीत आहे याच्यामध्ये काटेकोरपणे ॲनालॅसीस होते. City is water + म्हटले तर 3 मार्क्स मिळतात आणि City is water + + म्हटले तर मार्क्स मिळतात. मागच्या वेळी आपला मोठा मार्क्स मिस झाला. मिस झाले म्हणजे तेवढे रॅंक आपण खाली उतरलो, तेवढे मार्क्स मिळाले असते . वर्तमानपत्रामध्ये येते आपण स्व:ताच्या रॅंकींगमध्ये खाली आलो. त्यामुळे यावेळी आपण कन्झरवेटीव्ह निर्णय घेतलेले आहे. ज्या गोष्टीला 100 टक्के यस महणू शकतो त्या गोष्टीला करु या आणि water + मध्ये टेंडर काढतो, वॉटर रिज करतो, ते सगळे पुर्तता करण्यामध्ये वेळ लागतो. मागच्या वेळीचा प्रिमीयम लक्षात water + + करण्यापेक्षा water + करुन त्याचा पासवर्ड टाकून आपला रॅंकिंग वाढेल. यावर्षी आपण टॉप

10 मध्ये येण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मा.आयुकतांनी जे निवेदन केले ते मान्यच आहे. परंतु माझे एवढे म्हणणे होते की आपण कुठे कमी पडत आहे की water + + इलिजीबल होत नाही. कुठल्या कायटेरियामध्ये आपण कमी पडतो आहे म्हणजे कोणत्या कायटेरियामध्ये कमी पडतो आहे त्यावर आपल्याला वर्क करता येईल.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, मा.सदन. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जी टीम आहे त्यांच्यासोबत आम्ही अभ्यास करतो. तीन-चार प्रकारचा कायटेरिया असते. पब्लीक फीड बॅक, रिसायकलींग ऑफ वॉटर आपण करतो परंतु 100 टक्के करीत नाही. कच-याचे रिसायकलींग अशा प्रकारचे इंडीकेटर आहेत. त्या इंडीकेटरच्या अनुषंगाने स्पेसिफिक असल्याशिवाय ते देत नाही. आपल्याला उदाहरण सांगायचे तर मागच्या वर्षी water + + करीता महाराष्ट्रातील 11-12 महानगरपालिकेने कम्प्लीट केले होते. त्यापैकी फक्त एकच मुंबई महानगरपालिकेला मिळाले होते. त्यामुळे यावेळी करीत असतांना water + + पात्र आहेत ते 5 मार्क्स देत नाही तर निदान 3 मार्क्स तरी द्यायला पाहिजे. ते कॉम्पीटेशन असल्यामुळे आपल्याला 3 मार्क्स सुध्दा मिळत नाही म्हणून इफेक्ट पडतो. ज्या गोष्टीकरिता आपण पक्के जिंकू शकतो तेच यावेळी घेतले आहे.

वरील चर्चेनंतर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये नागपूर महानगरपालिकाद्वारे केंद्र शासनाच्या व राज्य् शासनाच्या हागणदारी मुक्त् शहर अंतर्गत City is Water+ करीता आवश्यक सर्व निकष पूर्ण केलेले आहे. नागपूर महानगरपालिका केंद्र शासनाच्या व राज्य् शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमत: जाहिरात क्र. ३६९/ पि. आर, दि. २४/१२/२०२१ नुसार स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर सुचना प्रसिध्द करुन सुचना व हरकती मागविण्यात आलेले होते. परंतु ऐकही सुचना व हरकती कार्यालयास प्राप्त् झालेली नाही.

त्यानुसार नागपूर शहराला City is Water+ घोषित करण्याबाबतचा विषय सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक २२२ /वि.क्र.१०४ :-**</u> स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** महानगरपालिकाद्वारा शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) घोषित करण्याकरीता आवश्यक् सर्व निकषांची अमलंबजावणी होत असल्याने नागपूर महानगरपालिका, नागपूर शहर तीन तारांकित मानांकन (३ Star Rating ) दर्जाचे शहर म्हणुन स्वंघोषित करण्यात आलेले आहे. केंद्रिय मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नागरीकांकडून प्रथमता जाहिरात क्रं. ३६८/ पी.आर. दि. २४/१२/२०२१ नूसार स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिध्द् करुन सुचना व हरकती मागविण्यात आलेले होते. परंतु ऐकही सुचना व हरकती कार्यालयास प्राप्त् झालेली नाही.

त्यानुसार नागपूर शहराला स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत ३ स्टार गुणवत्ते मध्ये नागपूर शहराचे नामांकन दाखल करण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक/ २२३ वि.क्र.१०५-:**</u> मौजा 459 ,117 ,115-.नागपूर नगर भुमापन क्र-बुधवार बाजार
**{प्रकल्प विभाग}** महाल येथील 6187.55m$^2$ जागेवर अत्याधुनिक व्यावसायीक संकुल व शॉपींग कॉम्प्लेक्स चे बांधकाम प्रस्तावित आहे.

अत्याधुनिक व्यवसायीक संकुल व शॉपींग कॉम्प्लेक्स च्या बांधकामाकाकरीता मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड यांच्या रू.99,79,25,721/- निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 540, दिनांक 18.09.2019 अन्वये मान्यता प्राप्त असुन मे.एस.एम.एस.इन्फ्रास्ट्रक्चर लिमीटेड यांना कार्यालयातर्फे पत्र क्र. 46/E.E.(P), दिनांक 20.09.2019 अन्वये स्वीकृती पत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे.

वरील निविदेची विधीग्राह्यतेची मुदत निविदा उघडण्याचे दिनांकापासुन 120 दिवस (दिनांक 11.01.2020 पर्यंत) होती. कोव्हीड-19 प्रार्दुभावामुळे तसेच अस्तीत्वातील बाजारपेठेतील संपूर्ण बांधकामे जसे, शॉपींग कॉम्प्लेक्स, सुलभ शौचालय, धार्मीक स्थळे व मोठी झाडे निष्काशीत करणे तसेच प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणांमुळे कार्यादेश प्रक्रीया पुर्ण होऊ शकली नाही.

दरम्यानच्या कालावधीत नविन विकास नियंत्रण नियमावली नुसार संपुर्ण आराखडा पुन्हा: सादर करण्याबाबत सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी कळविलेले होते. नविन विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार अतिरीक्त वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I) व त्यानुसार वाढीव आर्थिक उत्पन्न प्राप्त करण्याचे संबंधाने मा. आयुक्त यांनी निर्देशीत केल्यानुसार सुधारीत बांधकामाचा आराखडा वास्तुविशारद श्री अशोक मोखा यांच्या सहाय्याने तयार करण्यात आला.सुधारीत तयार करण्यात आलेल्या नकाशामध्ये चटई क्षेत्रामध्ये वाढ झाल्यामुळे प्राकलन राशीमध्ये वाढ झालेली आहे.

**जागेचे क्षेत्रफळ :- 6187.55$M^2$**

| अ. क्र. | मजला | मुळ आराखड्यानुसार बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | सुधारीत आराखड्यानुसार बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| 1 | तळघर-1 | - | - |
| 2 | तळघर-2 | - | - |
| 3 | Lower Gr. Floor | 565.34 | - |
| 4 | Upper Gr. Floor | 1707.52 | 2683.34 |
| 5 | पहिला मजला | 1868.71 | 3148.55 |
| 6 | दुसरा मजला | 1777.19 | 3060.40 |
| 7 | तिसरा मजला | 1683.70 | 3060.40 |
| 8 | चौथा मजला | 1845.01 | 3252.81 |
| 9 | पाचवा मजला | 2259.99 | - |
| 10 | सहावा मजला | - | 2578.84 |
| 11 | सातवा मजला | - | 2394.54 |
| 12 | आठवा मजला | - | 2394.54 |
| 13 | नववा मजला | - | 2394.54 |
| 14 | एकुण बांधकाम | 11707.46 | 24967.96 |
| 15 | बांधकामाची एकुण राशी | 99,79,25,721/- | अंदाजे 150.00 कोटी |

**पार्कींग जागेचे क्षेत्रफळ :- 7301.64 $M^2$**

उक्त नमुद प्रमाणे प्रकल्पाच्या बांधकाम क्षेत्रामध्ये 13260.50 चौ.मी.ने वाढ झाली व त्यामुळे मुळ प्रकल्पाच्या राशीमध्ये 150 टक्के वाढ झाली.

मा. आयुक्त यांनी दिनांक 15.11.2021 ला दिलेल्या निर्देशान्वये बुधवार बाजार केळीबाग रोड, महाल, नागपूर येथील अत्याधुनिक व्यवसायीक संकुलचे बांधकाम पुर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने तसेच मेट्रो मॉल, जयप्रकाश नगर येथे करण्यात येणाऱ्या व्यावसायीक संकुलाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे स्थायी समिती मनपा ठराव क्र. 540, दिनांक 18.09.2019 रद्द करून खालील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

- उक्त प्रकल्पाचे बांधकाम खाजगी उद्योजकामार्फत भागीदारी तत्वावर Design Build Finance Operate and Sale (DBFOS) पुर्ण करून घेण्याकरीता निविदा बोलविण्याचा व त्यासंबंधीचा करारनामा इ. करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच निविदा बोलविल्या नंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात येईल.

.उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, त्या ठिकाणी स्किल ट्रेनिंग सेंटरचा गाजावाजा झाला होता. स्किल ट्रेनिंग सेंटर या शहरात आणतो आणि यापासून लोकांना रोजगार मिळेल. मग हे स्किल ट्रेनिंग सेंटर कुठे शिफट करणार आहे.

महापौर:- संबंधित संस्थाने आतापर्यंत काम केले नाही म्हणून त्यांच्याकडून जमीन वापस घेत आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, ही जागा दुस-या औद्योगिक संस्थेला देता येणार नाही काय?

महापौर:- नागपूर म्युनिसिपल कार्पोरेशन जी इलेकिट्रक बस आपण आणत आहे. त्याच्याकरिता सुरक्षित जागा आपल्याला लागेल. या कंपनीने या जागेवर पुर्ण भिंत बांधून पुर्ण बांधकाम करुन दिले आहे. म्हणून या जागेची सुचना परिवहन समितीने केली आहे त्याप्रमाणे सभागृहात हा विषय आला आहे.

निगम सचिव(श्री.हुमणे):-मा.महापौरजी, या प्रस्तावामध्ये वाटोळा खसरा क्र. 115/1, खसरा क्र.115/3 अनावधाने नमुद करायचे राहून गेले त्यामुळे विनंती आहे की त्याचा समावेश करण्यात यावा.

**<u>ठराव क्रमांक/ २२४ वि.क्र.१०६-:</u>** मौजा-वाठोडा, खसरा क्र. 173/1, 2 व 174/1, 2, न.भु.क्र. 265 266, 267 व 268, आराजी 4.06 हे.आर. (10.00 एकर) जागा “स्किल ट्रेनिंग सेंटर” करीता लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड या संस्थेला 30 वर्षीय भाडेपट्टयावर देण्यात आलेल्या जागेचा भाडेपट्टा रद्द करणेबाबत व महानगरपालिकेच्या परिवहन विभागास इलेक्ट्रिक बस, चार्जींग स्टेशन व डेपो करीता जागा उपलब्ध् करून देणेबाबत.

**{स्थावर विभाग}**

मौजा-वाठोडा, खसरा क्र. 173/1, 2 व 174/1, 2, न.भु.क्र. 265 266, 267 व 268, आराजी 4.06 हे.आर. (10.00 एकर) जागा “स्किल ट्रेनिंग सेंटर” स्थापित करण्याकरीता लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड यांना मनपा ठराव क्र. 84 दि. 19.08.2017 तसेच मनपा ठराव क्र. 220 दि. 20.04.2018 नुसार हस्तांतरणास सभागृहाची मंजुरी प्राप्त आहे. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र. नासुप्र-2017/प्र.क्र. 54/ नवि-26 दि. 28.11.2017 मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 79 (g) मधील सुधारीत तरतुदीनुसार रु. 1/- प्रती चै.फुट व त्यावर 2% वार्षिक भुभाटक आकरून 30 वर्षाचे भाडेपट्टयावर देण्यात आली आहे. भाडेपट्टयाचा कालावधी (दि. 22.01.2018 ते दि. 21.01.2048 पर्यंत) आहे. लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड या संस्थेस हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागेचा भाडेपट्टा दुय्यम निबंधक कार्यालयात भाडेपट्टा दस्त क्र. 5320/2018 दि. 24.01.2018 ला पंजीबद्ध करण्यात आलेला आहे. लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड या संस्थेस देण्यात आलेली ताबा पावती क्र. ई.ओ. 2105 दि. 15.02.2018 नुसार ताबा देण्यात आला आहे. दि. 31.08.2021 च्या लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड च्या पत्रानुसार मनपातर्फे हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागेवर त्यांचा प्रकल्प सुरू होण्यास 3 वर्षे उशिर झाला असुन, दि. 01.12.2021 पर्यंत जागा खाली करून देण्याबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 37 अन्वये जागेच्या वापराबाबत (आरक्षणात बदल) चा प्रस्ताव स्कील ट्रेनिंग सेंटर ऐवजी परीवहनच्या वापराबाबत चा प्रस्ताव नगर विकास विभागास पाठविण्यात येईल.

करीता लार्सन अॅन्ड टुब्रो लिमिटेड या संस्थेसोबत झालेला भाडेपट्टा रद्द करण्याचा प्रस्ताव

सादर करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिकेच्या परिवहन विभागास इलेक्ट्रिक बस, चार्जींग स्टेशन व डेपो करीता हस्तांतरीत करणेबाबतचा सदर प्रस्ताव मनपा सभागृहाचे पटलावर ठेवण्याचा प्रश्न सभागृहाने विचारता घेवून या प्रस्तावामध्ये वाटोळा खसरा क्र. 115/1, खसरा क्र.115/3 अनावधाने नमुद करायचे राहून गेले त्यामुळे प्रशासनाची विनंती केलेली आहे की त्याचा समावेश करण्यात यावा. या सुचनेसहित हा विषय मंजूर करण्यात येते या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक२२ ५/ वि.क्र.१०७</u> :-** नागपूर येथे वर्धा रोड (Hotel Redision Blue) ते CRPF या भागात मौजा
**{प्रकल्प विभाग}** सोमलवाडा, खामला, भामटी, टाकळी व जयताळा या परीसरातील सलग मनपाच्या मालकीची ३०.४९ हेक्टर जागेवर ऑरेंज सीटी स्ट्रीट प्रकल्प स्वबळावर मनपा व्दारे उभारण्या बाबत व या अनुषंगाने Transjection Advisor ची नेमणुक करणे तथा पुर्व प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. हफीज कॉन्ट्रक्टर यांचा करारनामा सुधारीत करणे ई. आवश्यक कार्यवाहीचे अधिकार आयुक्त, मनपा यांना प्रदान करण्यास सभागृहाचे ठराव क्रमांक १२५दि. १६.१०.२०१७ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सध्यास्थीतीत भुखंड क्रमांक १ वर खाजगी उदयोजकामार्फत भागीदारी तत्वावर काम करण्यासाठी निवीदा बोलावून त्याबाबतची प्रक्रीया करण्यात आली आहे. व संबधीत निवीदेस रु. ५५,५५,७०,०००/- चा प्रतीसाद प्राप्त झाला आहे.

त्याच धर्तीवर या प्रकल्पातील दुस-या चरणात भुखंड क्रमांक ५ यांचे विवरण खालील प्रमाणे आहे. त्यावर व्यापारी संकुलाचे खाजगी उदयोजकामार्फत भागीदारी तत्वावर (DBFOS)प्रकल्प राबविण्यास निवीदा बोलविण्याचा त्यातील अटी व शर्ती अंतीम करण्याचा ईतर संलग्न बाबी करण्याचे व त्या संबधीचा करारनामा करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मनपा यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

| **भुखंडाचे विवरण** |
|---|
| भुखंड क्र. ५ |
| भुखंडाचे क्षेत्रफळ - ७५३३.५९ चौ. मी. |
| उपलब्ध FSI - ४.९५<br>उपलब्ध Built up area— ३७२९१.२८ चौ. मी. |
| **प्रस्तावित प्रकल्पाचे ढोबळ विवरण** |
| व्यावसायीक संकुल किंवा तत्सम इमारत<br>(Mix Use सह) |
| तळमजले - २(पार्कींग) |
| मुख्य इमारत मजले -G + ९ |
| |

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 226 /वि.क्र.108</u> :-** ऑरेन्ज सिटी स्ट्रिट मॉल इमारतच्या Plinth Level चे वरील
**{प्रकल्प विभाग}** उर्वरीत बांधकाम खाजगी उद्योजकामार्फत भागीदारी तत्वावर पूर्ण करून (म.न.पा.चा अद्याप पर्यत झालेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसह) घेण्याकरीता निविदा बोलविण्याच्या व त्यासंबधीचा करारनामा इ. करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करणे बाबतच्या विषयास मा.सभागृहाच्या दि.25.3.2021 च्या सभेमध्ये ठराव क्र.76 अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली.

या ठरावामध्ये मंजूर केल्याप्रमाणे निविदा बोलविल्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृह समक्ष ठेवण्यात येत आहे.

सदर कामाच्या कार्यान्वयनाकरीता प्रस्तावास म.न.पा. सभागृहातर्फे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार निविदा बोलावण्यास केलेली कार्यवाहीचा अहवाल सभागृहाकडे सादर करण्याचे नमुद आहे.

त्यानुसार सदर माहिती ठेवण्यात येत आहे.

प्रकल्पाचे नांव :- The Orange City Multi Utility Shopping Mall and Office spaces with requisite parking at the NMC Orange City Mall site at Nagpur.( Next to Jaiprakash Nagar Metro Station) भुखंड क्र.1

भुखंड तपशिल :- भुखंड क्र.1

भुखंडाचे क्षेत्रफळ 3308 चौ.मी.

उपलब्ध Built up area-10629.63,

उपलब्ध FSI-3.213

या भुखंडाच्या विकासाकीता DBFOS तत्वावर निविदा पत्रे या प्रकल्पाचे सल्लागार आर्किटेक्ट हफीज कॉन्ट्रॅक्टर यांच्या मार्फत सादर करण्यात आले होते. सदर निविदा प्रपत्रे म.न.पा. चे अधिवक्ता ॲडव्होकेट श्री. कप्तान यांचेकडे दि.15.6.2021 ला पाठविण्यात आले व त्याची लिगल वेटींग करुन दि.6.7.2021 ला महानगरपालिकेस प्राप्त झाले. त्यानुसार म.न.पा. तर्फे E-Tender No:-2021_NMCN_704862_1 दि.15.7.2021 निविदा ऑनलाईन प्रकाशित करण्यात आल्या. या प्रकल्पाची पूर्व निविदा बैठक 30.7.2021 नियोजीत होती. तसेच याची बिड सबमिशन डेट 28/08/2021 होती.

प्रथम निविदा वेळी पूर्व निविदा बैठकीत कोणतेही निविदाकार उपस्थित झाले नाही तसेच प्रथम निविदेदरम्यान कोणत्याही निविदा काराने निविदा सादर केली नव्हती. उक्त परीस्थितीत या प्रकल्पाची द्वितीय निविदा काढण्याचा निर्णय म.न.पा. तर्फे घेण्यात आला. त्यानुसार द्वितीय निविदा क्र. E-Tender No:-2021_NMCH_704862_2 दि.28.5.2021 प्रमाणे प्रकाशित करण्यात आल्या. त्यानुसार पूर्व निविदा बैठक दि. 08/09/2021 ला आयोजित करण्यात आली होती. या निविदेची, निविदा स्विकृती दि.27.9.2021 ही होती. निविदा अटीनुसार कमीत कमी रु.45 कोटी निम्नतम देकाराच्या निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये खालीलप्रमाणे एकूण 4 निविदा प्राप्त झाल्या.

1) विदर्भ इन्फाटेक प्रा.ली.
2) प्रफुलवेद इन्फा प्रा.ली.
3) सुफलाम इन्फ्रास्ट्रक्चर ली.
4) संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली.

वरील प्राप्त निविदाची या कामाच्या PMC द्वारे तांत्रिक पडताळणी केली असता संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. यांची निविदा तांत्रिक पात्रता पूर्ण करीत नसल्याने Disqualified करण्यात आली व पूढे या कामाच्या वित्तीय निविदा दि.21.10.2021 ला उघडण्यात आल्या. त्याप्रमाणे प्राप्त महत्तम निविदाचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदा देकार | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **सुफलाम इन्फ्रास्ट्रक्चर ली.** | **रु.४७ ०००००००/-** | **H३** |
| **२** | **विदर्भ इन्फाटेक प्रा.ली.** | **रु.४७३००००००/-** | **H२** |
| **३** | **प्रफुलवेद इन्फा प्रा.ली.** | **रु.५५५५७००००/-** | **H१** |

उक्त निविदेने प्राप्त महत्तम निविदाकाराचे नांव :- प्रफुलवेद इन्फा प्रा.ली.

प्राप्त निविदा राशी रु.५५,५५,७०,०००/-
अशा उच्च प्राप्त झालेल्या निविदाकार प्रफुलवेद इन्फा प्रा.ली. यांची देकार राशी रु.५५,५५,७०,०००/- मंजूरीस्तव व निविदा मान्यता करीता म. न.पा. स्थायी समीतीपूढे दि.१.११.२०२१ ला प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावात (विषयाला ) स्थायी समीती ठराव क्र.२०५ दि.२२.१२.२०२१ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मान्यते अन्वये प्रफुलवेद इन्फा प्रा.ली. यांना कामाचे LOA दि.४.१.२०२२ ला देण्यात आले आहे.
उक्त प्रमाणे निविदेबाबत विवेचन मा. सभागृहाच्या माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.
उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक/ २२७ वि.क्र.१०९ -:**
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}**

नागपूर महानगरपालिकेच्या दि.२८/०५/२०२१ रोजीच्या भरलेल्या सर्वसाधारण सभेत मा. विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे यांनी मे. ऐ.जी. इनव्हायरो इन्फ्रा प्रो.प्रा.लि. व मे. बि.व्ही.जी. इंडिया लि. कंपनीच्या कामात होत असलेल्या अनियमिततेमुळे होणाऱ्या त्रासाच्या संदर्भात सादर केलेल्या स्थगन् प्रस्तावावर चौकशी करण्याकरीता मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा. सत्तापक्ष नेता यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. या गठित समितीद्वारे सखोल चौकशी करुन चौकशीचा अहवाल मा. महापौर महोदय यांना दि. ०६/०१/२०२२ रोजी बंद लिफाफ्यात सादर केला. सदरचा अहवाल मा. सभागृहाच्या पटलावर ठेवण्याच्या मान्यतेस सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या अहवालाची प्रत सगळया मा.सदस्यांना पुरविण्यात यावी आणि फक्त या विषयासाठी २९ तारखेला विशेष सभागृह घेण्यात येईल. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझी एक सुचना आहे. मागच्या वेळी सुध्दा झाले नाही. आपल्या प्रभागामध्ये परमपुज्य पुंडलीक बाबा आणि भारत रत्न राजीव गांधी या दोन चौकाचे प्रस्ताव पेंडींग पडलेले आहेत ते सभागृहासमोर सादर करावे परंतु कार्यालयाने अजूनपर्यंत हे प्रस्ताव सादर केलेले नाही. या दोन्ही प्रस्तावाला सुचनेसहीत मंजूरी करावी अशी माझी सुचना आहे.

**ठराव क्रमांक२२ ८/ वि.क्र.११०:-**
**(सचिवालय)**

म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा.महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 28/12/2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून प्रलंबित प्रकरणांमध्ये टेक्निकल पुर्तता झालेली आहे किंवा नाही ते प्रशासनाने तपासुन घ्यावे आणि त्याची दखल घेवून पुढच्या सभागृहात आले पाहिजे या दृष्टीने कार्यवाही करावी. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

## परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. २८.१२.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

### उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ४ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | मा. सौ. चेतना राजू टांक | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| २ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ३ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अध्यक्षा :– सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे पाच प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे पाच प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. २८.१२.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महेन्द्र धनविजय नगरसेवक प्र. क्र. 1<br>सौ. सुश्षमा चौधरी नगरसेविका प्र. क्र. 1<br>सौ. प्रमिला मथरानी नगरसेविका प्र. क्र. 1<br>श्री. विरेन्द्र कुकरेजा नगरसेवक प्र. क्र. 1 | प्रभाग क्र. 1 अंतर्गत भिम चौक ते पाटनकर चौक दरम्यान मंगळवारी बाजार रोड येथील टि–पॉईन्टला ''सम्राट अशोक टि पॉईन्ट''असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |
| 2 | श्री. महेन्द्र धनविजय नगरसेवक प्र. क्र. 1<br>सौ. सुषमा चौधरी नगरसेविका प्र. क्र. 1<br>सौ. प्रमिला मथरानी नगरसेविका प्र. क्र. 1<br>श्री. विरेन्द्र कुकरेजा नगरसेवक प्र. क्र. 1 | प्रभाग क्र. 1 अंतर्गत भिम चौक ते पाटनकर चौक या मार्गाला ''श्री. संत शिरोमणी गुरू रविदास महाराज मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | श्री. संदिप जाधव<br>नगरसेवक प्र. क्र. 11<br>सौ. संगिता गिऱ्हे<br>नगरसेविका प्र. क्र. 11<br>सौ. अर्चना पाठक<br>नगरसेविका प्र. क्र. 11<br>श्री. भुषण शिंगणे<br>नगरसेवक प्र. क्र. 11 | प्रभाग क्र. 11 येथिल खसरा क्र. 62/2 राठी ले–आऊट मुर्तीकृष्ण सोसायटी येथील मैदानाला ''राष्ट्रीय बॉक्सर दिवंगत प्रणय राष्ट्रपाल राऊत'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |
| 4 | श्री. विजय चुटेले<br>नगरसेवक प्र. क्र. 17<br>सौ. लता काडगाये<br>नगरसेविका प्र. क्र. 17<br>सौ. हर्षला साबळे<br>नगरसेविका प्र. क्र. 17<br>श्री. प्रमोद चिखले<br>नगरसेवक प्र. क्र. 17<br>ॲड. निशांत गांधी<br>नगरसेवक | प्रभाग क्र. 17 अंतर्गत विजय टॉकीज ते आनंद टॉकीज या मार्गाला ''समाजसेवक उमेशबाबु चौबे मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |
| 5 | श्री. दयाशंकर तिवारी<br>नगरसेवक प्र. क्र. 19<br>ॲड. संजयकुमार बालपांडे<br>नगरसेवक प्र. क्र. 19<br>सौ. विद्या कन्हेरे<br>नगरसेविका प्र. क्र. 19<br>सौ. सरला नायक<br>नगरसेविका प्र. क्र. 19 | प्रभाग क्र. 19 मध्ये बजेरीया शुक्ला लॉज ते बाजपेयी मंदीर ॲड. उमरेटे यांच्या घरापर्यतच्या मार्गाला ''पंडीत लक्ष्मीकांत दिक्षीत मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत. | ––– | मंजुर |

हस्ता/– मनिषा आशिष धावडे
अध्यक्ष, नामकरण समिती,
महानगरपालिका, नागपूर

**ठराव क्रमांक२ २९/ नोटीस क्रमांक** ३५-: सन 2021–22 या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय बजेटमध्ये
**(सा.बां.वि)** माझ्या प्रभाग क्र. 34–ब मधिल सिमेट रोडचे कामासाठी तरतूद
(मा. श्री. राजेंद्र सोनकुसरे) करण्यात आली असून एल.एफ.एम.एस. च्या माध्यमातून विभागाला नस्ती प्राप्त आहे. यावर स्थायी समिती अध्यक्ष यांनी मंजुरी दिली असता विभागाने या कामावर तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मंजुरी का प्रदान करण्यात आली नाही. याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस.सभागृहाने विचारात घेतला "

श्री.राजेंद्र सोनकुसरे:-मा.महापौरजी, 2020-21 मध्ये बजेटमध्ये तरतूद केली होती. कोव्हीडमुळे हे काम मागे राहिले आणि हे काम परत कॅरी फारवर्ड होवून 2021-22 ला मंजूरी मिळाली. मंजूरी मिळाल्यानंतर आजपर्यंत या नस्तीला झोनमधून पाठविल्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. याकरिता हा

प्रश्न मला नोटीसद्वारे सभागृहासमोर आणावा लागला आहे. मा.महापौरजी, आपल्याला माहीत आहे. शहरात किती रस्ते खराब झालेले आहेत. माझ्या प्रभागामध्ये जो अत्यंत खराब झालेला रस्ता महाकाली नगर , मॉ भगवती नगर,शेष नगर, गुरुकुलनगर, आकाश नगर या रस्त्याची डांबरीकरणाची नस्ती स्थायी समिती चेअरमनने प्रावधान देवून टेक्निकल सॅग्शन मिळालेला नाही. त्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सुध्दा निधी नसल्याचे मला सांगण्यात आले. मला प्रशासनाला विचारावायाचे आहे की त्यावेळी निधी संपलेला होता तर त्या नंतर डांबरीकरणाच्या फाईली मंजुर कशा करण्यात आल्या ते प्रशासनाने या ठिकाणी सांगावे. या सोबत मा.आयुक्तांनी फाईल मंजूर झाल्यानंतर सुध्दा यावर कॅफो आणि इलेकिट्रक इंजिनिअर यांच्याशी चर्चा करण्यात यावी अशी त्या फाईलवर नोट लिहिलेली आहे. त्या नोटमध्ये प्रत्यक्ष वॉर्निंग इलेक्ट्रिक इंजिनिअरला देवून हे कां थांबविण्यात आले तर त्यांनी सांगितले की पोलवरती जी फिटींग आपण घेतलेली आहे. ती नवीन निधीमधून घेतलेली आहे. नागपूर शहरामध्ये दहा हजार पोल आहेत आणि पोलवरील फिटींग याच्यामध्ये घेण्यात येणार नाही. मा.महापौरजी, मा.आयुक्तांना प्रश्न विचारावयाचा आहे की वेगळी फिटींगसाठी प्रोव्हीजन केलेले आहे की जेणेकरुन मला पोलच्या फिटींगकरिता वेगळे एस्टीमेट द्यायचे होते, हेही दिले तर ती फाईल कां अडकविण्यात आली. प्रशासनतर्फे काय करण्यात येणार आहे ते सांगावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मा.सदन. दोन्ही कामे बांधकाम विभागाशी संबंधित आहेत. 2 कोटी 62 लक्ष रुपये प्राप्त झाले नव्हते.

महापौर:- पोहकरजी आवाज स्पष्ट नही है।

श्री.राजेंद्र सोनकुसरे:-मा.महापौरजी, या नस्तीत प्रथमदृष्टया बघितल्यानंतर आपल्या लक्षात आले की नाही. जेणेकरुन या कामाला इतका उशिर झाला त्यानंतर आचारसंहिता लागण्याआधी हे काम संपवायचे होते. प्रभागात आम्हांला नागरिकांच्या तक्रारींना समोर जावे लागते हे आपल्याला माहीत नव्हते काय? 50 कोटी रुपयाचे प्रावधान बजेटमध्ये केलेले आहे हे आपल्याला पूर्ववत माहीत असून सुध्दा आपण नवीन फाईल तयार केली. हे सगळे माहीत असून आपल्याला नोट लिहिता आली नाही. अधिका-याची नोट नमुद होत असते त्या नंतर सुध्दा 50 लाखाचे एस्टीमेट असल्यामुळे तेवढे एस्टीमेट सादर करावे त्यानंतर प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी मिळाली ही आपली चुक नाही आहे काय?

अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):- मा.महापौरजी, मा.सदन. याकरिता आपण 2 कोटी 65 लक्षाचे प्रावधान देवू शकत नव्हते तेवढी लायबिलीटी वाढणार होती. जेवढी स्थायी समितीने प्रावधान उपलब्ध करुन दिले त्या अंदाजपत्रकामध्ये मंजूरीकरिता वित्त विभागाकडे मागच्या आठवडयात पाठविले आहे.

श्री.राजेंद्र सोनकुसरे:-मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी इलेक्ट्रिक विभागाची 16 लक्षाची फाईल प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी झाल्यानंतर चर्चाचा विषय लिहिला आहे. प्रश्न असा आहे की मा.आयुक्त त्यावर काय निर्णय घेणार आहे. फिटींगचे प्रोव्हीजन दिल्या गेल्या आहे. ते एस्टीमेट प्रशासनाकडील अधिका-याकडून सबमीट झालेले आहे. आपल्याकडून मान्यता मिळाली तर ती फाईल होणार आहे किंवा नाही

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता(श्री.मानकर):- मा.महापौरजी, फिटींग दुसरीकडून खरेदी करण्यात आली होती. त्याला प्रशासकीय मान्यता आहे.

महापौर:- निधी अप्राप्त आहे काय आहे. मानकर आपण पुन्हा वक्तव्य करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.मानकर):- मा.महापौरजी, निधी प्राप्त आहे. माहिती घेवून कळवितो.

महापौर:- निधी प्राप्त आहे तर काम कशाला थांबले.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विषयावर मानकर साहेब म्हणतात की माहिती घेवून कळवितो. माहिती घेवून कळविण्याचे त्याच्यात काय आहे मा.महापौरजी. निधी उपलब्ध आहे तरी मंजुरी कां मिळत नाही. इलेक्ट्रिक विभागाचे जे इंजिनिअर आहेत त्यांनी जबाबदारी घेवून फाईल मंजूर करुन वर्कआर्डर देवून चार दिवसांत नगरसेवकांना कळवावे की तुमच्या कामाचे वर्कआर्डर झालेले आहे. त्या संदर्भात मा.महापौरजी, इलेकिट्रक विभागाला निर्देश दयावे.

श्री.राजेंद्र सोनकुसरे:- मा.महापौरजी, मा.आयुक्त यांनी मा. कॅफो यांच्याशी चर्चा करण्याचे म्हटले आहे आणि त्यावर चर्चा होवून राहिली, ती फाईल कॅफोकडून परत गेली आहे.

श्री.अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मा.राजेंद्र सोनकुसरे यांच्या प्रश्नावर एक निवेदन आलेले आहे. मा.महापौरजी, आपल्याला निवेदन आहे की राजेंद्र सोनकुसरे यांच्या प्रश्नावर पोहेकर साहेबांनी निवेदन दिलेले आहे. रिअप्रोप्रिएशनच्या फाईली आहेत त्या कॅफोकडे गेलेल्या आहेत त्याच्यावर मंजूरी आलेली नाही. या संदर्भाने मा.महापौरजी, आपल्याला निवेदन आहे की प्रशासनाला निर्देश दयावे आपण नागपूर शहरातील रस्त्यांची सध्याची जी परिस्थिती आहे त्यावर महानगरपालिकेत एवढया मोठया प्रमाणावर रिअप्रोपीव्हेट केले त्याची सध्याची स्थिती काय आहे. किती निधी खर्च झाला, किती निधी अखर्चित आहे आणि खर्चित झालेला निधी कुठल्या कामावर झाला. मा.महापौरजी, दोन दिवसात महापौर कार्यालयात ही माहिती दयावी अशा प्रकारचे निर्देश आपण दयावे.

वरील चर्चेनंतर सन 2021—22 या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय बजेटमध्ये माझ्या प्रभाग क्र. 34—ब मधिल सिमेट रोडचे कामासाठी तरतूद करण्यात आली असून एल.एफ.एम.एस. च्या माध्यमातून विभागाला नस्ती प्राप्त आहे. यावर स्थायी समिति अध्यक्ष यांनी मंजुरी दिली असता विभागाने या कामावर तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मंजुरी का प्रदान करण्यात आली नाही. याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस. सभागृहाने विचारात घेवून "मा.सदस्य ज्या वार्डाला रिप्रेझेंट करतात. तो आऊटर प्रभाग आहे आणि आऊटर प्रभाग असल्यामुळे त्या ठिकाणी लाईटची भरपूर गरज आहे आणि त्याची भौगोलिक क्षेत्र मोठे असल्यामुळे तेथे ॲडीशनल लाईट लावणे खुप आवश्यक आहे त्यादृष्टीने प्रशासनाने ही कार्यवाही पुर्ण करुन त्याचे कार्यादेश करावे. या पोलवर फिटींग कोण लावणार फक्त याच्यामुळे जर थांबले असेल तर एलएडी लाईट आपण जेथे लावत आहे तेथे निघणारे जे लाईट आहेत ते लावून तात्पुरते वर्किंगमध्ये आणावे. जेव्हा पुढे आपण खरेदी करु तेव्हा आपण त्या ठिकाणी लाईट लावू या दृष्टीने ही फाईल कार्यान्वित करावी. पोहेकर साहेबांनी एक निवेदन दिले त्या निवेदनामध्ये निधी अप्राप्त आहे म्हणून आम्ही हे काम करीत नाही असे म्हणत आहे. मागच्या डीपीसीच्या मिटींगमध्ये मा. पालकमंत्री यांच्या समोर मा.क्रिडामंत्री श्री.सुनिल केदारजीने प्रश्न उपस्थित केला. सन्माननीय सदस्य सर्व त्या बैठकीत होते. आयुक्त त्या मिटींगमध्ये उशिराच आले. त्या मिटींगमध्ये असा निर्णय झाला. शासनाच्या कोणत्याही निधीचा जर टेंडर होत असेल आणि टेंडर बिलोमध्ये येत असेल तर उर्वरित रक्कमेचा सुध्दा निविदा काढण्यात येईल. तर त्यादृष्टीने रस्त्याचे भरपूर टेंडर बिलोमध्ये आलेले आहेत.तर त्या निधीचा समायोजन करुन या २ कोटी रुपयाची राशी उपलबध करुन देण्यात यावी आणि तेही काम संपुष्टात आणण्यात यावे असे निर्देश देण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक२३ ०/ नोटीस क्रमांक ३६-:** नागपूर महानगरपालिकेतील कंत्राटी संगणक चालक
**(सा.प्र.वि)** घोटाळाच्या संदर्भाने याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून (;**मा.श्री. तानाजी वनवे**) निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस. **सभागृहाने विचारात घेतला**

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेमध्ये जे लोक काम करतात त्यांची माहिती देण्यात यावी.

महापौर:- तानाजीच्या विषयावर प्रशासनाने माहिती दयावी.

उपायुक्त(श्री.जैन):- मा.महापौरजी, सध्या स्थितीत नागपूर महानगरपालिकेत 189 ऑपरेटर कार्यरत आहेत. त्यांच्यावर वार्षिक खर्च जवळपास 6 कोटी रुपये आहे.

श्री.तानाजी वनवे:- हा खर्च आपण कंपनीला देत आहे काय?

उपायुक्त(श्री.जैन):- मा.महापौरजी, होय, यासाठी निविदा काढून एजन्सी नियुक्ती केलेली आहे. त्यांच्यामार्फतच हे ऑपरेटर नियुक्त करण्यात आले आहे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझा ऑपरेटरवर ऑब्जेकशन नाही आहे. परंतु कंपनी ऑपरेटरला कमी पैसे देते. पैसे वाचवून ऑपरेटरला जास्त पैसे देतो असे दाखवून या कंत्राट बेसिसवर लागणा-या ऑपरेटरचे आर्थिक शोषण करते त्याची सखोल चौकशी केली पाहिजे. यासाठी चौकशी समिती नेमुन या कंपनीच्या कामाची चौकशी केली पाहिजे. यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची माहिती आली आहे. वाटल्यास याबाबचे पुरावे सुध्दा देवू.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेतील कंत्राटी संगणक चालक घोटाळाच्या संदर्भाने याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस." सभागृहाने विचारात घेवूनमाविरोधी पक्ष नेता यांच्याकडे काही पुरावे असतील तर संबंधित विभागाकडे ते . संबंधित विभाग आपण दिलेल्या पुराव्याची चौकशी करुन सभागृहापुढे या विषयाची माहिती .देतील .त्याचा जर सत्यापन्न झाला तर त्यादृष्टीने पुढील निर्णय घेण्यात येईल .आणतील या मामहापौरजी यांनी . क ेलेलया घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक२३ १/ नोटीस क्रमांक ३८-:** आसीनगर झोन क्र. 9 अंतर्गत नुकतेच स्थायी करण्यात
**(लेखा व वित्त विभाग)** आलेल्या सफाई कर्मचाऱ्याने डी.सि.पी.एस. (DCPS)
**(मा. श्री. जितेंद्र घोडेस्वार)** एक/दोन वर्ष होऊन सुध्दा अजुनपावेतो कपात करण्याची कार्यवाही त्या झोनच्या सहा. आयुक्त व्दारे जाणीवपुर्वक का करण्यात आली नाही? प्रशासनिक विलंबाचा सफाई कर्मचाऱ्यांनी आर्थिक भुर्दंड का सोसावा तसेच याबाबत मनपा प्रशासनास वारंवार पत्राव्दारे सुचित करुन त्यावर कार्यवाही का करण्यात येत नाही.

करीता दि. 16/10/2020 पासून स्थायी करण्यात आलेल्का असीनगर झोन मधिल सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे डी.सि.पी.एस कपात करण्याकरिता मनपा प्रशासन स्तरावर उचित व सविस्तर चर्चा संदर्भाने याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस." सभागृहाने विचारात घेतला

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेत जवळपास 4407 सफाई कर्मचारी आहेत. दिनांक 6.10.2020 च्या जी.आर.मध्ये असे लिहिले आहे. ज्या सफाई कर्मचा-यांना 20 वर्ष पुर्ण झालेले आहे त्यांना तात्काळ परमानंट करण्यात यावे.

महापौर:- घोडेस्वारजी आपली आवाज येत नाही आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेत ज्या सफाई कर्मचा-यांना अधिसंख्य कर्मचारी म्हणून परमानंट करण्यात आले असे 3900 च्या वर अधिसंख्य कर्मचारी आहेत. आसीनगर झोन क्र. 9 अंतर्गत नुकतेच स्थायी करण्यात आलेल्या सफाई कर्मचा-यांना डीसीपीएस कपात करण्यात आली नाही. एक-दोन वर्ष होवून सुध्दा अजूनपावेतो कपात करण्याची कार्यवाही त्या झोनच्या सहा.आयुक्तद्वारे जाणीवपुर्वक कां करण्यात आली नाही? प्रशासनकीय विलंबाचा सफाई कर्मचा-यांनी आर्थिक भुर्दंड कां सोसावा तसेच याबाबत मनपा प्रशासनास वारंवार पत्राद्वारे सुचित करुन त्यावर कार्यवाही कां करण्यात येत नाही. यावर प्रशासनाने उत्तर दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.भेलावे):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्या अनुषंगाने सादर करतो, आशीनगर झोन क्र. 9 यांच्याकडून वेळोवेळी डीसीपीएसचे फार्म मिळाले त्याचे विश्लेषण याप्रमाणे आहे. दिनांक 26.09.2020 मध्ये एकुण तीन फार्म मिळाले, त्याच दिवशी त्याला डीसीपीएस क्रमांक दिलेला आहे. 79 फार्म 20.07 ला मिळाले त्यांना 23.07 ला तीन दिवसानंतर डीसीपीएस नंबर उपलब्ध करुन दिला आहे. 50 फार्म 28.12 ला आहे त्याला 31.12 ला डीसीपीएस अनुक्रमांक दिलेला आहे. 50 फार्म 31.12.2021 ला मिळाले त्यांना 5.01 2022 ला डीसीपीएस क्रमांक दिलेला आहे. 11.01.2022 ला 150 फार्मस आले त्यातले 50 फार्मस ला 13.01 ला अनुक्रमांक दिलेला आहे आणि 50 फार्मस् ला अनुक्रमांक दिलेला नाही कारण ज्या चन्ने मॅडम आहेत त्या कोरोना बाधित झाल्यामुळे रजेवर आहेत त्या उद्या-परवा रजू झाल्यावर दुस-या दिवशी हे अनुक्रमांक उपलब्ध करुन देवू.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, दोन वर्ष झाले आहे आपण या कर्मचा-यांना डीसीपीएस अनुक्रमांक दिलेला नाही. शासनाच्या या योजनेअंतर्गत संबंधित कर्मचा-याला कोणकोणता लाभ प्राप्त होतो याची माहिती देण्यात यावी.

महापौर:- उत्तर दयावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.भेलावे):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या अनुषंगाने डीसीपीएसमध्ये कर्मचा-याची नोंद झाल्यानंतर नागपूर महानगरपालिका आपल्या शेअरमधून 10 टक्के रक्कम वळती करतो. संबंधित कर्मचा-यांना 20 टक्के डीसीपीएस मध्ये टाकावे लागते. जर कर्मचा-याला डीसीपीएसमधून पैसे काढायचे असल्यास जवळपास 10 वर्ष झाल्यानंतर त्याला डीसीपीएसमधून पैसे काढता येतात एवढीच माहिती माझ्याकडे सध्या आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, जर कर्मचा-याकडे डीसीपीएस अनुक्रमांकाची रसिद नसेल आणि त्याचा मृत्यू झाला तर त्याला लाभ मिळणार आहे काय?

वरील चर्चेनंतर आसीनगर झोन क्र. 9 अंतर्गत नुकतेच स्थायी करण्यात आलेल्या सफाई कर्मचाऱ्याने डी.सि. पी.एस. (DCPS) एक/दोन वर्ष होऊन सुध्दा अजुनपावेतो कपात करण्याची कार्यवाही त्या झोनच्या सहा. आयुक्त व्दारे जाणीवपुर्वक का करण्यात आली नाही? प्रशासनिक विलंबाचा सफाई कर्मचाऱ्यांनी आर्थिक भुर्दंड का सोसावा तसेच याबाबत मनपा प्रशासनास वारंवार पत्राव्दारे सुचित करुन त्यावर कार्यवाही का करण्यात येत नाही.

करीता दि. 16/10/2020 पासून स्थायी करण्यात आलेल्या असीनगर झोन मधिल सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे डी.सि.पी.एस कपात करण्याकरिता मनपा प्रशासन स्तरावर उचित व सविस्तर चर्चा संदर्भाने याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस." सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्यांची भावना लक्षात येत आहे. त्यांचे म्हणणे सरळसरळ असे आहे

की वेळेवर जर हा विषय झाला नसता आणि जर एखादी दुखापत झाली असती तर कर्मचा-याचे नुकसान झाले असते. हा देवयोग आहे की कुणाची दुखापत झाली नाही आणि विलंब झाला. पण प्रशासनाला ताकीद देण्यात येते की प्रशासनाची कर्मचा-यांप्रति जी जबाबदारी आहे, समाज कल्याण योजनेअंतर्गत जे काही काम करायचे आहे ते वेळेवर झाले पाहिजे असेच मा.सदस्यांचे म्हणणे आहे. पुढे अशी चुक नाही झाली पाहिजे याकडे प्रशासनाने लक्ष दयावे अशी प्रशासनाला ताकीद देण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, नोटीस क्र. 40 मध्ये हा प्रस्ताव झालेला आहे परंतु मला निवेदन करावयाचे आहे की नागपूर महानगरपालिकेत जे लहान कर्मचारी असतात त्यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव रेंगाळले जातात आणि जे मोठे अधिकारी असतात त्यांचे पदोन्नतीचे प्रकरण लवकरात लवकर करण्यात येतात. कृपया प्रशासनाने असा भेदभाव करु नये. महानगरपालिकेत लहान कर्मचारी हा महानगरपालिकेचा एक अंग आहे आणि त्यांच्यावर नागपूर शहराची जबाबदारी आहे. जी सहानुभूती मोठया अधिका-यावर असते ती लहान कर्मचा-यांप्रती सुध्दा असावी.

**<u>ठराव क्रमांक 232 /नोटीस क्रमांक 40</u>:-**
**(सा.प्र.वि.)**
(मा.सौ. आभा पांडे)

पदोन्नती तपासणी समिती समोर दिनांक 14.06.2021 रोजी एकूण 28 विषयान्व्ये चर्चा व निर्णय झाले अशी माहिती प्राप्त आहे. यापैकी स्वच्छता अधिक्षक, सहा. अधिक्षक, जेष्ठ श्रेणी लिपिक, मुख्य मेकॅनिकल कम ड्रायव्हर, शाळा निरीक्षक, मा. मुख्याध्यापक, प्रा. मुख्याध्यापक मराठी, हिन्दी व उर्दु या पदासाठी पदोन्नतीचे ठराव मंजूर करुन त्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तसेच या सभेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) 24 पदेबाबत निर्णय पारीत झाले असून सुध्दा 4 महिन्याच्या कालावधी उलटून सुध्दा संबंधित कर्मचाऱ्यांना आदेश निर्गमित करण्यात आलेले नाही. म.न. पा. अधिनियम कलम 72 अ, ब, क, ड अन्वये कार्यालयीन कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबनास होण्याच्या प्रतिबंधाबाबत तरतूद करण्यात आली आहे. मग कलम 72 'क' अंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही होईल का? हया विषयावर सभेमध्ये चर्चा करुन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या 24 कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदाकरिता दि. 14/06/2021 पासून सदर पदावर नियुक्ती संबंधिचे आदेश निर्गमित करण्यात यावे. संदर्भाने याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1'' (जे)'' प्रमाणे नोटीस. "सभागृहाने विचारात घेवून प्रशासनाने कर्मचा-यांच्या दृष्टीने वेळेवर निर्णय घ्यावा पुढे दिरंगाई झाली नाही पाहिजे असे निर्देश देण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

महापौर:- नोटीस क्रमांक 41 और नोटीस क्र. 42 सभागृह के पटलपर कायम रखे जाते है।

**<u>ठराव क्रमांक २३३ /नोटीस क्रमांक ४३</u> :-**
**(अतिक्रमण व्यवस्थापन विभाग)**
**(मा. श्री. तानाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरात असलेल्या अतिक्रमणाच्या संदर्भाने सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रमाणे नोटीस (जे) "१" सभागृहाने विचारात घेतला

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, फार मोठया प्रमाणात नागपूर शहरामध्ये अतिक्रमण रस्त्यावर आहे. जी अतिक्रमणे रिंग रोड वरती होत आहे. जगनाडे चौक ते जुनी शुक्रवारी रोड या रस्त्यावर ज्या वाहनांकर जनरेटर लावण्यात आलेली आहेत अशी वाहने रिंगरोडवरती पार्किंग करुन ठेवण्यात येतात त्यांच्यावर कुठल्याच कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे लोकांना फार मोठया प्रमाणात त्रास होतो. त्या ठिकाणाहून अतिक्रमण काढण्याची गरज आहे. गरीब लोक हाथठेले लावून आपला उदरनिर्वाह करतात त्यांच्यावर

आपण कार्यवाही करतो. परंतु ज्या ठिकाणी लोकांना पार्किंगमध्ये फार मोठया प्रमाणात अडचण निर्माण होते असे जे मेन रस्त्यांवर जनरेटरची गाडया पार्किंग करतात त्यांना काढण्यात येत नाही. त्यांच्यावर आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, तयांना हटविण्यात आलेले नाही. त्यामुळे अतिक्रमण काढले जाते की वाचविले जाते अशी शंका निर्माण होते. याचे उत्तर संबंधित विभागाने दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

सहा.आयुक्त(श्री. अशोक पाटील):- मा.महापौरजी, मा.सदन. मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. जे मेन रस्त्यावरील अतिक्रमण आहे ते काढण्यासाठी आमची सेंट्रलची टीम पाठविण्यात येते. सगळया झोनमध्ये टीम गेल्यानंतर त्यांना सांगितले जाते त्यानंतर कार्यवाही करण्यात येते. त्यामध्ये मा.सदस्यांनी जो रस्ता म्हटला आहे त्या रस्त्यावर अतिक्रमण असेल तर त्याची शहानिशा करुन ते अतिक्रमण काढण्यात येईल.

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, दहा वर्षापासून त्या ठिकाणी त्या गाडया पार्किंग करुन ठेवण्यात येत आहे. जगनाडे चौक ते जुनी शुक्रवारी या रस्तयावर पुर्ण ठिकाणी या जनरेटर असलेल्या गाडया पार्किंग केलेल्या असतात. आणि त्यामुळे ट्राफिकला अडचण निर्माण होते. दहा वर्षापासून त्यांनी आतापर्यंत किती वेळा कार्यवाही केली याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

सहा.आयुक्त(श्री. अशोक पाटील):- मा.महापौरजी, जगनाडे चौक ते भांडेप्लॉटकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यावर कार्यवाही झालेली आहे. परंतु मा.सदस्य जो रस्ता म्हणतात जगनाडे चौक ते जुनी शुक्रवारी रोड या ठिकाणी....

श्री. तानाजी वनवे:- मा.महापौरजी, जगनाडे चौक ते जुनी शुक्रवारी रोड या रस्त्यावरती कार्यवाही झाली असल्याची नोंद नाही. त्यांनी काही जप्ती केले असेल किंवा काही हटविले असेल तर त्यांनी सांगावे.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरात असलेल्या अतिक्रमणाच्या संदर्भाने सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिकि अधिनियमातील प्रमाणे (जे) "१" नोटीस सभागृहाने विचारात घेवून संबंधित झोनच्या वार्ड ऑफीसर/असीस्टंट कमिश्नरला ताकीद देण्यात येते, पुढच्या या आठवडयात गणतंत्र दिवसानंतर जेव्हा अतिक्रमणाची टीम ज्या झोनमध्ये येईल त्या दिवशी ट्राफिक पोलीसला सोबत घेवून दोघांची संयुक्तिक कार्यवाही त्या ठिकाणी करण्यात यावी. जर मोटरवाहनावर हे सर्व यंत्र असतील तर त्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार पोलीस विभागाला आहे म्हणून संयुक्तिकरित्या पोलीस विभाग आणि महानगरपालिका, अतिक्रमण विभाग संयुक्तिकरित्या कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात येते. या मा महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस.सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, अतिक्रमणाच्या संदर्भामध्ये वाटोळा गावामध्ये राहणा-या लोकांना घर तोडण्याच्या संदर्भामध्ये नोटीसेस आलेल्या आहेत. जवळपास 25 हजार बांधकामे झालेली आहेत त्यांना एनआयटीने नोटीस दिली आहे. मा.महापौरजी, आपण त्या ठिकाणी हस्तक्षेप करावा, तेथील राहणारे लोक सामान्य नागरिक आहेत. त्यांच्या रजिस्ट्रया झालेल्या आहेत. त्याच्याकरिता आपल्याला विनंती आहे की आपण त्या ठिकाणी एनआयटीच्या सभापतीशी बोलून त्या ठिकाणी हस्तक्षेप करावा आणि त्यांचे सरंक्षण करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

महापौर:- मौजा वाठोडाच्या संदर्भात आजच्याच दिवशी ती मिटींग लावली होती पण आज सभागृह घेत असल्यामुळे 27 तारखेली ती मिटींग घेत आहोत. आपल्या सुचनेच्या पूर्व आपण ही मिटींग लावलेली आहे.

मिटींग आम्ही घेणार आहोत त्यामध्ये जे काही सकारात्मक होवू शकले त्यासाठी प्रयत्न करु. आपले ज्युरिडिक्शन नाही आहे तरी सुध्दा आपण प्रयत्न करु.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, गेल्या पाच वर्षापासून मी स्पीड ब्रेकरच्या संदर्भात अर्ज दिलेले आहेत. एक-दोन सोडले तर स्पीड ब्रेकर लावण्याचे काम माझ्या प्रभागात झालेले नाही. पाच वर्ष झालेले आहेत ते काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशी माझी अपेक्षा आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(हॉटमिक्स प्लॉन्ट):- मा.महापौरजी, हॉटमिकस प्लॉन्टकडून प्रक्रिया सुरु आहे.

**ठराव क्रमांक २३४ /नोटीस क्रमांक ४४:-**
(वाहतूक/हॉट मिक्स विभाग)
(मा. श्री. तानाजी वनवे)

नागपूर शहरातील रस्त्यावरिल गतिरोधक (स्पीड ब्रेकर) संदर्भाने सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1" (जे) प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून कार्याची गतिशिलता वाढवावी आणि ही समस्या त्यांनी दूर करावी. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक २३५ /नोटीस क्रमांक ४५:-**
(सा.प्र.वि.)
श्री. राजेंद्र सोनकुसरे)

नागरीकांकडुन होणाऱ्या नागपूर महानगरपालिकेच्या संपत्तीच्या नुकसान भरपाईचे काही धोरण निश्चित (मा. करण्यात आले आहे काय? तसेच एखाद्या व्यक्तीच्या हातून अपघातात फुटपाथ, पावसाळी नाली, पथदिवे, विद्युत पोल, रोड डिव्हाइडर, मनपा मालकीची संपत्ती, वाहतूक सिग्नल तुटले असता विमा कंपनी त्या व्यक्तीच्या वाहनाला मोबदला देते. पण त्यामध्ये मनपाचे नुकसान भरपाई हा एक संबंधित व्यक्तीकडुन घेण्याचे काही धोरण निश्चित करण्यात आले तर अशी घटना घडल्यास संबंधित विषयाशी पोलीस खात्यामध्ये आपल्याकडुन गुन्हा दाखल केला जातो का? या संदर्भाने सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1" (जे) प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री. राजेंद्र सोनकुसरे:- मा.महापौरजी, नागरिकांकडुन होणा-या नागपूर महानगरपालिकेच्या संपत्तीचे नुकसान भरपाईचे काही धोरण निश्चित करण्यात आले आहे काय? तसेच एखाद्या व्यक्तीच्या हातून अपघातात फुटपाथ, पावसाळी नाली, पथदिवे, विद्युत पोल, रोड डिव्हाइडर, मनपा मालकीची संपत्ती, वाहतूक सिग्नल तुटले असता विमा कंपनी त्या व्यक्तीच्या वाहनाला मोबदला देते. पण त्यामध्ये मनपाचे नुकसान भरपाई हा एक संबंधित व्यक्तीकडुन घेण्याचे काही धोरण निश्चित करण्यात आले तर अशी घटना घडल्यास संबंधित विषयाशी पोलीस खात्यामध्ये आपल्याकडुन गुन्हा दाखल केला जातो का? याबद्दल प्रशासनाला आपल्या मार्फत विचारावयाचे आहे.

महापौर:- याबद्दल प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त(श्री.जैन):-मा.महापौरजी, मा.सदन. महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे जर नागरिकांकडून नुकसान झाले असेल तर त्या संदर्भात नुकसान भरपाई घेण्यासंदर्भात मनपा अधिनियम 252 कलमात तरतूद आहे परंतु नुकसान भरपाई वसुल करण्याच्या संदर्भात सविस्तर पॉलिसी महानगरपालिकेत नाही.

वरील चर्चेनंतर नागरीकांकडुन होणाऱ्या नागपूर महानगरपालिकेच्या संपत्तीच्या नुकसान भरपाईचे काही धोरण निश्चित करण्यात आले आहे काय? तसेच एखाद्या व्यक्तीच्या हातून अपघातात फुटपाथ,

पावसाळी नाली, पथदिवे, विद्युत पोल, रोड डिव्हाइडर, मनपा मालकीची संपत्ती, वाहतूक सिग्नल तुटले असता विमा कंपनी त्या व्यक्तीच्या वाहनाला मोबदला देते. पण त्यामध्ये मनपाचे नुकसान भरपाई हा एक संबंधित व्यक्तीकडुन घेण्याचे काही धोरण निश्चित करण्यात आले तर अशी घटना घडल्यास संबंधित विषयाशी पोलीस खात्यामध्ये आपल्याकडुन गुन्हा दाखल केला जातो का? या संदर्भाने सभागृहात सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1" (जे) प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिकेने असलेल्या तरतूदीप्रमाणे आपली एक पॉलीसी निर्धारित करावी आणि पुढच्या सभागृहात ही पॉलिसी सभागृहाच्या समोर आणावी. मी विशेषत: राजेंद्रजी सोनकुसरे यांचे अभिनंदन करतो त्यांनी एक चांगला प्रश्न उचलला आणि चांगला प्रश्न सभागृहाच्या समोर आणून महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानीची भरपाई इन्श्युरंन्स कंपनीकडून आपल्यालाही मिळू शकते की काय? आपल्यालाही मिळू शकते अशी चर्चा करुन, प्रश्न उपस्थित करुन चांगला दिशानिर्देश केला त्यांचे अभिनंदन करतो आणि प्रशासन पुढच्या सभागृहात हा विषय मांडेल अशी विनंती करतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

महापौर:- सभी सदस्यों को कल गणतंत्र दिवस है, सभी को गणतंत्र दिवस के पूर्व संध्या पर हार्दिक बधाई देता हूँ। मा.सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरेजी इनके समितीने जो अहवाल दिया है उस अहवाल को मै सभागृह के पटल पर खोल रहा हूँ, और सन्माननीय विभाग की माध्यम से यह अहवाल सभी सदस्यों तक पोहचे इसप्रकार का उनको निर्देश देते है। 29 तारीख को सुबह 11.00 बजे हमलोग फिर से बैठेंगे। यह अहवाल मा.आयुक्त महोदय के सुपुर्त कर रहा हूँ, और इस अहवाल का जो ऑपरेटींग जो पार्ट है वह सभी को भेजा जाये ऐसे निर्देश देता हूँ।

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**